# हिंदचा बुलबुल

म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. नं. ७५१
१९५६



RLFBK-0008897

सौ. सुधा देशपांडे बी. ए.

क्रमांक ७८९ ... नों: दि. २-११-४६

# हिंदचा बुलबुल

(सरोजिनीदेवी नायडू यांचें जीवन-चित्र.)

★

लेखिका

सौ. सुधा मधुकर देशपांडे,

बी. ए. (ऑनर्स)

★

१४ नोव्हेंबर १९५६

REFBK-0008897

प्रकाशक — मेसर्स जोशी आणि लोखंडे, पुणें २.

मूल्य एक रुपया चार आणे

मुद्रक
प्र. भा. काळे
प्रतिभा मुद्रणालय,
सदाशिव पेठ, टिळक-रस्ता, पुणें २.

प्रकाशक
दे. श्री. जोशी व द. भ. लोखंडे
मेसर्स जोशी आणि लोखंडे प्रकाशन,
सदाशिव पेठ, टिळक-रस्ता, पुणें २.

## ...कार—

रे सृष्टीच्या बुलबुला ! जरा थांबव ना तुझ्या त्या गगनचुंबी भराऱ्या. नाहीं थांबवत ? बरं तर, पण जरा खालीं बघ तर खरं ! तो बघ तुझा प्रतिस्पर्धी कसा ऐटींत उभा आहे.

आपण सृष्टीमातेचे सर्वांत जास्त लाडके, म्हणून का तुला हा गर्व ? पण तो बुलबुल तर हिन्दमातेच्या हृदयांतील प्राण आहे. निळ्या आकाशांत आपण उंच उंच भराऱ्या मारतों म्हणून का तुझा हा तोरा ? पण ह्या बुलबुलाच्या कल्पनेच्या भराऱ्या तुझ्यापेक्षां किती तरी उंच आहेत. तुझा कंठ अत्यंत गोड आहे असें सर्व कवींनीं तुझें वर्णन केल्यामुळें का तुझी मान ताठ आहे ! पण ह्या बुलबुलानें आपल्या मधुर सुरांत क्रान्तीचीं गीतें गाईलीं आहेत आणि राजकारणांत सौंदर्य ओतलें आहे. फुलापानांशीं कुजबुज करणाऱ्या बुलबुला ! ह्या मानवी बुलबुलानें लहान-थोर, श्रीमंत-गरीब सर्वांजवळ जाऊन स्वातंत्र्याचीं गीतें म्हटलीं आहेत नि त्यांच्या अंतःकरणांत स्फूर्ति उत्पन्न केली आहे.

पहावयाचं आहे त्याला डोळे भरून ? बोलायचं आहे त्याच्याशीं चार शब्द ? मग उतर खालीं नि चल हिन्दुस्थानच्या दक्षिणेकडे ! तो बघ, तो वाटेंत एक लहानसा जमिनीचा तुकडा दिसतो आहे ना ? उतरव तेथें तुझें हें छोटें विमान ! हें आहे हैद्राबाद ! तेथला हा बुलबुल !

अरे, पण आतां कोठें आहे तो बुलबुल ? केव्हांच उडून गेलाय् तो ह्या पृथ्वीवरून ! त्याचा आत्मा केव्हांच अंतराळांत विलीन झाला आहे !

पण तूं निराश होऊं नकोस हं पांखरा ! आपल्या कल्पनेच्या जोरावर चल मागें—खूप खूप मागें ६६ वर्षें मागें चल. ज्या वेळेस हिन्दमातेच्या पायांत पारतंत्र्याच्या शृंखला पडल्या होत्या...ज्यावेळेस भारतावर परक्या सरकारचें निशाण फडकत होतें......आणि त्याकडे पाहून स्वातंत्र्यवीरांचे बाहु स्फुरण पावत होते, शरिरांतील रक्त सळसळत होतें, त्या काळांत चल ! तेथें हळूच डोकावून बघ ! त्यावेळेस, ह्या हैद्राबादेमध्यें, हा हिन्दमातेचा बुलबुल जन्मास आला. ता. १३ फेब्रुवारीचा तो शुभ दिवस. त्याचें नांव माहीत आहे ! काय म्हणालास ? "बुलबुल !" अरे वेड्या विहंगमा ! बुलबुल हें कांहीं त्याचें खरें नांव नाहीं—तें टोपण नांव आहे. लोकांनीं कौतुकानें दिलेलें तें गौरवाचें नांव आहे. त्याचें खरें नांव—

"सरोजिनीदेवी नायडू"

देऊं का ह्या थोर स्त्रीचा परिचय करून ? देतें हं ! अगदीं थोडक्यांत देतें. ऐक, नीट कान देऊन ऐक, कानांत हृदय ठेवून ऐक--सर्वांगाचे कान करून ऐक. त्यानंतर तिची कीर्ति आपल्या पंखावर आरूढ करून उंच उंच जा ...दशदिशा जा.

पण तुला तसें करण्याचें फारसें कारणच पडणार नाहीं. कारण तिची कीर्ति अगोदरच जगाच्या कोनाकोपऱ्यांत पोचलेली आहे. त्यावर कालानें जर कां विस्मृतीचें पटल आणलें असेल, तर तें मात्र तूं दूर कर आणि तिच्या कर्तृत्वाचे व कलेचे पवाडे आपल्या मधुर स्वरांत गा !

ता. १४ नोव्हेंबर १९५६
पुणें २.

सुधा देशपांडे

# अनुक्रमणिका


| नांव | पृष्ठ |
|---|---|
| ( १ ) पहांटेचें काव्य .... .... .... | १ |
| ( २ ) विलायती वातावरणांत .... .... | ९ |
| ( ३ ) क्रान्तिकारक विवाह .... .... .... | १८ |
| ( ४ ) बुलबुलाचे बोल .... ... .... | २५ |
| ( ५ ) मायभूमीच्या सेवेसीं !.... .... .... | ३४ |
| ( ६ ) भगिनींना हांक ! .... .... .... | ४२ |
| ( ७ ) ‘ शिंग फुंकिलें रणीं ! ’ .... .... | ५१ |
| ( ८ ) भाव–तरंग .... .... .... | ६४ |
| ( ९ ) राजसिंहासनावर .... .... .... | ७४ |
| (१०) ‘ क्षितिजापलिकडे ’ ! .... .... | ८४ |

# हिंदचा बुलबुल

★

## १ . . . . . . पहांटेचें काव्य



आपल्या अंगाभंवतीं लपेटलेलें अंधाराचें काळेकुट्ट पांघरुण दूर सारून पहांट आतां जागी होत होती, डोळे किलकिले करून इकडे-तिकडे पहात होती, अंगावर पडलेल्या दंवाचें पाणी हलक्या हातानें टिपत होती नि आजुबाजूच्या फुलपाखरांना उठवीत होती. अशी कोवळी–किलबिलणारी पहांट नंतर घराघरांत डोकावूं लागली–एका घरांतून दुसऱ्या घरांत बागडूं लागली. बागडतां बागडतां ती थांबली एका मोठया बंगल्यापाशीं !

केवढा भव्य होता तो बंगला ! हैद्राबादेंतील विख्यात डॉक्टरला शोभेसाच होता तो. त्या बंगल्याचा डौलदार घाट–त्यावर असणाऱ्या निर-निराळ्या आकाराच्या खिडक्या–त्या खिडक्यांवर सोडलेले रंगीबेरंगी चिकाचे झुलते पडदे–ह्या सर्व थाटांमुळें तो बंगला म्हणजे एक राजवाडाच वाटत होता.

आणि त्या बंगल्याभोंवतीं बाग तरी केवढी विस्तीर्ण होती ! जणुं त्या बंगल्यानें बागेचा एक सोनेरी कमरपट्टाच घातला होता. पहांटेच्या गार वाऱ्यावर बागेंतील रंगीबेरंगी फुलांचीं झाडें आनंदानें डोलत होतीं. सारें वातावरण प्रसन्न होतें–सुंदर होतें–शांत होतें.

फुलांफुलांच्या गालावर टिचक्या मारीत पहांट पुढें पुढें चालली होती. नंतर ती थांबली एका खोलीपाशीं ! तिचे डोळे वळले त्या खोलीच्या खिडकीकडे–खिडकींतून येणाऱ्या दिव्याच्या प्रकाशाकडे !

" आपल्याआधीं उठणारी ही कोण ? " असें वाटून ती पहांट कुतूहलानें खोलींत डोकावूं लागली. पहाते तों........

एक लहान बालिका खुर्चीवर बसलेली आहे—अगदीं तल्लीन होऊन बसली आहे. डाव्या हाताचें कोपर तिनें टेबलावर टेकलेलें आहे; व उजव्या हातांतील पेन्सिलीनें टेबलावरच्या कागदावर ती कांहीं तरी लिहीत आहे. तिनें पोषाख केला आहे तो अगदीं इंग्रज बालिकेसारखा. तिनें केशरचना केली आहे तीहि अगदीं आधुनिक पद्धतीची—फार काय, साऱ्या खोलीची सजावटच आहे पाश्चात्य पद्धतीची !

ही अकरा वर्षांची किशोरी काय करत आहे बरें ? ही कोणाला पत्र लिहिते आहे ? की आपल्या कुशल हातानें एखादें रेखाचित्र काढीत आहे ? छे:, ती पत्रहि लिहीत नाहीं नि चित्रहि रेखाटीत नाहीं. ती अकरा वर्षांची चिमणी बालिका काव्य–लेखन करीत आहे. आपल्या चिमुकल्या मनांत गर्दी करणारे विचार, आपल्या चिमुकल्या हातानें, ती काव्यांत गुंफीत आहे.

हें कसलें काव्य ? आणि कोणत्या विषयावरलें ?

" न सुटलेल्या गणितास ! " हा त्या काव्याचा विषय !

गणितावर कां कुणी कविता लिहितें ? गणित आणि काव्य ह्यांच्यांत छत्तिसाचा आंकडा. कितीतरी कवींना आणि कादंबरीकारांना गणितांतील अगणित अडचणींनीं नामोहरम केलें आहे—त्यांच्या विद्येचा मार्ग अडविला आहे. पण ही बालिका गणितावरच कविता लिहीत आहे. केवढें तिचें धाडस ! हें धाडस दाखविणारी अकरा वर्षांची बालिका म्हणजे........................................" **सरोजिनी.** "

सरोजिनी केव्हांपासून तें गणित सोडविण्याची खटपट करीत आहे. पण गणित म्हणजे मुलुखाचा द्वाड विषय ! त्याचें नि सरोजिनी-चें मेतकूट कांहीं केल्या जमेना—गणित कांहीं सुटेना. गणितांत न चालणारी सरोजिनीची बुद्धि काव्यांत भराभर चालू लागली. त्या अजिंक्य गणिताला सरोजिनी प्रेमानें म्हणूं लागली—

"किती रे तूं दुष्ट ! माझी अगदीं परीक्षाच पहातो आहेस ! मी तर अगदीं हातच टेकलें तुझ्यापुढें—तरी तूं आपला मला हंसतच आहेस—चिडवीत आहेस—खिजवीत आहेस. पण हें बघ गणिता ! तुला माहीत नाहीं माझी जादू ! एकदां का त्या जादूच्या जाळ्यांत तूं सांपड-लास, कीं कसा बसशील एकाद्या कैद्यासारखा ! कोणती ती जादू ? अरे क्लिष्ट गणिता ! ती माझी जादू म्हणजे काव्य ! खरंच, तुलासुद्धां आवडेल बघ ! ह्या आंकड्यांच्या कांटेरी कुंपणांत तूं कशाला अडकून बसतोस ? चल, त्या काव्याच्या हिरवळीवर—लोळ त्या मऊ मऊ गालिच्यावर ! गर्विष्ठ

गणिता ! तूं जरी मला ह्या आंकडयांच्या जंजाळांतून सोडवीत नसलास तरी मी तुला सोडवतें हं !"

असे विचारामागून विचार सरोजिनीच्या बाल–मनांत उसळूं लागले आणि ते तिच्या लेखणींतून कागदावर उतरूं लागले–सरोजिनी कागदावर सरसर शब्द लिहूं लागली–शब्दांशब्दांतून सौंदर्य ओतूं लागली. शेवटीं त्या सौंदर्यपूर्ण शब्दांतून निर्माण झालें एक काव्य !

केवढा आनंद झाला सरोजिनीला त्या आपल्या काव्याकडे पाहून ! आनंदाच्या धुंदींत ती आजुबाजूचें सारें विसरून गेली–गर्विष्ठ गणितानें केलेला आपला पराभव विसरून गेली–आपल्या पाठीमागें आपले वडील उभे आहेत हेंहि ती विसरली. जेव्हां त्यांनीं तिच्या पाठीवर थाप मारली, तेव्हां सरोजिनी केवढयांदा दचकली ! तिचा आनंद कुठल्याकुठें दडी मारून बसला. आनंदाची जागा घेतली भीतीनें !

" पपांनीं पाहिली असेल का आपली ही कविता ? आतां ते काय म्हणतील ? गणित सोडविलं नाहीं म्हणून पपा रागावले असतील कीं कवितेकडे पाहून आनंदले असतील ? आतां त्यांनीं माझ्या पाठीवर जी थाप मारली, ती शाबासकीची कीं शिक्षेची ? "

सरोजिनीनें टेबलावर आपल्या छोटया हाताची घडी केली व विचारानें भारावलेलें डोकें त्यावर टेकलें. तेवढया एका क्षणांत शेंकडो विचार तिच्या मनांत गर्दी करून उठले. तोंच वडिलांच्या सातमजली हास्याचा आवाज तिच्या कानीं गडगडला. बावरलेल्या सरोजिनीचें डोकें आपल्या हातानें वर उचलून तिचे पपा–अघोरनाथ –तिला म्हणाले,

" अग वेडे ! मी कांहीं तुझ्यावर रागावलों नाहीं. एवढं भ्यायला काय झालं ? "

सरोजिनी अडखळत अडखळत सांगूं लागली–" काय झालं म्हणजे काय पपा ? मी गणित न सोडवितां कविता केली, म्हणून तुम्हीं रागावणार नाहीं का ? पण पपा, मी तरी काय करूं हो ? मी खूपखूप प्रयत्न केला !–पण सुटेनाच तें गणित. इतकी चिडलें त्याच्यावर नि मगं केलीन् ही कविता. "

अघोरनाथांनीं उत्सुकतेनें आपल्या कन्येचें प्रथम काव्य वाचावयास घेतलें. त्यांतील एकेक ओळ वाचतांच त्यांचे डोळे आनंदानें चमकूं लागले. त्यांची मुद्रा अभिमानानें प्रकाशूं लागली.

बाहेर आकाशांत सूर्याचें बालबिंब क्षितिजावर येऊं लागलें होतें. त्याच्या प्रकाशाच्या तांबूस लाटा सर्व आकाशावर पसरत होत्या—पृथ्वीवर सांडत होत्या—तशाच आनंदाच्या व अभिमानाच्या लाटा अघोरनाथांच्या नेत्रांत नाचत होत्या—मुद्रेवर चढत होत्या.

अघोरनाथांनीं आनंदानें गद्‌गदून सरोजिनीला मिठी मारली आणि ते तिला म्हणाले, " किती सुंदर कविता ! सरस्वती तुझ्या जिव्हेवर नाचते आहे का ग ? "

सरोजिनीचा चिमणा जीव पित्याच्या प्रेमानें गुदमरून गेला. ती हळूंच त्यांच्याकडे पहात म्हणाली, " पपा ! आत्तां मला नक्की वाटलं होतं कीं, तुम्ही माझी कविता वाचणार अन् वाचून झाल्यावर खूप खूप रागावणार—तिचे तुकडे तुकडे करणार नि शेवटीं.... शेवटीं...."

" थांबलीस का ? सांग ना शेवटीं काय ? "

" शेवटीं किनई, तुम्ही मला एका खोलींत कोंडून ठेवणार—सबंध दिवसभर कोंडून ठेवणार. "

" अग, तुला कोंडून ठेवायला तूं कांहीं गुन्हा केला आहेस का ? "

" मग पपा, आठवतो का तो प्रसंग ? दोन वर्षांपूर्वीचा ? त्या वेळेस नाहीं का तुम्ही मला खोलींत कोंडून ठेवलं ? तेव्हां तरी मी कोणता गुन्हा केला होता ? सांगा ना ? "

आपल्या विद्वान वडिलांना आपण शब्दांत नेमकें कसें पकडलें, ह्या जाणिवेनें ती अल्लड बालिका नाचूं लागली.

◆ ◆ ◆

दोन वर्षांपूर्वीं घडलेला तो प्रसंग अघोरनाथांच्या डोळ्यासमोर जसाच्या तसा उभा राहिला——

नऊ वर्षांची होती तेव्हां सरोजिनी ! तेव्हांपासून तिनें इंग्रजी बोललं पाहिजे अशी अघोरनाथांची सरोजिनीला सक्त ताकीद ! घरांतील

वातावरण जसं इंग्रजी पद्धतींचं, तसं बोलणंहि इंग्रजी पद्धतीचंच पाहिजे, ही त्यांची फार फार इच्छा. आपल्या मुलीनें पुढें बडे शास्त्रज्ञ व्हावें, असें त्यांना फार वाटे.

सरोजिनीला कांहीं इंग्रजीमधून बोलणें जमेना. कसं जमणार ? किती झालं तरी ती परकी भाषा. पण अघोरनाथांना त्याचें काय ? त्यांचा हट्ट मुलीला इंग्रजी आलेंच पाहिजे असा. इंग्रजीचा बडेजावच होता तेव्हां तसा ! त्या राजभाषेचा सन्मान न केल्याबद्दल त्यांनीं सरोजिनीला एका खोलींत कोंडून ठेवलें. हाच सरोजिनीचा पहिला तुरुंगवास ! वाऱ्याप्रमाणें दिवसभर भिरीभिरी फिरणाऱ्या सरोजिनीला तो एकांतवास कसा रुचणार ? तिनें मनाशीं निश्चय केला. उद्यांपासून मोडकंतोडकं का होईना पण इंग्रजी बोलायचें, नि पपांना खूष करायचें. आग्रही पित्याची निग्रही कन्या होती ना ती ?

अघोरनाथ हे नांवाप्रमाणें जरी रागीट असले, तरी मनानें फार प्रेमळ होते. आपल्या मुलीनें उत्तम इंग्रजी बोलावें–त्यांत उत्तम यश संपादावें–तिची कीर्ति सर्वत्र पसरावी ही त्यांची दांडगी इच्छा. आपल्या घराण्यांत परंपरागत आलेला विद्वत्तेचा वारसा, साऱ्या मुलांनीं पुढें चालवावा, असें त्यांना राहून राहून वाटे.

होतेंच तसें चट्टोपाध्यायांचें घराणें ! संस्कृत व तत्त्वज्ञान ह्यांनीं हें चट्टोपाध्याय घराणें कसें तळपत होतें, हें उभ्या बंगालला माहीत होतें. त्या घराण्यांतील कांहीं पूर्वजांनीं जुन्या हिन्दुशास्त्राचा अभ्यास सखोल केला आहे; तर कांहींनीं जीवनाचें यथार्थ दर्शन घडविणारीं सुंदर सुंदर कवनें लिहिलीं आहेत, हें बंगालभर महशूर आहे.

ह्या तेजस्वी घराण्याची एक शलाका अघोरनाथांच्या घरीं झगझगीतपणें चमकत होती–बंगालहून अघोरनाथ हैद्राबादेंत आले, ते एक बडे शास्त्रज्ञ म्हणून ! युरोपला जाऊन आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर त्यांनीं 'डॉक्टरेट ऑफ सायन्सेस्' ही पदवी संपादन केली. युरोपहून हैद्राबादेस परत आल्यावर अघोरनाथांनीं 'निजाम–कॉलेज'ची स्थापना केली. आपला सर्व वेळ ते शास्त्राच्या शोधांत घालवूं लागले. त्यासाठीं

त्यांनीं आपल्या बंगल्यांत एक खास प्रयोगशाळा तयार केली. रात्रंदिवस निरनिराळे प्रयोग ते त्या प्रयोगशाळेंत करूं लागले व ह्या छंदांत तहान-भूक विसरूं लागले.

अघोरनाथांच्या ठिकाणीं जशी अचाट विद्वत्ता होती, तशी अफाट संपत्तीहि होती. जशी धनाची संपत्ती, तशीच हृदयाची संपत्ती! त्यांचें हृदय सागराप्रमाणें विशाल होतें. त्यांच्याकडे येणाऱ्या प्रत्येक माणसाला अघोरनाथ आपल्या प्रेमळ बोलण्यानें व गाढ आदरातिथ्यानें आपलेसें करीत—अगदीं भावासारखें त्यांच्याशीं वागत.

त्यांच्या मित्रमंडळींत नाना धर्मांचे, नाना जातींचे लोक असावयाचे. पण एकदां कां सारे मित्र अघोरनाथांच्या घरीं जमले कीं, त्यांचें बोलणेंचालणें सारें एका पातळीवरून होई. मग त्यांत कोणी श्रीमंत नाहीं; कोणी गरीब नाहीं; कोणी विद्वान नाहीं, कोणी अडाणी नाहीं; कोणी श्रेष्ठ नाहीं, कोणी कनिष्ठ नाहीं. अघोरनाथांच्या बागेंत दररोज ह्या मित्रांची एक छोटीशी सभाच भरलेली असावयाची. ह्या सभेंत एखादे वेळेस जर हास्याचा कल्लोळ उठला, तर त्यांत अघोरनाथांच्या हास्याचा फवारा सर्वांत वर उडायचा. अघोरनाथ हसूं लागले कीं सरोजिनीला नेहमीं वाटावयाचें कीं, 'पपांच्या हसण्यानें आपल्या बंगल्याचीं छपरें तर खालीं कोसळून पडणार नाहींत ना?'

असे क्षणांत रागावणारे—क्षणांत हंसणारे वडील पाहून सरोजिनी आपल्या भावाबहिणींना वारंवार म्हणे, " आपले पपा किती विद्वान आहेत नाहीं? पण मला नाहीं त्याची मोठी मातब्बरी वाटत? असे विद्वान देशांत थोडेफार असतीलहि, पण आपल्या पपा-इतके प्रेमळ पिते मात्र सर्व हिन्दुस्थानांत चुकून सांपडायचे नाहींत. किती भाग्यवान आपण, नाहीं?"

हा जसा अघोरनाथांबद्दलचा अभिमान सरोजिनीच्या मनांत; तशीच आपल्या आईबद्दलची मायाहि तिच्या मनांत सदा फुललेली असे— तिच्या आईचें नांव तरी किती सुंदर! " वरदा-सुंदरी-देवी "

आपल्या मुलांनीं निरनिराळ्या क्षेत्रांत पुढें यावें, असें त्या माउलीला फार वाटे. एकानें गायन शिकावें–तर दुसऱ्यानें काव्य रचावें–तर तिसऱ्यानें चित्र काढावें, अशी सरोजिनीच्या आईची उत्कट इच्छा–आणि पुढें झालेंहि तसेंच !

सरोजिनीचा भाऊ हरींद्रनाथ–त्यानें काव्यक्षेत्रांत मोठें नांव कमावलें. तिची एक बहीण सुनालिनी–तिनें चित्रपटकलेंत मोठें यश संपादिलें–आणि तशीच दुसरी बहीण सुहासिनी–राजकारणांत धडाडीनें पुढें आली आणि सरोजिनी ?........

सरोजिनीचें काव्य पाहून वरदासुंदरींचें हृदय प्रेमानें ओथंबून जाई. काव्यनिर्मितीचा आनंद काय असतो हें सरोजिनीप्रमाणें त्याहि जाणत असत. तारुण्याच्या ऐन भरांत त्यांनीं अनेक रसपूर्ण बंगाली कवनें केलीं होतीं. आपल्या ह्या कलेचा विकास, सरोजिनीच्या हृदयांत अगदीं लहानपणापासून होत आहे, हें पाहून त्या स्वत:ला धन्य मानीत.

सूर्य जसजसा आकाशांत उगवूं लागतो तसें सूर्यफूलहि अधिकाधिक विकसत जातें– सुंदर दिसूं लागतें–तसेंच सरोजिनीचें ! विद्वान पिता व प्रेमळ माता ह्यांच्या प्रेमानें सरोजिनीची बुद्धी दिवसेंदिवस विकसूं लागली आणि त्यांतून काव्याचे नवेनवे उन्मेष बाहेर पडूं लागले– साऱ्यांना दिपवूं लागले.



## २. . . . . विलायती वातावरणांत

घण् ....... घण् ....... घण् ! कॉलेजांतील घंटा घणघणली. त्या घंटेचा तो कर्कश आवाज वर्गावर्गांत शिरला—विद्यार्थिनींच्या कानावर आदळला. त्याबरोबर वर्गांतील अध्यापकांनीं पुस्तक मिटलें व ते वर्गाबाहेर पडले—आणि त्यांच्यामागोमाग गेल्या साऱ्या विद्यार्थिनी !

वर्गांत कोंडलेलीं तीं पांखरें बाहेर आलीं—चिवचिवाट करूं लागलीं—हंसण्याखिदळण्याचे आवाज हवेवर नाचूं लागले—कोंदलेला सुगंध सर्वत्र पसरूं लागला. आपापल्या घरीं जाण्यासाठीं साऱ्या विद्यार्थिनी पावलें झपाझप् उचलूं लागल्या. पण सर्वांच्या शेवटीं हळूंहळूं येणारी ही विद्यार्थिनी कोण ? तिचीं पावलें येथेंच कां रेंगाळत आहेत ? दृष्टी त्या कॉलेजच्या इमारतीवर का स्थिरावली आहे ? तिला नाहीं का ओढ लागली आपल्या घरीं जाण्याची ?—आपल्या आई-वडिलांना भेटण्याची ?

ओढ लागली नाहीं असं कसं होईल ? पण तिचे आईवडील फार दूर आहेत—सातासमुद्रापलिकडे आहेत. त्यांना ती मुलगी कशी भेटणार ?—भारतांत राहणाऱ्या आपल्या आईवडिलांना सरोजिनी कशी पाहणार ? आतां सरोजिनी लंडनला आली होती ना ? कोठें हैद्राबाद नी कोठें लंडन ! म्हणूनच कॉलेज सुटलें तरी सरोजिनी त्या कॉलेजच्या इमारतींतच घुटमळत होती.

केवढी भव्य इमारत होती त्या कॉलेजची ! त्याचें नांव होतें 'गर्टन कॉलेज !' हें कॉलेज फक्त स्त्रियांकरितांच होतें. निरनिराळ्या देशांतील हुषार, बुद्धिमान विद्यार्थिनी ह्या कॉलेजांत येत—नवनवे विचारांचे अमृतकण आपल्या कुशाग्र बुद्धीनें टिपत व त्या ज्ञानानें आपल्या मनाचा विकास करून घेत. पण त्या कॉलेजची होती एक अट ! अठरा वर्षा-

खालील विद्यार्थिनींना तेथें प्रवेश नव्हता. आणि सरोजिनी लंडनला आली तेव्हां तर तिचें वय होतें अवघें सोळा वर्षांचें !

सरोजिनी इंग्लंडला येण्यापूर्वीचा एक प्रसंग ! त्या वेळीं तिचें वय होतें फक्त तेरा वर्षांचें–त्याच्याआधींच एक वर्ष, सन १८९१ सालीं, सरोजिनीनें मॅट्रिकच्या परिक्षेचा उंबरठा ओलांडला होता. वेळ संध्या-काळची होती. अघोरनाथ आपल्या प्रयोग-शाळेंतून काम करून घरीं येत होते. आपल्याच विचारांच्या तंद्रींत एकेक पाऊल हलकेहलके टाकीत ते घरांत शिरत होते. तोंच आंतून तेरा वर्षांची त्यांची लाडकी लेक धांवत आली आणि त्यांना गदगदा हलवून म्हणाली, "पपा–पपा ! थांबा. इथंच थांबा."

अघोरनाथांनीं तंद्रींतून जागें होऊन आपल्या मुलीकडे पाहिलें. तिच्या चेहऱ्यावरून ओसंडणारे आनंदाचे नि अभिमानाचे भाव पाहून ते कौतुकानें तिच्याकडे टक लावून पाहूं लागले. सरोजिनीनें त्यांना अंगावरील कपडे काढूंहि न देतां बाहेरच्याच खुर्चीवर बळेंबळें बसविलें.

"अग, मला चहा तरी घेऊं दे." तो प्रेमळ पिता हंसत हंसत म्हणाला.

"चहा मग–जेवण मग–सारें कांहीं मग. आधीं—"

"आधीं काय ?" वत्सल वडिलांनीं विचारलें.

"आधीं ऐका. एक खूपखूप सुंदर काव्य–मी तुम्हांला वाचून दाखवतें. तें ऐका–ऐकलंच पाहिजे तुम्ही तें–अन् आवडलंच पाहिजे तुम्हांला तें........"

"काव्य–कसलं काव्य ? शेलेचं कां ब्राउनिंगचं ? पण मला कुठं आहे काव्याची चटक ?"

"चटका लागेल असंच काव्य आहे हें–अन् तें माझं आहे–मीं केलं आहे."

"तुझं काव्य ? मग वाच ! वाच !"

आणि सरोजिनीनें आपल्या काव्याच्या एकापुढें एक ओळी

आवक क्रमांक ... नों. दि. ...

वाचण्यास सुरुवात केली. त्या ओळी वाचतांना तिची अन् त्या ऐकतांना तिच्या वडिलांची जणुं समाधिच लागली.

हें काव्य तब्बल तेराशें ओळींचें होतें—भावनेनें थबथबलेलें होतें—परक्या इंग्रजी भाषेंत लिहिलेलें होतें—आणि तेंहि तेरा वर्षांच्या मुलीनें फक्त सहा दिवसांत लिहिलेलें होतें. साराच अद्भुत चमत्कार !

◆

असाच दुसरा चमत्कार सरोजिनीनें आपल्या आईला दुसऱ्या वर्षीं दाखविला.

"आई—मी तुला एक नाटक वाचून दाखवूं का ?"

"नाटक ? कोणाचं ? कालिदासाचं कीं भवभूतीचं ?"

"अग माझं—तुझ्या मुलीचं."

"भलतंच कांहीं तरी—तूं एवढी चिमुरडी पोर—चौदा वर्षांची—तुला नाटक म्हणजे काय हें समजतं तरी का ?"

"तेंच बघ आतां तूं."

असें म्हणून सरोजिनीनें दोन हजार ओळींचें आपलें नाटक आईला वाचून दाखविलें. बालमूर्ति भगवान श्रीकृष्णाच्या मुखांतील विश्वरूप पाहून यशोदामातेला जितकें आश्चर्य, कौतुक व अभिमान वाटला असेल, तितका तें नाटक ऐकून वरदासुंदरीदेवींना झाला. शेवटीं सरोजिनीला कुरवाळून गहिंवरल्या कंठानें त्या म्हणाल्या, "किती हुषार आहेस ग तूं पोरी ? तुझी दृष्टच काढली पाहिजे. तुला मी बक्षीस तरी काय देऊं आतां ?"

" बक्षीस ? मला इंग्लंडला पाठवशील ? तर मी याहून चांगलें नाटक लिहीन. सुंदर काव्यें रचीन—अन् साऱ्या जगांत माझं—तुझं नि पपांचं नांव गाजवीन."

सरोजिनीनें हें जसें आईवडिलांकडून बक्षीस मिळविलें; तसेंच तेथील राजाकडूनहि ! वयाच्या सोळाव्या वर्षीं तिनें एक पर्शियन नाटक लिहिलें. तें तेथील राजानें—म्हणजे निजामानें—वाचलें. निजाम थक्क

झाले आणि त्यांनीं सरोजिनीला इंग्लंडला जाण्यासाठीं एक शिष्यवृत्ति बहाल केली.

असे यशाचे व कीर्तीचे पंख लावून, सरोजिनी सन १८९५ सालीं—वयाच्या सोळाव्या वर्षीं लंडनला आली.—लंडनमध्यें आल्यावर पहिलीं दोन वर्षें सरोजिनीनें किंग्ज कॉलेजांत शिक्षण घेतलें. पण कॉलेजच्या शिक्षणाकडे तिचें लक्ष होतें कोठें? परीक्षा पास होण्यापेक्षां काव्य करण्याचें तिला वेड ! काव्य वाचावें, काव्य लिहावें व काव्य गावें हा तिचा छंद ! "देव खाते—देव पिते—देवावरी झोपते" अशी जनाबाई-सारखी सरोजिनी काव्याशीं एकतान झाली.

ह्यामुळें इंग्लंडमधील वातावरणाच्या धर्तीवर तिनें कित्येक इंग्रजी कविता लिहिल्या व अनेक कविता वाचल्याहि ! काव्य करतां करतां दोन वर्षें कशीं भुर्रकन् उडून गेलीं, हेंहि सरोजिनीच्या लक्षांत आलें नाहीं ! ती ज्याची वाट पहात होती, तो दिवस उजाडला. तिनें अठराव्या वर्षांत आतां पदार्पण केलें होतें.—त्यामुळें तिनें गर्टन कॉलेजांत नांव दाखल केलें. तेथें तिनें अभ्यासाला कोणता विषय निवडला? दुसरा कोणता? —काव्य !

सरोजिनीचा त्या कॉलेजांतील हा पहिलाच दिवस ! त्यामुळें तिला तेथील साऱ्या वस्तु नवीन वाटत होत्या. त्या विद्यार्थिनी—ते अध्यापक—ती कॉलेजची इमारत—त्यापुढील तो सुंदर तलाव—सारेंच नवीन ! हा नाविन्याचा ठसा सरोजिनी आपल्या दृष्टींत सांठवीत होती—मनांत ठसवीत होती. कॉलेज सुटल्याची घंटा झाली तरी तेथेंच तिचें मन रेंगाळत होतें—तिचे पाय तेथेंच घोटाळत होते—

नेत्र-संपुष्टांत हें सौंदर्य सांठवून सरोजिनी घरीं आली. ती लंडनमध्यें एका सुसंस्कृत इंग्रज कुटुंबांत रहात होती. घराचें फाटक उघडून सरोजिनी भरभर आंत येऊं लागली. इतक्यांत तिची दृष्टी घराच्या सज्जांत उभ्या असलेल्या वयस्कर माणसाकडे वळली. 'हे गृहस्थ कोण असावेत बरें?' असा प्रश्न आपल्या मनाला विचारीत, सरोजिनी त्या गृहस्थांच्या जवळसुद्धां येऊन ठेपली. त्यांच्याकडे पाहून

तिनें स्मित केलें. " नमस्ते " असें म्हणून तिनें त्यांना नमस्कार केला. तिच्या धीटपणाचें त्या वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध टीकाकाराला कौतुक वाटलें— लंडनमधील त्या प्रसिद्ध टीकाकाराचें नांव होतें सर एडमंड गॉस !

सरोजिनी ज्या कुटुंबांत रहात होती, तेथें गॉससाहेबांचें वारंवार येणेंजाणें असे. सरोजिनीनें त्यांच्याबद्दल अनेकदां घरच्या मंडळींकडून ऐकलें होतें, पण त्यांना पाहण्याचा प्रत्यक्ष योग आज येत होता. सरोजिनीनें तेथेंच असलेली एक खुर्ची पुढें ओढली नि 'बसा ना.' असें गॉससाहेबांना ती आदरानें म्हणाली.

खुर्चीवर बसत बसत गॉससाहेबांनीं विचारलें, " आपलं नांव कळेल का ? "

" सरोजिनी चट्टोपाध्याय " सरोजिनीनें उत्तर दिलें.

" कुठून आलांत तुम्ही ? "

" भारतांतून. "

" तुम्हाला पाहिल्यावर मला तसं वाटलंच म्हणा. "

" काय वाटलं ? "

" कीं तुमच्या चेहऱ्यावर एक वेगळंच पाणी खेळतें आहे— तुम्ही आमच्या आंग्ल युवतीपेक्षां अगदीं वेगळ्या दिसतां आहांत. "

" तें कसं ? " सरोजिनीनें आश्चर्यानें विचारलें.

" सांगूं ?—आंग्ल युवतीचें व्यक्तिमत्व मला लिलीच्या फुलासारखं वाटतं, तर माझ्या दृष्टीनें तुम्ही कमलपुष्प आहांत—त्यासारखं तुमचं व्यक्तिमत्व आहे. "

गॉससाहेबांची ह्या तुलनेंतील सौंदर्यदृष्टी पाहून सरोजिनी आनंदून गेली—टीकाकाराला योग्य असलेली ती तार्किकता पाहून सरोजिनी भारून गेली व गॉसना म्हणाली,

" मी कांहीं इंग्रजी कविता लिहिल्या आहेत—परीक्षा पास होण्यापेक्षां कविता करण्याचाच मला जास्त छंद आहे. तेव्हां माझी अशी विनंति आहे आपल्याला—— "

" विनंती ? कोणती ? " गॉसनीं हंसत हंसत विचारलें.

" माझ्या कविता आपण वाचून पहाव्यात. "

" अवश्य—आणा पाहूं तुमच्या त्या कविता. "

असें गॉसनीं म्हणतांच सरोजिनी घाईघाईनें आंत गेली व तिनें आपल्या प्राणापेक्षां प्रिय असलेला आपला इंग्रजी काव्याचा संग्रह आणला व तो गॉससाहेबांच्या हवालीं केला. गॉस तो संग्रह घेऊन जाण्यास उठले व जातांना सरोजिनीला म्हणाले, " उद्यांच येईन मी आपल्या कविता वाचून. "

" उद्यां ? उद्यांच ? काय सांगतील ते उद्यां ? " सरोजिनीचें भावपूर्ण मन म्हणूं लागलें.

गॉससाहेब गेल्यावर सरोजिनीचीं विचारचक्रें सुरू झालीं. भीति व आनंद ह्यांचें तांडवनृत्य तिच्या मनांत सुरू झालें.

" गॉस हे केवढे मोठे टीकाकार ! ते आपल्या कविता वाचून काय म्हणतील ? स्तुतीचीं सुमनें उधळतील का टीकेचा अग्निवर्षाव करतील ?" अशा विचारांत दुसरा दिवस उजाडला. सकाळीं उठल्यापासून सरोजिनीची छाती धडधडत होती. मोठ्या उत्सुकतेनें ती गॉससाहेबांची वाट पहात बसली—सारखी आंतबाहेर करूं लागली. इतक्यांत हातांत वही घेऊन हंसत हंसत येत असलेले गॉससाहेब सरोजिनीला दिसले. त्यासरशीं सरोजिनी धांवत धांवत पुढें आली—तिनें त्यांचें हर्षभरानें स्वागत केलें—त्यांना बसायला खुर्ची दिली. आतां गॉससाहेब काय म्हणताहेत ह्याकडे सरोजिनी कान टवकारून बसली. गॉसनीं कवितेची वही उघडली व सरोजिनीला ते म्हणाले—

"मीं तुमच्या सर्व कविता वाचल्या—अगदीं बारकाईनें काळजीपूर्वक वाचल्या. त्यांतील इंग्रजी वृत्तांची रचना, छंद नि अलंकार हे तुम्हांला फारच चांगले साधले आहेत. त्याबद्दल मला तुमचं कौतुक वाटतं."

गॉससाहेबांचें हें मत ऐकून सरोजिनीच्या आनंदाला पारावार राहिला नाहीं. तिनें अधीरतेनें त्यांना विचारलें, "खरंच ? खरंच आवडल्या माझ्या कविता तुम्हांला ?"

"थांबा! स्तुतीनं अशा हुरळून जाऊं नका. तुमच्या कवितेचं मला बहिरंग आवडलं, पण अंतरंग मात्र नाहीं — त्यामुळं माझी फार निराशा झाली."

"कां बरं?" सरोजिनीनें विचारलें.

"तुमच्या काव्यांतील सगळे विषय परके आहेत. हें काव्य सुंदर आहे; पण स्वतंत्र नाहीं—उत्तम आहे; पण उसनें आहे. त्या कवितेवर इंग्रजी वातावरणाचा रंग चढला आहे—त्यांतील सृष्टी व दृष्टी परकी आहे." गॉसनीं आपलें मत सांगितलें.

"ती कशी, हें उदाहरणांनीं सांगूं शकाल का?" सरोजिनीनें उत्सुकतेनें विचारलें.

"हो, कां नाहीं?" असें म्हणून गॉस एकेक पान उलटूं लागले—त्यांत केलेल्या खाणाखुणांवर आपलें बोट ठेवून सरोजिनीला म्हणाले, "इंग्लंड हा देश तुम्हांला भारतापेक्षां जास्त जवळचा वाटतो का?"

"छे:! मुळींच नाहीं;—माझा भारत मला सर्वांत जास्त प्रिय आहे."

"हो ना? मग तुम्ही काव्याचे विषय इंग्लंडमधलेच कां उचललेत? हें पहा, ही तुमची कविता आमच्या इंग्लंडमधील चर्चवर आहे. दुसरी ही कविता—राबीन पक्ष्यावर आहे—कांहीं कवितेंत तुम्ही इंग्लंडमधील वृक्षांचें वर्णन केलें आहे.—हें काव्य वाचून काय वाटतें, माहीत आहे?"

"काय?"

"इंग्रज वाचकांसाठीं एका इंग्रज कवयित्रीनें लिहिलेलं हें काव्य आहे. पटतं माझं म्हणणं?"

"पटलं मला—माझी चूक कळून आली मला—पण ती सुधारावयाची कशी?"

"सांगतों—तुम्ही भारतीय आहांत ना? मग तुमच्यासारख्या भारतीय स्त्रीनें भारतीय विषयच काव्यासाठीं निवडावयाला नकोत का? तुमच्या देशांतील निसर्गरम्य स्थळें—तेथील लोक—त्यांच्या चालीरीति—हे

जे सर्व आम्हां परकीय लोकांना अज्ञात आहे, त्याची ओळख तुम्ही आपल्या काव्यांत करून दिली पाहिजे. तुमचं काव्य इंग्रजी भाषेंत असलं तरी चालेल; पण त्यांत भारतीय संस्कृतीचं प्रतिबिंब उमटलं पाहिजे–आणि सरोजिनी ! तुम्हीं ह्या पद्धतीनं लिहिलंत तरच तुमच्या काव्यांत आत्मीयता येईल–जीवंतपणा येईल नि तुम्ही खऱ्याखुऱ्या हिन्दी कवियित्री व्हाल. परकीय दृष्टीकोनांतून लिहिलेलं काव्य कधींहि चिरंजीव होत नसतं–हें लक्षांत ठेवा. "

गॉसनीं ती वही मिटली व सरोजिनीला परत केली. ती वही हातांत घेत सरोजिनी कृतज्ञतेनें म्हणाली, "तुमच्यासारख्या थोर टीकाकारांचं मार्गदर्शन मला निःसंशय फायद्याचं ठरेल. आतां यापुढं मी माझं काव्य भारतीय वातावरणांतच बसवीन. भारतांतील पर्वत–नद्या, झाडें–वेली, फुलें–फळें, उपवनें–देवालयें–हेच माझ्या ह्यापुढच्या काव्याचे विषय ! खरोखर तुम्हीं मला काव्यमंदिराचा सोनेरी उंबरठाच ओलांडायास शिकविलं."

" सोनेरी उंबरठा " हा सरोजिनीचा काव्यसंग्रह लौकरच पुढें बाहेर पडला–साऱ्या जगानें त्याचें कौतुक केलें.

सोनें अग्नींत टाकल्यावर जसें तावून–सुलाखून निघतें, तशी सरोजिनींची प्रतिभा ह्या सुप्रसिद्ध टीकाकाराच्या सूक्ष्म दृष्टींतून तपासली गेली व तिला जास्त तेज चढलें.

अशा सुसंस्कृत वातावरणांत तीन वर्षे कशी झर्कन् उडून गेलीं, हें सरोजिनीला कळलेंहि नाहीं. आपला विलायतेंतील शिक्षणक्रम संपवून ती हिन्दुस्थानांत परत यावयास निघाली. येतांना प्रकृतिस्वास्थ्यासाठीं तिनें इटली देशांतहि कांहीं दिवस मुक्काम केला.

इटली ह्या देशावर निसर्गानें सौंदर्याचा वरदहस्त ठेवला आहे. त्या रमणीय देशांत सरोजिनीच्या काव्य-प्रतिभेला उजळा मिळाला. तेथील प्राचीन मूर्ति पाहून ' आपण देवदेवतांच्या सहवासांतच रहात आहोंत.' असें तिला वाटूं लागलें ' देवांचें सामर्थ्य व देवतांचें सौंदर्य ह्यांचा अनुभव आपण घेत आहोंत. ' ह्या कल्पनेनें तिची सौंदर्यदृष्टी निवली.

तेथें असतांना सरोजिनीनें भोवतालच्या लोकस्थितीचें सूक्ष्म निरीक्षण केलें. त्यासाठीं तिनें अनेक स्त्रीपुरुषांचा परिचय करून घेतला. त्या देशांतील चित्रसंग्रहालय—शिल्पसंग्रहालय—अशा अनेक सुंदर स्थळांना भेटी दिल्या व आपल्या ज्ञान—भांडारांत या अनुभवांची भर घातली.

आंतरराष्ट्रीय दृष्टी व व्यापक विचार ह्यांची शिदोरी बरोबर घेऊन सरोजिनी सन १८९८ मध्यें हिन्दुस्थानांत परत आली—आपल्या आईवडिलांना भेटण्यास आतुर झाली.

परदेशीं जाऊन, यश संपादून आलेल्या आपल्या कन्येचें स्वागत करतांना कोण धांदल उडाली त्या मातापित्यांची ! दाराशीं मोटारचा हॉर्न वाजला. मोटार थांबली. सरोजिनी मोटारींतून उतरली. धांवत धांवत पुढें येऊन तिनें प्रथम आपल्या आईला वांकून नमस्कार केला.

“ आतां चांगला नवरा मिळूं दे म्हणजे झालं. ” असा वरदासुंदरीदेवीनें वर देऊन सरोजिनीच्या गालावरून हात फिरविला. हा आशीर्वाद घेऊन सरोजिनी वळली वडिलांकडे—तिनें वडिलांना कडकडून मिठी मारली. त्या स्पर्शानें अघोरनाथांच्या शरिरांतून सुखाच्या व वात्सल्याच्या सहस्र लहरी संचारल्या. हें दृश्य वरदासुंदरीदेवी आपल्या अश्रूंच्या पडद्यांतून पहात होत्या. त्यांच्या प्रेमाश्रूंना ती डोळ्यांचीं तळींसुद्धां त्यावेळीं अपुरी वाटूं लागलीं—नी त्यांच्या डोळ्यांतून दोन थेंब खालीं ओघळले. तोंच सरोजिनीचें आपल्या आईकडे लक्ष गेलें. ती आईजवळ जाऊन म्हणाली, ‘आई ! तूं रडतेस ? तीन वर्षांचा माझा विरह सहन झाला नाहीं तुला ?’

तोंच अघोरनाथ आपल्या पत्नीकडे पहात मोठमोठ्यानें हंसत म्हणाले,

“ अहो, तीन वर्षांचा विरह सहन होत नाहीं—मग मुलीचं लग्न झाल्यावर कसं व्हायचं ? त्यावेळीं अश्रूंचा महापूरच लोटावयाचा !”

# ३. . . . . . . . . क्रान्तिकारक विवाह

आज सरोजिनीनें दबतदबतच घरांत प्रवेश केला. आपल्या पपांशीं आपण आज कसंकसं बोलायचं, हें ती मनांत वारंवार घोळवूं लागली. अघोरनाथांशीं बोलतांना लग्नासारख्या नाजूक विषयाची प्रस्तावना कशी करायची? पपांचे तर्कशुद्ध प्रश्न आपल्या बुद्धीनें कसे परतवून लावायचे—हें सरोजिनी ठरवूं लागली.

रास्तच आहे सरोजिनीची तशी स्थिति होणें. तिनें आतां एकोणिसाव्या वर्षांत पदार्पण केलें होतें. यौवनाच्या यक्षसृष्टींत रमणाऱ्या सरोजिनीच्या मनाची अशी अवस्था होणें साहजिकच नाहीं का? प्रेमाच्या जादूनें तिचें जीवन भारून गेलें होतें. प्रेम हें जीवनाचें जीवन आहे ना? सारें जीवन उजळून टाकणारी प्रेम ही एक विद्युल्लता आहे ना? अशा प्रेमाचा स्पर्श झाला कीं पाषाणाचीं फुलें होतात व मरणाचें जीवन होतें. त्या उत्कट प्रेमाचा अनुभव कविमनानें सरोजिनी घेत होती.

१८९८ सालीं विलायेतहून सरोजिनी हिन्दुस्थानांत परत आली. त्या वेळेस तिची ओळख डॉ. गोविंद राजूलु नायडू ह्यांच्याशीं झाली. परिचयानंतर त्या ओळखीचें रूपांतर प्रेमांत झालें. मुग्ध कळीची एकेक पाकळी उमलून त्यांतून एक टवटवीत फूल निर्माण व्हावें, त्याप्रमाणें सरोजिनीचें हें प्रेम विकसत गेलें. मुग्ध प्रेमाला विवाहाची वाचा फुटली—तिनें डॉ. नायडूंशीं विवाह करण्याचें ठरविलें. विवाहाशिवाय प्रेमाला पूर्णता येणार तरी कशी? विवाह म्हणजे हृदय व बुद्धि ह्यांचें मधुर मिश्रण आहे—भावना व विचार ह्यांचें सुरेख मीलन आहे.

यावेळीं विचारांचीं वादळें सरोजिनीच्या मनांत उठत होतीं—आपल्या विवाहाचा निश्चय आज ती आपल्या माता-पित्यांच्या कानांवर

घालणार होती–त्यांची विवाहाला संमति मिळविणार होती. आणि त्यांनीं संमति नाहीं दिली तर ?

पण आपल्या लाडक्या कन्येला विवाहाची संमति न द्यायला सरोजिनीचे माता-पिता कांहीं तिचे वैरी होते थोडेच ? त्यांनाहि या सुखद वार्तेनें आकाश ठेंगणेंच होणार होतें. आणि आपल्या जामाताचा चेहरा पाहण्यास वरदासुंदरीदेवी तरी काय कमी उत्सुक होत्या ?

म्हणूनच सरोजिनी प्रथम गेल्या आपल्या आईकडे. त्या आईला म्हणाल्या, " आई ! मी विलायतेंहून परत आल्यावर तूं मला काय आशीर्वाद दिला होतास ? आठवतोय् तुला ? "

" न आठवायला काय झालं ? आमच्या सरोजिनीला चांगला नवरा मिळूं दे असंच नाहीं का मला वाटणार ? " वरदासुंदरीदेवी म्हणाल्या.

" मग आई, आज तो तुझा आशीर्वाद खरा झाला आहे. "

" म्हणजे ? म्हणतेस तरी काय ? तुझं लग्न ठरलं ? नी मला ग कसं कळलं नाहीं ? बरीच लबाड आहेस कीं–बरं, पण नांव तरी कळूं दे ह्या विद्वान कन्येच्या पतिदेवाचं ! "

"गोविंद राजुलु नायडू–हें त्यांचें नांव. फार फार हुषार आहेत ते बुद्धीनें. म्हणूनच त्यांना डॉक्टर ही पदवी मिळालीय्–आणि त्यांचा स्वभाव तरी किती मधुर. "

"अग, अजून लग्न झालं नाहीं तर एवढी स्तुती, मग पुढं काय ? कुठले रहाणारे आहेत हे नायडू ? "

" त्यांच्या नांवावरूनच नाहीं का लक्षांत येत तुझ्या आई ? मद्रासचे रहिवासी आहेत ते. "

सरोजिनीचें हें उत्तर ऐकून वरदासुंदरीदेवी जरा रागानेंच म्हणाल्या, " सरोजिनी, लग्न ठरवतांना कांहीं मागलापुढला विचार केला आहेस का तूं ? अग, आपण बंगाली व ते मद्रासी–कसं जमायचं

आपलं ? " वरदासुंदरींच्या भुंवया जरा वक्र झाल्या. कपाळावर एक अठी उमटली.

सरोजिनी लाडक्या स्वरांत म्हणाली—

" आई, हें ऐकून तुला आश्चर्य वाटलं ? पण थांब—आणखी एक आश्चर्याचा धक्का देणार आहे मी तुला—डॉ. नायडू हे मद्रासी तर आहेतच, पण त्याबरोबर ते ब्राह्मणेतरहि आहेत—"

" लाज नाहीं वाटत असं कौतुकानं सांगतांना ? " असें फाड्दिशीं बोलून अघोरनाथ आंत आले नि पुढें म्हणाले, " मघांपासून ऐकतों आहे तुम्हां मायलेकींच्या गुजगोष्टी—तुझी आई ऐकून घेईल हें सारं, पण मला मुळींच खपायचं नाहीं—मद्रासी ब्राह्मणेतराशीं माझ्यासारख्या उच्च कुळांतील मुलीचं लग्न ? अशक्य. केवढ्या प्रतिष्ठेनं आम्हीं आमचे दिवस घालविले या हैद्राबादेंत ? आतां तुझ्या या कृत्यानं अब्रू तरी राहील का आमची ? "

" पण पपा........ " सरोजिनी हळूंच म्हणाली.

" कांहीं बोलूं नकोस माझ्यापुढं—या लग्नाला माझा पूर्ण विरोध आहे. आणि लक्षांत ठेव,—कांहीं झालं तरी हें लग्न मी होऊं देणार नाहीं. "

" आणि मी हें लग्न केल्याशिवाय रहाणार नाहीं—त्यासाठीं कितीहि संकटांचे पर्वत नि अडचणींच्या दऱ्या वाटेंत आल्या, तरी मी माझ्या प्रेमाच्या जोरावर सहज पार करीन. प्रेम हें अनिर्बंध आहे. त्याला ना जातीचं बंधन ना धर्माचं बंधन ! "

"पुरें कर तुझं हें काव्य ! आपल्याला प्रत्यक्ष जीवन जगायचं आहे." अघोरनाथ म्हणाले.

"त्या जीवनाकरितांच मी बोलत आहें." सरोजिनी मृदु स्वरांत म्हणाली," आपल्या मुलीचं जीवन सुखी व्हावं, आनंदी असावं, असं नाहीं का वाटत तुम्हांला पपा ? डॉ. नायडू यांच्याशीं विवाह करूनच मी सुखी होईन."

सरोजिनीचें लाघवी बोलणें व दृढ निश्चय पाहून वरदासुंदरीचें मातृहृदय विरघळलें. त्या अघोरनाथांना म्हणाल्या, "मुलीची एवढी इच्छा आहे तर मग होईना का तिच्या मनासारखं— तिचं सुख तेंच आपलं सुख नाहीं का? आपणच तिला लहानपणापासून पाश्चात्त्य पद्धतीचे धडे दिले— विलायतेला पाठविलं नि स्वातंत्र्याचं बीज तिच्या मनांत रोवलं. मग आतां विरोध कशासाठीं?"

"मग पपा, देणार ना मला परवानगी? आपल्या लाडक्या लेकीची एवढी मागणी नाहीं का पुरवणार? बोला ना? गप्प कां?" सरोजिनी प्रेमळपणें विचारूं लागली.

"अग पोरी, आतां मी बोलूं तरी काय? तुझ्या या धाडसी विचारानं माझी वाचाच बंद पडली आहे. तूं सुजाण आहेस— जग पाहिलेली आहेस— शिकली-सवरलेली आहेस आणि तुझी समजशक्ति तर अलौकिक आहे. तुझ्या निर्णयाला मी कसा विरोध करूं? तुझा निश्चय सती सावित्रीसारखा अढळ आहे. त्याला विरोध करून मी तुला दु:ख कां देऊं?" अघोरनाथ म्हणाले.

वरदासुंदरी इकडे तिकडे पहात शंका काढूं लागल्या,

"आम्हां दोघांना पटलं ग तुझं म्हणणं. पण शहरांतील लोक काय म्हणतील? आजचा काळ तुला माहीत आहे ना? आपला समाज रूढीच्या चिखलांत कसा रुतला आहे, हें तुला दिसतंच आहे."

पत्नीच्या बोलण्याला दुजोरा देत अघोरनाथ म्हणाले, "आणि त्या रूढीच्या वाटेवरून जरा कुठं दुसरीकडे पाऊल पडलं, कीं गेलीच या सनातनी लोकांची तळपायाची आग मस्तकाला."

"म्हणजे जशी आतां तुमची गेली होती तशी ना?" सरोजिनी मिस्किलपणें म्हणाली.

आईवडिलांची संमति मिळाल्यावर सरोजिनीच्या अंत:करणांत आशांचे लाख दिवे लखलखूं लागले! तिच्या कानांत आनंदाच्या सहस्र सनया वाजूं लागल्या! तिच्या डोळ्यांपुढें भावी संसारसुखाचीं शेंकडों कारंजीं उडूं लागलीं!

सरोजिनीचा हा आंतरजातीय व आंतरप्रांतीय विवाह म्हणजे त्या काळांत मोठें धाडस होतें. अर्ध्या शतकाच्या पूर्वी तिनें केलेल्या या धाडसानें त्या वेळच्या समाजाला धरणीकंपाचाच धक्का बसला. त्या वेळीं जातिबंधनें तोडणें हें लोखंडाच्या शृंखला तोडण्याहूनहि कठिण होतें— परधर्मांत गेलेल्या मनुष्याइतकाच तिटकारा परजातीय लग्न केलेल्या माणसा-बद्दल समाजाला वाटत होता. तें पाप आहे असें जो तो मानी. आणि स्त्रियांची स्थिति तर काय?

त्यांना शिक्षणाची बंदी होती. त्यांचे विवाह बाल वयांत होत असत नि लग्नाचें स्वातंत्र्य तर मुळींच नव्हतें. पतीच्या निधनानंतर त्यांना हाल भोगावे लागत. एकूण, स्त्रिया त्यावेळीं घरांतील मुकी जनावरें होत्या. डोळे असून आंधळ्या—कान असून बहिऱ्या व जीभ असून मुक्या !

भारतांत होणारी स्त्रियांची अवहेलना पाहून राजा राममोहन राय हळहळले, त्यांची दुर्दशा बघून विवेकानंद तळमळले व त्यांचे हाल पाहून आगरकर कळवळले. त्यासाठीं या लोकांनीं आपल्या लेखणीला शस्त्राची धार चढविली आणि त्या शस्त्रानें सनातन्यांचे बुरसलेले विचार कापून काढले, स्त्रियांना प्रगतीची आशा दाखविली, सुधारणेचा मार्ग दाखविला.

अशा विरोधाच्या झंझावातांशीं झुंजत झुंजत सरोजिनीचें लग्न डॉ. नायडू ह्यांच्याशीं झालें. सरोजिनी चट्टोपाध्याय आतां सरोजिनी नायडू बनल्या. हा आंतरजातीय व आंतरप्रांतीय विवाह ब्राह्मो-पद्धतीनेंच झाला. त्या वेळेस सर्व हैद्राबादेंत मतामतांचा गलबला माजला. टीकेचा अग्निवर्षाव झाला व विरोधाचें वावटळ उठलें. कांहींनीं तर त्यांच्या घरावर बहिष्कारहि घातला. परंतु शूर मनोवृत्तीनें सरोजिनीनें हें सारें शांतपणें सहन केलें व आपल्या संसाराची नौका यशस्वीपणें पुढें हांकारली.

" प्रियकराचें वैभव व प्रेम ह्यांचें प्रतिबिंब पहाण्यासाठीं माझे डोळे आहेत, त्याचा पराक्रम गाण्यासाठीं माझा गळा गोड आहे, त्याच्या विश्रांतीकरितां व सुखाकरितां माझें हृदय मृदु आहे." असें म्हणणाऱ्या

सरोजिनी प्रेमाचें माहात्म्य सांगतांना म्हणतात कीं, " प्रेमाच्या जोरावर मी मोठमोठया डोंगरांना शंखशिंपले करीन, चंद्राला फुलाप्रमाणें कुस्करीन आणि नदीला दंवबिंदूइतकं चिमुकलं रूप देईन. "

अशा प्रेम–मंदिराकडे जाण्यासाठीं सरोजिनी आतां विवाहाच्या प्रवेशद्वारांतून आंत जात होत्या–तेंहि मोठया धाडसानें, दृढनिश्चयानें व अदम्य उत्साहानें !

विवाहानें वर्ज्य झालेलें सरोजिनीचें घर कालाच्या विस्मृतीनें पुन: गजबजूं लागलें. त्यांचें घर म्हणजे सामाजिक चळवळीचें माहेरघर बनलें. सरोजिनीचा स्वभाव मोकळा असे, बोलणें प्रेमळ असें व शिष्टाचारांत अगत्य असें. त्यामुळें त्यांचा मित्रपरिवारहि मोठा असे. त्यांच्या घरीं सनातनी लोक जसे येत, तसंच सुधारकहि येत असत, शांतपणें चर्चा करीत असत; व एकमेकांच्या विचाराची देवघेव करीत असत.

आकाशापर्यंत भरारी मारणारें सरोजिनीचें मन विवाहानंतरहि चार भिंतींच्या घरांत स्वस्थ कसें बसणार ? आपल्या व्यक्तिप्रेमाला विश्व-प्रेमाची व्यापकता यावी ही त्यांची तळमळ ! त्यासाठीं त्यांनीं हैद्राबादेंत आपल्या समाजसेवेचा श्रीगणेशा गिरविण्यास सुरवात केली. सरोजिनींना सौंदर्याची आवड व कलेची दृष्टी असल्यामुळें त्या निरनिराळ्या कला-वंतांचा मेळावा आपल्या घरीं भरवूं लागल्या, व त्यांच्या सहवासांत सरोजिनीं आपली प्रगति करून घेऊं लागल्या.

सरोजिनींच्या समाजकार्याचें महत्त्वाचें अंग म्हणजे त्यांनीं स्त्रियांमध्यें केलेली विचारांची जागृति ! त्यावेळीं हैद्राबादेंतील बहुतेक स्त्रिया पडदानशीन होत्या. त्यांनीं आपला चेहरा बुरख्यांत झांकला पाहिजे अशी चाल तेथें होती. सरोजिनींनीं ठरविलं कीं, आपण ह्या अज्ञानाच्या खाईंत पडलेल्या स्त्रियांना वर काढलें पाहिजे—त्यांना ज्ञानाचा दीप दाखविला पाहिजे. त्यासाठीं त्या पडदानशीन स्त्री–समाजांत मिसळूं लागल्या–त्यांचीं गाऱ्हाणी ऐकूं लागल्या–त्यांना विचाराची दिशा दाखवूं लागल्या. हिन्दी स्त्रियांची उन्नति या ध्येयाचा–ध्रुवतारा सारखा दृष्टीसमोर ठेवून सरोजिनी रात्रंदिवस खपूं लागल्या-प्रत्येक स्त्री-दास्य-विमोचन चळवळींत

आघाडीवर राहूं लागल्या. जेथें जेथें त्या जात तेथें तेथें स्त्रीस्वातंत्र्याचा प्रश्न सरोजिनी हिरीरीनें मांडूं लागल्या. मग ती कलकत्त्याची सभा असो वा मद्रासमधील सामाजिक परिषद असो ! सर्व स्त्रियांचें सरोजिनी स्फूर्तिस्थान बनल्या.

पुढें हिंदु-मुलिस्म ऐक्यासाठीं त्या प्रयत्न करूं लागल्या. स्त्रियांची उन्नति व हिंदु-मुस्लिम ऐक्य याला उठाव मिळण्यासाठीं सरोजिनींनीं पुढें समाजकारणाचें लहानसें प्रांगण ओलांडलें व त्या राजकारणाच्या रणमैदानांत उतरल्या. दोन नद्यांचा जेथें संगम होतो, तेथें त्या नद्यांचें पाणी एकमेकांत मिसळून जातें—एकरूप होतें. त्याप्रमाणें सरोजिनींचें समाजकारण व राजकारण ह्यांच्या सीमारेषा एकमेकींशीं संकलित झाल्या व त्यांच्या जीवनांत या दोन शक्तींचा सुंदर संगम झाला.



# ४. . . . . . . बुलबुलाचे बोल

आकाशांत पौर्णिमेचा चंद्रमा उगवलेला पाहून पृथ्वीवरील सागराला आनंदानें भरती येते. आपल्या एकाहून एक उंच उंच अशा लाटांचा जिना करून तो सागर आपल्या मुलाला—चंद्राला—जणुं भेटावयासच जात असतो. त्या वेळीं जिकडे पहावें तिकडे रुपेरी साम्राज्य पसरलेलें ! आकाश रुपेरी—सागराचें पाणी रुपेरी ! या चंदेरी दुनियेंत जें सौंदर्य सांठविलेलें असतें, तें सामान्य माणसाच्या दृष्टीला दिसत नाहीं. त्याला कविची सौंदर्य-दृष्टीच पाहिजे.

पहांटेच्या वेळीं बालरवि जेव्हां दोन डोंगरांतून हळूंहळूं वर येतो—आकाशावर गुलाल उधळतो—पृथ्वीवर तेज पसरवितो—त्या वेळचा आनंद फक्त कविच जाणूं शकतो—सामान्य मनुष्य नव्हे !

चांदण्याचा पारिजातकाच्या फुलांप्रमाणें पडलेला सडा पाहून कविच फक्त मोहित होतो. त्यांतील रम्यता सामान्य मनुष्य कसा जाणूं शकेल ?

दंवानें भिजलेल्या गुलाबाची अलौकिक शोभा कवीचें मनच टिपूं शकतें. चिमुकल्या झुळझुळ वाहाणाऱ्या झऱ्याचं स्वर्गीय संगीत ऐकावयाला कवीचेच कान पाहिजेत. गोजिरवाण्या बालकाचें निर्भर हास्य पाहून फक्त कवीच वेडा होतो. फार काय ? गवताच्या पात्याचें सामर्थ्य जाणण्याची शक्तीहि कवीजवळ असते.

ही कवीची दिव्य दृष्टि व दिव्य शक्ति सरोजिनींजवळ होती.

सर्वसामान्य माणसें समुद्रावर जातात पण नुसती हवा खाऊन परत येतात, कोजागिरीस एकत्र जमतात व चंद्र न पहातांच निघतात, पहाटें उठतात पण सूर्याचें सोनेरी बिंब न बघतांच सहल करतात,

बागेंत जातात व डोळे मिटून देवपूजेसाठीं फुलें खुडतात नी परडींत टाकतात, रानांत जातात नी झऱ्याचें फक्त पाणी पिऊन परत येतात.

परंतु निसर्गाचें लपलेलें हें सौंदर्य कवि आपल्या भावपूर्ण मनानें वेचून घेतो व कलात्मक दृष्टीनें काव्यांत गुंफतो. कवि म्हणजे पृथ्वीवरचे राजहंसच ! पृथ्वीवरील सौंदर्याचे मोती टिपण्यांत तरबेज ! अशीच भूमिका सरोजिनीची काव्य करतांना असे.

आकाशांतील मेघांचा गडगडाट ऐकून मोर आनंदानें थय्थय् नाचूं लागतो, आपला नयनमनोहर पिसारा पसरतो नी आपल्या त्या सौंदर्यानें साऱ्यांना नाचावयास लावतो. किती मोहक असतो तो पिसारा ! एकेका पिसाची ती ठेवण ! तें रंगकाम ! ती जिवंत चमक ! डोळेच दिपून जातात तें पाहणाऱ्याचें !

तशी स्थिति होते सरोजिनींचें काव्य वाचतांना. त्यांची काव्य-प्रतिभा लहानपणींच—वयाच्या ११ व्या वर्षींच—बहरून आली. " विद्या-लयांतील परीक्षा पास होण्यापेक्षां काव्य करणें ही माझी प्रबळ इच्छा आहे. " असें सडेतोड उत्तर त्यांनीं गॉससाहेबांना मागेंच दिलेलें होतें. इंग्लिश कवि गटे किंवा कीटस् यांसारखे आपण मोठें व्हावें ही त्यांच्या मनाची महत्त्वाकांक्षा !

या त्यांच्या महत्त्वाकांक्षेची पहिली झुळूक दिसून आली १९०५ सालीं ! सरोजिनींचा पहिला काव्यसंग्रह त्यावेळीं प्रसिद्ध झाला. त्याचें नांव " Golden Threshold " ( सोनेरी उंबरठा ) ! आपल्या काव्य-गुच्छाचें हें नांव ठेवण्यांत सरोजिनींची रसिकता दिसतें. " सोनेरी उंबरठा " हें त्यांच्या घराचें नांव होतें. त्यामुळें आपल्या घराची आठवण व गॉससाहेबांबद्दलचा आदर या दोन्ही गोष्टी या नांवानें सिद्ध होतात.

त्यांचें हें पुस्तक फार लवकर लोकप्रिय झालें. एकामागून एक अशा दहा आवृत्त्या निघाल्या. त्यांच्या काव्यांतील कल्पनेचा चमचमाट व रम्य भावनांची खळबळ यांमुळें जगांतील सर्व रसिकांच्या मनाची पकड या पुस्तकानें घेतली. ह्या अर्थसौंदर्याबरोबरच निर्दोष वृत्तरचना व ललित शब्दयोजना यांचीहि जोड त्या काव्याला मिळाली होती.

सरोजिनींनें आपला हा पहिला काव्यसंग्रह कोणाला अर्पण केला ? तर ज्यांनीं त्यांचें काव्य बारकाईनें वाचून व त्यांतील दोष दाखवून, त्यांच्या काव्यप्रतिभेला स्फूर्ति दिली, त्या सुप्रसिद्ध टीकाकारांना — एडमंड गॉस यांना ! त्यांनींच सरोजिनींना काव्याच्या सोनेरी उंबरठ्यावर आणून सोडलें होतें ना ? मग त्यांची कृतज्ञता व्यक्त करण्याला, याहून अधिक कलात्मक असें, दुसरें कोणतें साधन सरोजिनींजवळ असणार ?

सरोजिनींचा हा काव्यसंग्रह जसा भारतांत गौरविला गेला, तसाच युरोप-अमेरिका येथेंहि ह्या पुस्तकाचें स्वागत चांगलें झालें. हस्तलिखित स्वरुपांत हा काव्यसंग्रह पाहण्याचा योग दुसऱ्या एका विख्यात इंग्रज लेखकाला आला. त्याचें नांव सर ऑर्थर सायमन्स ! त्यांनींहि वाहवाच केली.

सरोजिनींचा दुसरा काव्यसंग्रह १९१२ सालीं प्रसिद्ध झाला. त्याचें नांव " The Bird of Time " ( कालपक्षी ). त्याला एडमंड गॉस यांनीं प्रस्तावना लिहिली आहे. यानंतर सरोजिनी राजकारणांत पडल्या. त्यामुळें त्यांना काव्याकडे लक्ष देणें जमेना. पण राजकारणाच्या दडपणाखालीं दबलेला त्यांचा काव्यांकुर थोडाच नाहींसा होणार ? तो पुन: फोफावला १९१७ सालीं ! " Broken Wing " ( तुटलेला पंख ) हा काव्यसंग्रह त्यावेळीं प्रसिद्ध केला. " आजचें स्वप्न नि उद्यांची आशा " यांना सरोजिनीनें तो अर्पण केला आहे. ब्रिटिशांच्या जुलुमानें पीडित झालेल्या देशबांधवांची स्थिति पाहून त्यांच्या भावनाप्रधान हृदयाच्या तारा छेडल्या गेल्या त्यांचे ध्वनि या काव्याच्या ओळीओळींत झंकारत आहेत.

सरोजिनींच्या या तीन काव्यसंग्रहांतून आपल्याला त्यांच्या काव्यगुणांचे किती तरी पैलू चमकतांना दिसतात. विलायतेंत असतांना एडमंड गॉस यांनीं त्यांना असें सांगितलें होतें कीं, "तुमच्या काव्याचा आत्मा भारतीय असूं द्या." ही सूचना सरोजिनींनीं आपल्या पुढील काव्यांत कटाक्षानें पाळलेली दिसते. त्यामुळें एडमंड गॉस यांनीं आपल्या प्रस्तावनेंत असे धन्योद्गार काढले, "सरोजिनींचें काव्य आतां पूर्ण भारतीय बनलें आहे."

सरोजिनींनीं आपल्या काव्यांत भारतीय वातावरण आणलें म्हणजे काय केलें ? तर भारतांतील निसर्ग—भारतांतील चालीरीति—भारतांतील

समाज यांचें चित्रण त्यांनीं आपल्या काव्यांत केलें आहे. त्यांच्या काव्यांत आपल्याला जसे पालखी वहाणारे भोई भेटतील, तसेच कापड विणणारे कोष्टी दिसतील. त्यांच्या काव्यांत मुखानें " गोविंद–गोविंद " म्हणत जाणारी मथुरेची गौळण आढळते, तशीच गुलाबाच्या सौंदर्याला फिके पाडणारी झेबुन्निसा दृष्टीस पडते. तेथें हैद्राबादेंतील व्यापारी जसे आहेत, तसेच बांगडया विकणारे कासारहि आहेत.

समाजाच्या अशा नाना थरांतील व्यक्ति जशा सरोजिनींच्या काव्य–प्रांगणांत दिसतात, तसेंच निसर्गाच्या नाना ऋतूंतील फुलेंहि तेथें फुललेलीं दिसतात. वधूच्या वस्त्राप्रमाणें तळपणारा लाल गुलमोहर एका काव्यांत बहरलेला आहे, तर सुवर्णदीपाप्रमाणें चमकणारा केवडाहि दुसऱ्या काव्यांत सुगंध पसरवित आहे. तेथें हस्तिदंती पाकळ्यांचा चंपक कधीं डंवरतो, तर कधीं तांबूस मोहरांनीं नटलेला आम्रवृक्ष मत्त गंधाची लयलूट करतो. कधीं अशोक-पुष्पाचा तर कधीं शिरीष-पुष्पाचा सडा, त्यांच्या काव्य-उद्यानांत पडलेला दिसतो.

फुलांप्रमाणें अनेक भारतीय सणांवरहि सरोजिनींनीं काव्यवृष्टि केली आहे. वसंतपंचमी नागपंचमी–दिवाळी इत्यादि सणांचें वर्णन त्यांनीं सुंदर तऱ्हेनें केलें आहे. अशा भारतीय वातावरणांमुळें सरोजिनींचें काव्य प्रत्येक भारतीयाच्या अंतःकरणांत खोलवर जाऊन रुजतें.

विषय कोणताहि असो, त्यावर कल्पनेचा मुलामा चढविल्याशिवाय सरोजिनी रहातच नाहींत. उपमांची खैरात करून, त्या विषयाला साजेसेंच वृत्त निवडण्याचें सरोजिनींचें कौशल्य पहावयाचें असेल, तर त्यांचे पालखी वहाणारे भोई पहा. भोई ते गात गात ती पालखी वाहून नेत आहेत. त्यांत एक सुंदर युवती बसली आहे. ती युवती म्हणजे जणुं कांहीं त्या भोईच्या स्कंधरुपी वाऱ्यावर डुलणारें फुलच आहे कीं झऱ्याच्या लाटांवर तरंगणारा पक्षीच आहे, असें सरोजिनींच्या काव्यमनास वाटतें. आणि या कवितेचें वैशिष्ट्य हें कीं, तिचें वृत्त खाली-वर असें आंदोलन घेत आहे कीं, कविता वाचतांना श्रोत्याला आपण स्वतःच पालखींत बसल्याचें सुख भासतें.

त्यांच्या वसंतऋतूवरील कवितांतहि आपल्याला अशीच उपमांची उधळपट्टी पहावयास मिळते. सरोजिनी वसंतऋतूला विचारतात, " हे वसंतऋतु ! तूं बुलबुलाच्या गाण्यासारखा गोड आहेस कीं गुलाबाच्या फुलासारखा सुंदर आहेस ? कुमारिकेची आशा नि तरुणीचें स्वप्न तुझ्या रुपानें साकार होत आहे. "

असा कल्पनेचा रम्य विलास करीत करीत, आपल्या भारतीय संस्कृतीचें प्रतिबिंब उमटविण्यांत, सरोजिनींचें जें कौशल्य दिसतें, तें अलौकिक आहे. एका झाडाचें वर्णन करतांना त्या म्हणतात, " तुझ्या फुलाचा वास कडू असून गोड आहे. सुख नि दुःख या विरोधी भावनांनीं तुझीं पानें एकत्र केलीं आहेत. तीं पानें म्हणजे सावित्रीचें दुःख आहे–सीतेची अभिलाषा आहे–द्रौपदीची आकांक्षा आहे–दमयंतीची कातरता आहे आणि मधुर शकुन्तलेचे अद्‌भूत अश्रू आहेत. " अशा उज्ज्वल भारतीय स्त्रियांचा उल्लेख करून सरोजिनींनीं या काव्याला मोठी प्रतिष्ठा प्राप्त करून दिली आहे.

भारतीय संस्कृतीचा अभिमान जसा सरोजिनींच्या काव्यांतून ओसंडतो, तशी त्यांना लागलेली स्वातंत्र्याची ओढाहि त्यांच्या "प्रीति–गीतें" या कवितेंत दिसून येते. त्यांत त्या भारतमातेला म्हणतात,

" हे मातृभूमि ! आमचे दोन्ही हात तुझ्या सेवेसाठीं–समृद्धीसाठीं सिद्ध आहेत. आमचे दोन पाय अंधारांतून पुढें जाऊन प्रकाशमय मार्गाचा शोध लावण्यासाठीं आहेत. आमचे दोन कान हे भविष्यकालाची भूपाळी ऐकण्यासाठीं आहेत. आमचे दोन डोळे तुझ्या उज्ज्वल भाग्योदयाचें दर्शन घेण्यासाठीं आहेत. परन्तु आमचें हृदय एकच आहे व तें फक्त तुझ्यावर प्रेम करण्यासाठीं ! आमची आशा एकच – आमचें ध्येय एकच– आमचें आराध्यदैवत एकच ! "

'हिंदमातेस' या त्यांच्या सुप्रसिद्ध राष्ट्रीय गीतांत कल्पना व भावना यांबरोबरच भूमातेची भक्तीहि प्रगट होते. त्यांना आपल्या देश-बांधवांबद्दल वाटणारें प्रेम, सहानुभूति व जिव्हाळा यांचा आविष्कार

येथें झालेला आहे.अशा हृदयाच्या हळुवारपणें रंगवलेलें हें भारताचें चित्र हृदयंगम आहे.

भावनेचा विहार व कल्पनेचा विलास यांनीं विनटलेलें त्यांचें प्रतीकात्मक काव्य म्हणजे " बांगडया विकणारा कासार ! " विषय अगदीं साधा आहे. पण त्यावर मनोरम कल्पनांचा साजशृंगार चढवून त्यांनीं गूढगुंजन कसें केलें आहे तें पहा.

" बांगडयांची चकाकणारी माळ पाठीवर टाकून कासार तेथें भरणाऱ्या यात्रेला निघालेले आहेत. त्यांच्या-जवळ नाजूक नी तेजस्वी बांगडया आहेत. जणुं कांहीं इंद्रधनुष्याचीं केलेलीं तीं प्रकाशवलयेंच ! त्यांतिल कांहीं बांगडया लहान मुलींकरितां आहेत, तर कांहीं बांगडया प्रौढ स्त्रियांना शोभण्यासारख्या आहेत."

त्या बांगडया पाहून सरोजिनींच्या कल्पनांचे तुषार एकामागून एक उडलेले आपणांस दिसतात.

" त्यांतील कांहीं बांगडया निळसर असून त्यांवर चांदीसारखे पांढरे ठिपके काढलेले आहेत. जणुं कांहीं निळया डोंगरावर पडलेल्या बर्फाच्या तुकडयासारखें त्या बांगडयांचें सौंदर्य रमणीय वाटतें. त्यामुळें त्या बांगडया कुमारिकेच्या हाताला योग्य आहेत. कांहीं बांगडया रानांतून वाहणाऱ्या झऱ्याच्या कांठांवर उगवलेल्या फुलासारख्या रम्य आहेत, तर कांहीं नवीन फुटलेल्या पालवीप्रमाणें लालसर आहेत. "

वधूच्या हाताला कोणत्या बांगड्या शोभेशा आहेत हें सरोजिनी पुढीलप्रमाणें सांगतात—

"शेतांतील रोपांवर सूर्याचे किरण पडले असतां त्यावर जसा तांबूस रंग पसरतो, तशा रंगाच्या बांगड्या वधूला योग्य आहेत. कांहीं बांगड्या लग्नांतील मंत्राग्नि-प्रमाणें लाल आहेत, तर कांहीं बांगड्या वधूच्या आशे-

प्रमाणें–हास्याप्रमाणें-अश्रूप्रमाणें नाजुक व खुळखुळणाऱ्या आहेत."

" ज्या स्त्रिया आतां आयुष्याच्या मध्यावर आल्या आहेत, ज्यांचे हात आतां कर्तव्यानें कृतार्थ झाले आहेत, ज्यांनीं प्रेमपूर्ण आशीर्वाद दिलेले आहेत व ज्यांनीं आपल्या वक्ष:स्थळावर बालकें खेळविलीं आहेत, अशा गृहिणीं-साठीं जांभळया व सोनेरी बांगडया राखून ठेवलेल्या आहेत."

साधी बांगडी ! पण तिच्यांतून भारतीय स्त्री-जीवनाच्या विविध अवस्था किती हळुवारपणें सरोजिनीनीं दाखविल्या आहेत ! हें जसें बांगड्यांचें प्रतीक, तसेंच दुसरें घंटानादाचें प्रतीक ! आपण किती तरी घंटा पाहिलेल्या असतात–त्यांचे नानाविध आवाज ऐकलेले असतात. त्या लहानशा नादानें कवीच्या मनश्चक्षुपुढें अनेक घटना उभ्या रहातात.

पैंजणांचा आवाज सर्वांनींच ऐकला आहे. पण तो आवाज ऐकून सरोजिनींना वाटतें,––

"किती नाजूक आवाज आहे या पैंजणांचा ! त्या आवाजाच्या नादानें दांपत्याच्या प्रेमाचें रहस्य उलगडलें जातें – हुंदक्यांचे श्वास ऐकूं येतात – ओठांत अडखळणारे शब्द आठवतात आणि गुलाबी स्वप्नांनीं रंगणाऱ्या त्या रम्य रात्रीं स्मरतात."

" वासरांच्या गळ्यांत बांधलेलीं घुंगरें पाहून आपल्या डोळ्यांपुढें विस्तीर्ण शेतें व त्यांतील स्वप्नाळू विहिर उभी राहते. दिवसभर कष्ट करून पक्ष्याप्रमाणें आपले पंख मिटून घरीं येणारे शेतकरी दिसतात. त्यांच्या शेकोटीभोंवतीं चाललेल्या गप्पा व रस्त्यानें हिंडणाऱ्या स्त्रियांचें गाणें ऐकूं येतें.

" देवळांतील घंटेचा तो गंभीर नाद ऐकून तर वाटतें कीं, हा आवाज आकाश दुभंगून स्वर्गांतून खालीं

तर येत नसेल ? तेथें पहाटेच्या वेळीं होणाऱ्या प्रार्थनेचे स्वर व संध्याकाळीं होणाऱ्या आरतीचे स्वर कानांत घुमूं लागतात."

असे जीवनाचे निरनिराळे नाद त्यांच्या या तीन काव्यांतून आपल्याला ऐकूं येतात.

सरोजिनींचा कापड विणणारा कोष्टीसुद्धां जीवनाच्या तीन अवस्थेला लागणारीं वस्त्रें विणीत असतो. नवीन जन्मलेल्या मुलांसाठीं तो निळसर विणतो, तर मोरपिसाप्रमाणें चकाकणारें हिरवें वस्त्र नववधूसाठीं तो तयार करतो व शेंवटीं मृतमाणसाला पांघरण्यासाठीं ढगाप्रमाणें पांढरें वस्त्र विणतांनाहि तो कोष्टी दिसतो.

अशा अनेक प्रतीकात्मक कवितांतून सरोजिनींचा जीवनविषयक दृष्टीकोन प्रकट होतो.

अशा विशाल जीवनाचा दृष्टीकोन जसा त्यांच्या काव्यांत दिसतो, तसेंच त्यांचें कौटुंबिक जीवनाचें प्रतिबिंबहि त्यांत पडलेलें दिसतें. फुलांवर–पानांवर कविता करणाऱ्या सरोजिनी आपल्या मुलांना कशा विसरतील ? त्या कवितेचें नांव "माझ्या चिमण्यांनो !" किती गमतीदार रेखाटलें आहे, प्रत्येकाचें शब्दचित्र ! आपल्या मुलांनीं भावी आयुष्यांत कसें असावें, हें सांगतांना सरोजिनी म्हणतात,

"हे जयसूर्य ! तूं संगीत व स्वातंत्र्य यांचा सम्राट हो."
कमळाप्रमाणें मृदु असलेल्या पद्मजेला त्या म्हणतात,
"तुझ्या नांवांत लक्ष्मीचें सामर्थ्य व सौंदर्य सांठवलें आहे.
तूं सौंदर्याचा सुवास पसर !"

त्यांचा तिसरा मुलगा रणधीर ! त्याला 'प्रेमाचा व पावित्र्याचा पुतळा हो !' असा आशीर्वाद त्या देतात. तर सर्वांत धाकटी मुलगी जी लीलामणी तिला उद्देशून सरोजिनी सांगतात–" तूं दुःखापासून दूर रहा व सदा हंसतमुख अस."

सरोजिनींचें काव्य म्हणजे कोमल भावना व तेजस्वी विचार यांचें संगीत आहे. एका इंग्रज वृत्तपत्रानें असें म्हटलें आहे कीं, “ सरोजिनींचें काव्य म्हणजे पाश्चात्यांना भारताचें सौंदर्य पाहण्यासाठीं उघडलेली खिडकीच आहे. ” वृत्ताची खुलावट, रचनेचें सौंदर्य व विचारांचें तेज त्यांच्या कवितेंत उठून दिसतें.

सरोजिनीप्रमाणेंच भारतीय प्रतिभेची ओळख सर्व जगाला करून देणारे महान् कवि म्हणजे डॉ. रवींद्रनाथ टागोर ! सर्व जगानें नोबेल पारितोषकाचा सुवर्ण-मुकुट त्यांचे मस्तकीं ठेवला आहे. रवींद्रनाथ व सरोजिनी–दोघेहि बंगाली ! एकाच वंगभूमीचीं हीं दोन्ही प्रतिभाशाली अपत्यें ! दोघांचीं हृदयें हळुवार, मनें संवेदनक्षम आणि दृष्टी सौंदर्यशोधक; त्याचप्रमाणें दोघांची वृत्तीहि स्वातंत्र्य-पूजक ! त्यामुळें काव्याच्या बासरी जशा दोघांनीं वाजविल्या, त्याचप्रमाणें राजकारणाचें रणशिंगहि त्या दोघांनीं फुंकलें.

काव्य हेंच सरोजिनींच्या जीविताचें अंतिम ध्येय होतें. गॉस-साहेबांना त्यांनीं एकदां असें कळविलें होतें कीं, “ एखादें कवन–निदान एखादी काव्यपंक्ती–माझ्या हातून अशी रचली जावी की, जी चिरकाल टिकेल. ”

अशी अमरत्वाची आकांक्षा सरोजिनींच्या मनांत सदैव खेळत होती.





मराठी ... ग्रं... संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रमांक २२३२२ दि. २५/२/७०

## ५. . . . . . मायभूमीच्या सेवेसीं

१९०६ सालची गोष्ट ! कलकत्त्यामध्यें आज एकच विषय साऱ्या स्त्रीपुरुषांच्या तोंडीं घोळत होता. प्रत्येकाच्या अंगीं एक नवीनच उत्साह खेळत होता. आज तेथें भरणाऱ्या अधिवेशनाचा पहिला दिवस होता. कसली ही परिषद? "अखिल भारतीय सामाजिक परिषदे"चें हें अधिवेशन होतें. त्याचा आज शुभारंभ होता—आणि त्यावेळीं होतें सरोजिनींचें भाषण !

सरोजिनीबाईंचें भाषण म्हणजे साऱ्यांच्या कौतुकाचा—उत्सुकतेचा विषय. मधाच्या पोळ्याभोवतीं मधमाशा नाहीं का जमत, तशा गर्दीनें हजारों स्त्रीपुरुष त्यांच्या व्याख्यानाला जमत. त्या जनसागराला इतकी भरती येई कीं, ठरलेली जागा अपुरी पडावी. हा अनुभव सर्वांना अगदीं ताजा होता.

पूर्वीं एकदां मुंबई येथील 'प्रार्थना-समाजाच्या' हॉलमध्यें सरोजिनींचें भाषण ठरलें होतें. पण तेथें इतकी गर्दी झाली कीं, त्यासाठीं दुसऱ्या भव्य हॉलमध्यें व्याख्यानाची सोय करणें व्यवस्थापकांना भाग पडलें. अशी काय जादू होती सरोजिनींच्या व्याख्यानांत? त्यांची भाषा ओघवती होती, वाणी रसाळ होती, शैली हास्यविनोदानें बहरलेली होती, वक्तृत्व देशप्रेमानें ओथंबलेलें व काव्यानें थबथबलेलें होतें.

दुपारचे पांच वाजले. अधिवेशनाला सुरवात झाली. भव्य पटांगणावर स्त्रीपुरुषांचा जमाव मोठ्या संख्येनें जमला होता. सरोजिनीबाई बोलण्यासाठीं आपल्या खुर्चीवरून उठल्या व ध्वनिक्षेपकापुढें उभ्या राहिल्या. त्यांची ती काव्यमय वाणी ऐकण्यास सारे श्रोते अधीर झाले होते. सरोजिनींच्या भाषणाचा विषय होता, "हिन्दी स्त्रियांचें शिक्षण." स्त्री-सुधारणेची तळमळ त्यांच्या अंतःकरणांत प्रथमपासून होतीच, पण

ती तळमळ--ती आस्था जनतेला पटवून देण्यासाठीं त्या आपल्या मधुर आवाजांत पण निश्चयी स्वरांत म्हणाल्या,

" प्राचीन काळीं स्त्रियांना जे जे हक्क होते ते ते त्यांना परत द्या. आपली सर्वांगीण उन्नति व प्रगति होण्यासाठीं सक्रिय सहकार्याची अत्यंत आवश्यकता आहे. तुम्ही स्त्रियांना सुशिक्षित केलें, तर आपल्या राष्ट्राचें पुढें कसें होईल याची चिंता बाळगण्याचें कारण उरणार नाहीं. ' जिच्या हातीं पाळण्याची दोरी ती जगातें उद्धारी. ' ही म्हण कृतीनें खरी करा. "

टाळ्यांच्या कडकडाटांत सरोजिनीबाईंचें भाषण संपलें. त्यांचे विचार श्रोत्यांच्या अंत:करणांत खोलवर जाऊन पोचले. सर्व श्रोते जागेवरून उठून घरीं जाण्यास निघाले. कांहीं निवडक प्रमुख मंडळी मात्र तेथें होती. त्यांचा सरोजिनीबाई हास्यमुद्रेनें निरोप घेऊन निघणार, तोंच....

त्यांचें लक्ष गेलें एका थोर देशभक्ताकडे. त्यांचें नांव नामदार गोखले ! न्या. रानडे ह्यांचे वारस म्हणून ते जसे हिंदुस्थानांत प्रसिद्ध होते, तसेच आफ्रिकेंत सत्याग्रहाचे प्रयोग करणाऱ्या म. गांधींचे गुरु म्हणूनहि मान्यता पावले होते. ना. गोखल्यांवरहि वक्तृत्वकलेनें वरदहस्त ठेवलेला होता. त्यांनीं देशासाठीं केलेला त्याग व त्यांचीं हृदयस्पर्शी भाषणें--यामुळें सरोजिनींना गोखले पूज्यस्थानीं वाटत होते. अशा थोर नेत्यानें आपलें भाषण ऐकलें, याबद्दल सरोजिनीबाईंना धन्यता वाटली.

सरोजिनी ना. गोखल्याजवळ गेल्या व त्यांना वंदन करून हंसत-हंसत म्हणाल्या, " आज दुसऱ्यांदा आपलें दर्शन मला घडत आहे. प्रथम मी आपल्याला इंग्लंडमध्यें पाहिलें नि आज आत्तां--इथें. "

गोखले आपली स्मृति उजळीत म्हणाले,

" बरोबर, पण त्यावेळीं आपण वक्त्या नव्हता. कवियित्री होता--उदयोन्मुख, व्यासंगी व वाङ्मयप्रेमी कवियत्री--म्हणून तुम्ही माझ्या स्मरणांत तेव्हांपासून आजपर्यंत होता. पण आतांपासून........"

" म्हणजे, आजपासून मी कवि नाहीं कीं काय ? "

"तसं नव्हे—आज तुमच्या कलेचा दुसरा एक पैलू मला दृष्टीस पडला. तो म्हणजे तुमच्या प्रतिभाशाली वक्तृत्वाचा........तुमचें आजचें भाषण म्हणजे बुद्धिमत्तेचा उत्कृष्ट नमुना तर होताच, पण त्याहून विशेष म्हणजे ज्यावेळीं तुम्ही भाषण करीत होता—त्यावेळीं आपण एका उच्च पातळीवर आरूढ झालों आहोंत—असें आम्हां सर्वांस वाटलें."

" आभारी आहे मी आपली. मला आपल्या मार्गदर्शनाची अत्यंत आवश्यकता आहे. देशासाठीं आपण कांहीं तरी केलें पाहिजे, अशी तीव्र ओढ मला सारखी लागून राहिली आहे."

" वा, मग तर फारच छान! आपल्यासारख्या जीवनसर्वस्व अर्पण करणाऱ्या देशभक्तांची आपल्या राष्ट्राला अत्यंत गरज आहे."

असा तेजस्वी व उत्साहवर्धक संदेश ना. गोखल्यांकडून मिळाल्यामुळें सरोजिनीबाईंच्या साऱ्या चित्तवृत्ती थरारून गेल्या. एका दिव्यानें दुसरा दिवा लावावा त्याप्रमाणें गोखल्यांच्या ह्या भेटीनें सरोजिनींच्या हृदयांत राष्ट्रप्रेमाची ज्योत प्रखरपणें तेवूं लागली.

◆ ◆ ◆

आज सरोजिनीबाईंची सकाळपासून अगदीं धांवपळ चालली होती. काय करूं नि काय नको, अशा विचारांची मनांत गर्दी झाली होती. आज त्यांच्या घरीं बडे पाहुणे येणार होते ना? कोण होते हे पाहुणे? ते होते सरोजिनींचें स्फूर्तिस्थान, त्यांचें आशास्थान—त्यांचे गुरु!........नामदार गोखले!

१९१२ सालीं सरोजिनीबाई आपल्या वडिलांबरोबर कांहीं दिवस कलकत्त्यास जाऊन राहिल्या होत्या. त्या कलकत्त्याच्या घरांत आज या थोर पुरुषाचें आगमन होणार होतें. याआधीं सरोजिनींची व ना. गोखल्यांची बरेच वेळां गांठ पडली होती. पण ती किती? अगदीं थोडा वेळ! अशा छोट्या भेटींनीं सरोजिनींचें थोडेंच समाधान होणार! एखाद्या भुकेल्या माणसाचे पंचपक्वान्नाच्या नुसत्या वासानें थोडेंच पोट भरणार? तसेंच झालें सरोजिनीबाईंचें! त्यांच्या मनाला गोखल्यांच्या तेजस्वी विचारांची—निकट परिचयाची भूक लागली होती.

आणि आज तो योग आला होता ना? गोखले कलकत्त्याला जाणार होते–सरोजिनींच्या घरीं उतरणार होते. केव्हां येताहेत गोखले, याकडे सरोजिनींचे डोळे लागून राहिले. तोंच गोखल्यांची डौलदार–हंसतमुख मूर्ति समोरून येतांना सरोजिनीबाईंनीं पाहिली. त्या स्वागताला पुढें झाल्या. तोंच गोखले हंसतहंसत म्हणाले, "बऱ्या सांपडलात, इतके दिवस एखाद्या पक्ष्यांप्रमाणें इकडेतिकडे विहार करीत होता ना? पण आतां मात्र मी तुम्हांला बराच काळ पिंजऱ्यांत कोंडून ठेवणार आहें नि तुमची खरी ओळख करून घेणार आहें."

गोखल्यांच्या या विनोदाला मान हलवून हंसत हंसत सरोजिनी त्यांना आंत घेऊन गेल्या. त्यांची आस्थापूर्वक विचारपूस करून त्या पुढील उद्योगाला लागल्या. गोखल्यांच्या सहवासांत सरोजिनीबाईंचे दिवस जोरानें पळत होते. त्यांच्याशीं सामाजिक, राजकीय प्रश्नांवर चर्चा करतांना तर आपण अमृताच्या डोहांत डुंबत आहोंत, असें सरोजिनींना वाटत होतें.

दुसऱ्या दिवशींची गोष्ट! सकाळची वेळ होती. गोखले आपल्या खोलींत बसले होते. सरोजिनीबाईंनीं हळूच दार उघडलें व आंत प्रवेश केला. गोखल्यांकडे पाहून त्या एकदम दचकल्या. "गोखले आज एवढे उदास कां? त्यांची मुद्रा एवढी खिन्न कां?" सरोजिनीबाई गोखल्यांच्या जवळ येऊन बसल्या व त्यांना म्हणाल्या,

"देशाचा कोणता प्रश्न सोडवण्यांत गुंतला आहांत आपण?"

गोखले म्हणाले, "अहो, देशाचा एक प्रश्न का आहे? किती तरी प्रश्न आ वासून उभे आहेत. आपल्या देशाच्या भवितव्याबद्दल मी विचार करीत होतों. तुम्हाला काय वाटतें भारताच्या भवितव्याबद्दल?"

"मला? आपल्यापुढें मी काय सांगणार? गरुडापुढें लहानश्या पाखराची भरारी ती काय असणार? पण आपण विचारलेंत म्हणून सांगतें, मला आपल्या देशाचें भवितव्य आशाजनक आहे असेंच वाटतें." सरोजिनींनीं सांगितलें.

गोखल्यांनीं त्यांना विचारलें, " आतां दुसरा प्रश्न विचारूं का ? एवढें निश्चित उत्तर देतां म्हणून म्हणतों. "

" तो कोणता प्रश्न ? "

"आपल्या हिंदुस्थानचें भवितव्य काय होईल ? "

" हिन्दुमुस्लिम ऐक्य !—आणि तेंहि पांच वर्षांच्या आंत. " सरोजिनीबाई जोरांत म्हणाल्या. तोंच गोखले मोठमोठ्यानें हसूं लागले व त्यांना म्हणाले, " आतां मात्र तुम्हीं कवि शोभतां हं ! तुमच्या आशेची उडी भलतीच उंच आहे. "

" कां ? तुम्हांला नाहीं त्याची शक्यता वाटत ? " सरोजिनींनीं प्रश्न केला.

" छे ! मुळींच नाहीं.—तें ऐक्य माझ्या हयातींत तर राहोच, पण तुमच्या हयातींतहि होण्याची आशा मला नाहीं. " गोखले निराश स्वरांत म्हणाले.

" तुमच्या ह्या प्रोत्साहनानं आमचे प्रयत्न थांबलेच आतां. " सरोजिनी म्हणाल्या.

" तसं मुळींच करूं नका. तुम्हीं श्रद्धेनं कार्याला लागा—हिंदु-मुस्लिम ऐक्य हेंच आपलें जीवितकार्य माना. " गोखल्यांनीं तळमळीनें सांगितलें.

हिन्दु–मुस्लिम–ऐक्याचें हें स्वप्न सत्यसृष्टींत उतरविण्यासाठीं सरोजिनीबाई जीवाचें रान करूं लागल्या, जनतेच्या मनांत हा विचार पक्का करण्यासाठीं ठिकठिकाणीं हिंडूं लागल्या. आपल्या प्रतिभासंपन्न वक्तृत्वानें हिंदु-मुसलमानांचीं हृदयें जवळ आणूं लागल्या.

सन १९१३ च्या मार्च महिन्यांत सरोजिनीबाई लखनौला गेल्या व तेथें भरलेल्या मुस्लिम लीगच्या अधिवेशांत त्यांनीं जोरदार भाषण केलें. " ब्रिटिश हे परके आहेत. त्यांना आपल्या देशांतून घालवून देणें हें आपलें आद्य कर्तव्य आहे. त्यासाठीं जे अनेक झगडे चालले आहेत, त्यांत हिंदूबरोबर मुसलमानांनींहि भाग घेतला पाहिजे. कारण



हिन्दु व मुसलमान हीं भारतमातेचीं दोन लेकरें आहेत. मग आपल्या आईच्या मुक्ततेसाठीं दोघांनीं आपले प्राण पणास लावावयास नको का? त्याकरितां प्रथम दोघांत सलोखा निर्माण झाला पाहिजे व स्नेहभाव वाढला पाहिजे."

अशा आशयाचे उद्गार सरोजिनीबाईंनीं मुस्लिम बांधवांपुढें काढले—आपल्या रसपूर्ण, काव्यमय व स्फूर्तिप्रद वाणीनें त्यांच्या मनांत हे ऐक्याचे विचार बिंबविले. सरोजिनींच्या या प्रयत्नास लवकरच आलेलें फळ म्हणजे त्याच वर्षीं, डिसेंबर महिन्यांत, कराची येथें जी कॉंग्रेस भरली, तींत मुसलमान बहुसंख्येनें हजर होते. हें पाहून सरोजिनींना आनंदाचे उमाळे आले.

आपल्या प्रयत्नांतील हा यशाचा पहिला टप्पा आहे, असें समजून त्या तडक पुण्यास आल्या व ही गोड बातमी त्यांनीं ना. गोखल्यांना सांगितली. त्या वेळीं गोखले आजारानें बरेच अशक्त झाले होते. तरी ते जिन्याच्या पायऱ्या भराभर चढूं लागले. हें पाहून सरोजिनीबाईंच्या नेत्रांत आनंदाश्रु तरारले. त्या प्रेमळपणें म्हणाल्या, "आपण आजारी आहांत ना? मग या पायऱ्या आपल्याला चढवतील तरी कशा?"

जिना चढतां चढतां गोखले मागें वळून सरोजिनींना म्हणाले, " अहो, तुम्ही माझ्या ठिकाणीं नवीन आशा निर्माण केली आहे. कोणत्याहि परिस्थितीला तोंड देण्याइतकी व काम करण्याइतकी ताकद आतां माझ्या अंगीं आली आहे."

गोखल्यांची आपल्याबद्दलची ही आस्था पाहून सरोजिनीबाईंना धन्य धन्य वाटलें.

◆ ◆ ◆

सरोजिनींना गोखल्यांचा सहवास जसा स्वदेशांत घडला; तसाच तो परदेशांतहि घडला. १९१४ सालीं सरोजिनी गोखल्यांच्याबरोबर विलायतेस गेल्या. तेथें त्यांनीं हिंदुस्थानच्या परिस्थितीवर विचारविनिमय केला. देशाच्या सेवेंत किती आनंद भरला आहे, हें ना. गोखले सरोजिनीबाईंना पटवून देत व ते विचार सरोजिनींच्या अंतःकरणांत खोल खोल जाऊन रुजत. गोखले तेथें आजारी असतांना, त्यांना बरें वाटावें म्हणून सरोजिनी त्यांना कधीं मोटारींतून मोकळ्या हवेंत हिंडावयास नेत. तर कधीं उद्यानाच्या मऊ हिरवळीवर बसण्यास बरोबर नेत. शेवटीं सरोजिनींचा हिंदुस्थानांत परत येण्याचा दिवस ठरला.

सरोजिनी गोखल्यांना भेटण्यास गेल्या. त्यांना खालीं वांकून सरोजिनींनीं नमस्कार केला. त्यांना वर उठवीत गोखले गहिंवरून म्हणाले, " निघालात? आतां आपली भेट?"

" तुम्ही हिन्दुस्थानांत परत आल्यावर." सरोजिनी गदगदून बोलल्या.

" मला नाहीं वाटत पुनः आपली भेट होईल. मी जाईन—पण तुम्ही रहाणार आहांत."

" असं कां म्हणता आपण? मला आशा आहे."

" तुमची आशा मला माहीत आहे—हिन्दुमुस्लिम ऐक्यासारखीच नां?" गोखले दुःखमिश्रित विनोदानें म्हणाले. " आतां माझें काम संपलें. पुढचें काम तुमचें. तुम्ही आपलें जीवन देशकार्याला वाहिलें आहेच, म्हणून म्हणतों."

गोखले बोलत होते व सरोजिनी ऐकत होत्या. त्यांच्या हृदयांत भावनांचा कल्लोळ उठला. "खरंच, ही आपली भेट शेवटची ठरली तर?"

आणि घडलेंहि तसेंच. १९१५ च्या १९ फेब्रुवारीला सरोजिनीबाईंनीं भयंकर वातमी ऐकली—" ना. गोखले दिवंगत झाले !"

ही वार्ता ऐकून त्यांच्या काळजानें ठाव सोडला व त्या दुःखाच्या आवेगाला त्यांच्या काव्यशक्तीनें वाचा फोडली. त्यांनीं गोखल्यांवर उत्कट प्रेमानें भारलेली कविता लिहिली. सरोजिनीबाई आपल्या काव्यांत म्हणतात,

" हे शौर्यशाली महापुरुषा ! तुझ्या चितेभोंवतीं तुझे लक्षावधि देशबांधव शोकविव्हल अंतःकरणानें जमले आहेत. त्यांनीं तुझ्या हातांतून गळून पडलेल्या पवित्र दीपज्योतीनें आपलीं हृदयें उज्वल करावींत. तूं निर्माण केलेल्या स्फूर्तींतून या दुःखी भूमीचें संरक्षण नि सेवा करण्याचें व ऐक्य-स्थापनेचें सामर्थ्य त्यांना प्राप्त होवो !

ना. गोखले म्हणजे " वैयक्तिक प्रेमाचें सिंचन केलेली सेवा " असा गुणगौरव सरोजिनीबाई वारंवार करीत. "राजकारण अध्यात्मप्रवण असलें पाहिजे." हा गोखल्यांचा आदेश त्या कधीं विसरल्या नाहींत व त्या आदेशाच्या आधारावरच त्यांनीं राजकारणांत पाऊल टाकलें.

* * *

राजकारणाच्या आखाड्यांत त्यावेळीं उतरलेली दुसरी एक स्त्री म्हणजे श्रीमती ॲनी बेझंट ! १९१४ सालीं मद्रास येथें कॉंग्रेसमध्यें जें अधिवेशन भरलें त्यावेळीं बेझंटबाई त्यांत सामील झाल्या. सरोजिनीबाईंनीं बेझंटबाईंचा परिचय करून घेतला. पुढें बेझंटबाईंनीं सुरु केलेल्या 'होमरुल चळवळींत' सरोजिनी दाखल झाल्या व त्यांच्या पावलांवर पावलें टाकूं लागल्या. सरोजिनीबाईंचा अदम्य उत्साह व अचाट बुद्धिचातुर्य पाहून बेझंटबाई त्यांच्यावर बेहद खूष झाल्या व त्यांनीं सरोजिनींना एका नवीन नांवाचा नजराणा बहाल केला. तो म्हणजे " देवी !"

"देवी सरोजिनी नायडू की जय !!"—देशभर पुकार उठला !

प्रयागच्या त्रिवेणी-संगमाचें सौंदर्य काय वर्णावें? एकीकडून येणारी ती श्यामलवर्णीय यमुना व दुसरीकडून येणारी ती गौरवर्णीय गंगा. यमुनेच्या कांठावर साम्राज्याचे उदय–अस्त झाले, तर गंगेच्या कांठावर संस्कृतीची वाढ झाली. त्या दोघी बहिणी जेव्हां गळ्यांत गळा घालून नाचूं लागतात, तेव्हां कोणाचें हृदय आनंदानें नाचणार नाहीं? त्या गंगा-यमुनेच्या प्रवाहाखालून वहात असतो सरस्वतीचा गुप्त प्रवाह–एकीची सीमा कोठें संपते व दुसरीची सीमा कोठून सुरू होते, हें सांगणें फार कठीण!

असाच त्रिवेणी संगम सरोजिनीदेवींच्या जीवनांत झालेला दिसतो. समाजकारण व राजकारण हें त्यांच्या जीवनांत एकरूप झालेले आहेत व या दोन प्रवाहांना मिळाला आहे काव्याचा कोमल प्रवाह! राज-कारणांत प्रवेश केल्यावरहि आपले सामाजिक प्रश्न सोडविण्याकडे सरोजिनींचें लक्ष असे–व तेंहि काव्यमय पद्धतीनें! या त्रिवेणी संगमावर थोर थोर नेत्यांच्या विचारांचे किरण पसरले, तर त्याचें सौंदर्य द्विगुणित झाल्याशिवाय कसें राहील? लो. टिळक–म. गांधी या मोठमोठ्या राष्ट्र-पुरुषांचें अनुयायित्व पत्करून सरोजिनीदेवींनीं आपलें जीवन तेजोमय केलें.

नामदार गोखले यांच्या मृत्यूनें त्यांच्या जीवनांत पोकळी निर्माण झाली. ती भरून काढली लो. टिळकांनीं! सन १९१५-१६ चा काळ म्हणजे लोकमान्यांच्या कर्तृत्वाचा कळस! "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे; आणि तो मिळविणारच." ही त्यांची सिंहगर्जना देशांत दुमदुमत होती. ती ऐकून ब्रिटिश सरकारला भीतीचें कांपरें भरलें.

अशा रणझुंझार नेत्याचा सहवास सरोजिनीदेवींना १९१६

सालीं लखनौ येथें घडला. त्या वेळेस तेथें काँग्रेसचें अपूर्व अधिवेशन भरलें होतें. त्यांत लोकमान्यांनीं स्वदेशाला स्वराज्य मिळवून देण्याचा निकराचा प्रयत्न केला. " तुमच्या देशांत एकी कोठें आहे ? " असा हेटाळणीचा प्रश्न ब्रिटिश सरकार वारंवार करीत असे. त्याला उत्तर देण्यासाठीं लो. टिळक दंड थोपटून उभे राहिले. त्यांनीं हिन्दुमुसलमानांच्या ऐक्याची योजना आंखली.

" कांहीं झालें तरी मुसलमान हे आमचे देशबांधव आहेत. त्यांना हव्या त्या सवलती देऊन आम्हीं ऐक्य राखूं, पण ब्रिटिशांच्या तिसऱ्या व उपऱ्या पक्षाला हाकलून लावूं. " असा जणुं पैजेचा विडाच त्यांनीं उचलला होता.

हिन्दु-मुस्लिम ऐक्याच्या कल्पनेला सत्यसृष्टींत आणण्याचे टिळ-कांचे हे प्रयत्न पाहून सरोजिनींना फार आनंद झाला. त्यांचा काव्यात्मा ऐक्यासाठीं-सुसंवादासाठीं-संघटनेसाठीं सदैव भुकेलेला असे. या अधिवेशनांत हत्यारबंदीच्या कायद्याचा ठराव मांडण्यांत आला. त्यावर बोलतांना सरोजिनीदेवी म्हणाल्या, " शस्त्रें बाळगण्याचा व वापरण्याचा हक्क हिरावून घेऊन ब्रिटिश सरकारनें आमच्या वीरवृत्तीचा उघडउघड अपमान केला आहे. " तेथें जमलेल्या प्रतिनिधींना उद्देशून सरोजिनी म्हणाल्या, " माझ्या भारतीय बंधूंनो ! तुमच्या पूर्वजांना जे अधिकार होते, तें तुम्हांला व तुमच्या मुलाबाळांना मिळावेत. या आमच्या ठरावाला व हक्काच्या मागणीला तुम्ही दुजोरा द्यावा, अशी माझी आपणांस कळकळीची प्रार्थना आहे. "

एका अबलेचें ते वीरवृत्तीनें थरारणारें भाषण ऐकून सर्व पुरुष-वर्ग स्तिमित झाला. हत्यारबंदीच्या ठरावाप्रमाणेंच स्वराज्याचा ठरावहि त्या अधिवेशनांत मांडण्यांत आला. त्या ठरावाला पाठिंबा देतांना सरोजिनी-देवींनीं श्रोत्यांच्या भावना याहूनहि अधिक उचंबळून सोडल्या. " वैयक्तिक सुखापेक्षां मातृभूमीची सेवा करावी असें कोणाला वाटत नाहीं ? " असा प्रश्न करून त्या पुढें म्हणाल्या, " ज्याला असें वाटत नसेल तो मनुष्य स्वार्थी व भेकड समजला पाहिजे. आपल्या आयुष्यांत अनंत

दु:खें असतात. तीं नाहींशी कशानें होतील? तर मातृभूमीच्या सेवेनें! सेवेसारखा दुसरा आनंद नाहीं. मातृभूमीकरितां आपण जे कष्ट करतों, त्यांतहि एक निराळाच आनंद लाभतो. तिच्या सेवेनेंच आपल्या पापांचें क्षालन होतें. मातृभूमीसाठीं जगणें हेंच यशस्वी जीवन आणि मातृभूमीसाठीं मरण आलें तर? अमरपदाचीच प्राप्ती होते!" हें स्फूर्ति-दायक भाषण ऐकतांना श्रोत्यांच्या अंगावर रोमांच उभे रहात होते, हृदयांत देशभक्तीच्या लाटा उठत होत्या आणि मुद्रेवर निश्चयाचें तेज चमकत होतें.

काँग्रेसचा हा नवा, दिव्य संदेश जनतेमध्यें पसरविण्यासाठीं सरोजिनीदेवींनीं देशभर दौरे काढले, निरनिराळ्या संस्थांना भेटी दिल्या व व्याख्यानांचा पाऊस पाडला. १९१७ सालीं मद्रासला सरोजिनी असतांना, कांजीवरम् येथें 'मद्रास प्रांतिक परिषद' भरली होती. तिचें अध्यक्षपद सरोजिनीदेवींना देण्यांत आलें होतें. तेथेंहि त्यांनीं हिन्दु-मुस्लिम ऐक्याचा मंत्रघोष जनतेला ऐकविला. त्याचें दृश्य फल म्हणजे काँग्रेस व लीग या दोन्ही संस्थांचीं अधिवेशनें एकाच शहरांत भरूं लागलीं. मुंबई, लखनौ व कलकत्ता या तिन्ही ठिकाणीं हें ऐक्याचें सूत्र कायम ठेवलें गेलें.

हिन्दुमुस्लिम ऐक्य हें जसें सरोजिनीदेवींच्या जीवनाचें एक ध्येय, तसेंच स्त्रियांची उन्नति हें दुसरें. त्यासाठीं त्यांनीं बरेच ठिकाणीं ठराव मांडले—चर्चा केल्या—व्याख्यानें दिलीं.

मद्रास येथें १९०८ सालीं 'भारतीय सामाजिक परिषद' भरली होती. तेथें विधवांची स्थिति सुधारण्यासंबंधींचा ठराव मांडण्यांत आला. विधवांचा अनेक काळ चालविलेला छळ थांबला पाहिजे—यासाठीं त्यांना शिक्षण दिलें पाहिजे—त्यांना राहण्यासाठीं ठिकठिकाणीं आश्रम उघडले पाहिजेत—त्यांचे पुनर्विवाह घडवून आणण्याचे प्रयत्न केले पाहिजेत—अशा जीवनाला आवश्यक असलेल्या नाना गोष्टी त्यांत नमूद केल्या होत्या.

विधवांची ही केविलवाणी स्थिति ऐकून—पाहून सरोजिनींचें सुधारणाप्रिय मन स्वस्थ कसें बसणार? "अशा प्रकारचा ठराव मांडण्याचा

प्रसंग आमच्यावर यावा ना? केवढें लांछनास्पद!" असा विचार मनांत येऊन सरोजिनीदेवी भाषण करण्यास उभ्या राहिल्या. "ज्या राष्ट्रांत भगवान मनूसारखे नीति-शास्त्र-विशारद होऊन गेले, ज्या राष्ट्रांत भूत-दयेचा परमोच्च आदर्श जगापुढें ठेवणारे भगवान गौतम बुद्धासारखे महान् तत्त्वज्ञ होऊन गेले, त्या या भारतवर्षांत स्त्रियांच्या हीन अवस्थेचे पाढे वाचण्याची वेळ यावी ना? याहून अधिक दुर्दैव कोणतें?"

अशा तीक्ष्ण प्रश्नानें डिवचून सरोजिनीदेवी सर्व समाजाला जागृत करीत होत्या. यानंतर आठ वर्षांनीं सरोजिनींचें याच विषयावर तेजस्वी भाषण झालें. १९१६ सालीं मुंबईतील 'चंदारामजी गर्ल्स हायस्कूल'मध्यें हिंदी स्त्रियांना उद्देशून त्या म्हणाल्या, "हिंदी महिलांनो! ज्यावेळीं स्त्रीवर्गांत स्वाभिमानाला ओहोटी लागते, त्यावेळीं त्यांच्या अवनतीला सुरवात होते–खरें पहातां आपला देश या मानाच्या शिखरावर कशामुळें चढला? स्त्रियांची बौद्धिक उन्नति व अध्यात्मप्रवण वृत्ति ह्याचमुळें ना? ज्या समाजांतील स्त्रियांत एकत्वाची नि राष्ट्रीयत्वाची भावना जागृत आहे, तोच खरा जिवंत समाज होय!"

असें सांगून शेवटीं सरोजिनीदेवींनीं, स्त्री ही राष्ट्राची केवढी प्रचंड शक्ति आहे, ह्याचें विवेचन केलें. स्त्रियांना आपल्या थोरवीची जाणीव करून देतांना त्यांनीं अशी मीमांसा केली कीं, "समाजाची ध्येय-सिद्धि स्त्रियांवर अवलंबून असते. राष्ट्राच्या पुनर्घटनेच्या कार्यांत महिलेचा मान पहिला आहे. हिंदी स्त्री ही कोणाचें बाहुलें नाहीं कीं खेळण्याची वस्तु नाहीं–ती समाजाची चैतन्यदात्री आहे. स्त्रियांनीं आपल्या राष्ट्राच्या उद्धारांत पुरुषाबरोबर सहकार्य केलें पाहिजे."

अशीं व्याख्यानामागून व्याख्यानें देऊन सरोजिनीदेवींनीं महिलांच्या जागृतीस जोराची प्रेरणा दिली, पण नुसत्या व्याख्यानानें काय होणार? त्यासाठीं कृतीची आवश्यकता असते. कृतीमुळें विचारांना धार चढते व प्रतिष्ठा प्राप्त होते. आपल्या स्त्री–उन्नतीच्या विचाराला कृतीची जोड देण्याचा योग सरोजिनींना १९१७ सालीं आला. त्यावेळी मि. मॉंटेग्यू हे भारतमंत्री होते. हिन्दुस्थानांतील निरनिराळ्या पक्षांशीं चर्चा करून ते

स्वराज्याची योजना पार्लमेंटपुढें ठेवणार होते—त्यासाठीं हिन्दी जनतेचें मत ते अजमावित होते—प्रत्येक पक्षाच्या व वर्गाच्या प्रमुखांचें म्हणणें ऐकत होते.

त्यावेळीं भारतीय स्त्रियांचें शिष्टमंडळहि त्यांच्या भेटीस गेलें होतें. त्याचें पुढारीपण होतें सरोजिनीदेवींकडे ! त्यांनीं आपल्या भेटींत भारतीय स्त्रियांच्या हक्कांची मागणी केली. स्त्रीशिक्षण—आरोग्यविषयक सुधारणा—प्रसूतिगृहाच्या सोयी—विधिमंडळांत प्रतिनिधी निवडून देतांना पुरुषांच्या बरोबरीनें स्त्रियांना मताधिकार तसेच स्त्रियांना नागरिकत्वाचे हक्क—हें सर्व प्राप्त करून देण्याबद्दलची विनंति या शिष्टमंडळानें मि. मॉंटेग्यू यांना केली.

याचा परिणाम एवढा झाला कीं, १९१७ सालीं जेव्हां कलकत्त्याला कॉंग्रेस भरली, तेव्हां स्त्रियांच्या मताधिकाराचा ठराव मांडला गेला. त्या वेळीं कॉंग्रेसच्या अध्यक्षपदीं एक महिला होती. ती म्हणजे—डॉ. ॲनी बेझंट ! राष्ट्रसभेच्या सिंहासनावर बसलेली ही पहिलीच महिला होती ! त्या जन्मानें आयरिश होत्या; पण हिन्दभूमीची सेवा आपलेपणानें करीत होत्या. त्यांच्या अंतःकरणांत भारतीय स्त्रियांबद्दल गाढ आदर होता. त्या अधिवेशनांत स्त्रियांच्या उन्नतीचा ठराव मांडला गेला. "स्वराज्यसंस्था व शिक्षणसंस्था ह्यांतील प्रतिनिधित्वाचे व मतदानाचे हक्क स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीनें मिळावेत." हें सांगून बेझंटबाईंनीं राष्ट्राला ललामभूत झालेल्या स्त्रियांचा उल्लेख केला.

त्या अधिवेशनांत स्वराज्याचा ठराव मांडण्यांत आला आणि त्यावर बोलण्यास उठल्या सरोजिनीदेवी. मग काय विचारतां ? त्यांच्या वक्तृत्वास उधाण भरती आली. त्या स्वाभिमानानें आणि आशावादानें गर्जून पुरुषवर्गाला म्हणाल्या, "जेव्हां स्वातंत्र्य-प्राप्तीचा क्षण जवळ आलेला असेल, त्या वेळीं जर तुमचें धैर्य चळलें, सामर्थ्य ढळलें, श्रद्धाबल गळलें; तर तुम्हांला धीर देण्यास, तुमची विझती मशाल पेटविण्यास, तुमचें कोसळणारें निशाण सांवरण्यास आणि तुमच्या शरिरांत प्राण ओतण्यास भारतीय महिला तुमच्या पाठीशीं उभ्या आहेत, हें निश्चित समजा."

"भारताची प्रतिष्ठा म्हणजे भारतीय स्त्रीची प्रतिष्ठा. भारताच्या स्वातंत्र्यासाठीं भारतीय स्त्रिया त्यागाच्या चितेवर चढतील — आणि त्याहि इतक्या हर्षभरानें कीं, जणुं कांहीं त्या आपल्या वल्लभालाच भेटावयास निघाल्या आहेत."

या वक्तृत्वांतील ओजस्वी काव्य आणि त्याहूनहि तेजस्वी विचार कानीं पडतांच हजारों प्रतिनिधींनीं टाळ्यांचा एकच कडकडाट केला. अशा तऱ्हेनें भारतीय स्त्रीचा महिमा सरोजिनीबाईनीं आपल्या वक्तृत्वाच्या बांसरीनीं वारंवार वर्णिला आहे. त्या वेळची हिंदी स्त्री अडाणी असली, भोळी भासली, घरांत कोंडलेली असली तरी तिच्या अंगीं त्याग, निर्धार, सहिष्णुता, प्रेमभाव इत्यादी सद्गुणांचे सप्तसागर उचंबळत असतात. ही जाणीव साऱ्या जगाला करून दिली सरोजिनीबाई !

हें स्वराज्याचें कार्य पूर्णतेला नेण्यासाठीं सरोजिनीदेवी दिल्ली–पंजाब–सिंध वगैरे भागांतून दौरे काढीत होत्या–सभासभांतून जोराचा प्रचार करीत होत्या. त्यांची ही सेवा लोकोत्तर होती. त्यामुळें सर्व राष्ट्राला त्यांचेविषयीं आदर वाटूं लागला. त्यांचा सर्वत्र सन्मान होऊं लागला. आणि त्या सन्मानाची सीमा म्हणजे सामाजिक परिषदेचें अध्यक्षपद !

सन १९१८ सालीं दिल्लीला कॉंग्रेसचें अधिवेशन भरलें होतें. त्या वेळीं 'समाजसेवा संघा'च्या परिषदेचे अध्यक्षपदासाठीं सरोजिनी-देवींची निवड करण्यांत आली. तेथें त्यांनीं आपल्या रसपूर्ण व स्फूर्ति-दायक वाणीनें स्त्रियांना मार्गदर्शन केलें. त्यासाठीं त्यांनीं सीता-सावित्री यांचा आदर्श डोळ्यापुढें ठेवण्यास स्त्रियांना सांगितलें. "हिंदी स्त्रियांनीं सुमाता व सुगृहिणी झालें पाहिजे, त्याचबरोबर उत्तम नागरिक व निष्ठावंत देशसेविकाहि बनलें पाहिजे, अज्ञानाचा अंधार दूर करून राष्ट्राच्या लढ्यांत मोठ्या हिरिरीनें भाग घेतला पाहिजे, आपली उज्वल परंपरा डोळ्यासमोर सतत ठेवली पाहिजे." असे तळमळीचे उद्गार सरोजिनीदेवींनीं तेथें काढले.

हिंदुस्थानांत हें स्त्रियांच्या जागृतीचें वारें वहावून सरोजिनीबाई स्वस्थ बसल्या नाहींत. त्यांच्या कार्याची उडी भारताबाहेर गेली. हिंदी स्त्रियांची दाद लावण्यासाठीं त्या इंग्लंडला गेल्या. ज्याप्रमाणें सरोजिनींनीं भारतीय स्त्रियांच्या मताधिकाराचा प्रश्न मि. मॉंटेग्यूपुढें मोठ्या धडाडीनें मांडला, तसाच तो प्रश्न त्यांनीं विलायतेंतहि पार्लमेंटरी सिलेक्ट कमिटी-पुढें तेवढ्याच धैर्यानें मांडला.

१९१९ सालीं लंडन येथें पार्लमेंटरी सिलेक्ट कमिटीपुढें स्वराज्याच्या हक्कासंबंधीं वाटाघाटी चालू होत्या. त्यासाठीं लोकमान्य टिळक तेथें साक्ष देण्यासाठीं गेले होते व त्यांच्याबरोबर सरोजिनीबाईहि स्त्री-शिष्टमंडळाच्या पुढारी म्हणून गेल्या होत्या. लो. टिळक व सरोजिनीदेवी यांच्या साक्षीचें वैशिष्ट्य हें कीं, त्या दोघांनाहि कमिटीनें उलट प्रश्न एकहि विचारला नाहीं. कां ?

कारण ज्यांचीं मतें प्रथमच तयार होतीं व स्त्रियांना मतदान न देण्याबद्दल ज्यांचा निश्चय दृढ होता, अशा सभासदांची ती कमिटी होती. ती उलट प्रश्न विचारण्याची तसदी कशाला घेईल ? साक्ष घेण्याचा हा नुसता देखावा होता. हिंदी जनतेच्या डोळ्यांत फेकलेली ही धूळफेक होती.

इंग्रज लोक एरवी मोठे उदारमतवादी, पण मताधिकार देण्याचे बाबतींत मोठे कंजूष. खुद्द इंग्रज स्त्रियांनासुद्धां मतदानाचा अधिकार देण्याला त्यांनीं किती विलंब लावला ! किती विघ्नें आणलीं ! मताच्या हक्कासाठीं इंग्रज स्त्रियांनीं सुमारे १५ वर्षे देशभर धामधूम उडवून दिली—सभा भरविल्या—मोर्चे काढले—खिडक्या फोडल्या—बंगले जाळले ! बर्किंग-हॅममधील आगबोटींना जाण्यासाठीं जो कालवा होता, त्याखालीं स्त्रियांनीं भुयार खणलें व त्यांत दारु भरून बत्ती लावली, एडिंबरो युनियनची लॅबॉरेटरी जाळून ५००० पौंड नुकसान केलें, खानेसुमारीवर बहिष्कार घातला ! ! " स्त्रियांना मताधिकार द्या. " अशीं अक्षरें काढलेले पतंग त्यांनीं पार्लमेंटवर फडकविले—तुरुंगावर ३०० स्त्रियांनीं हल्ला केला ! या सफ्रेजेट स्त्रियांनीं तुरुंगवास सोसले, आणि तुरुंगांत अन्नसत्याग्रहहि केले. मिसेस पॅंखर्स्ट ह्या निश्चयी स्त्रीनें तर नऊ दिवस नुसत्या पाण्यावर काढले व प्राणांतिक उपोषण करण्याचें ठरविलें.

इतक्या दंगलीनंतर १९१८ सालीं इंग्रज राज्यकर्त्यांनीं आपल्या घरच्या स्त्रियांना मताचा अधिकार दिला; पण तोहि फक्त तीस वर्षांवरील प्रौढ स्त्रियांना ! एकवीस वर्षांवरील पुरुषांप्रमाणें वयांत आलेल्या सर्व स्त्रियांना मताधिकार देण्यास ब्रिटिश राज्यकर्त्यांनीं आणखी दहा वर्षें घेतलीं. असले हे कंजूष राज्यकर्ते हिन्दी स्त्रियांच्या मागण्या सुखासुखीं कशा पूर्ण करणार ?

सरोजिनीदेवी साक्ष देण्यास उभ्या राहिल्या. तेव्हां कमिटीचे अध्यक्ष विनोदानें त्यांना म्हणाले,

" मी तुमचे आभार मानतों. "

" ते कशाबद्दल ? " सरोजिनींनीं विचारलें.

" कारण आमच्या कामांत आजवर सगळा नीरसपणा होता. तो तुम्ही आपल्या काव्यमय वाणीनें घालविणार म्हणून. "

सरोजिनीबाई आपल्या सुरेल स्वरांत हिन्दी स्त्रियांच्या गौरवाचें गीत गाण्यास उभ्या राहिल्या. त्यांनीं त्या वेळीं असा युक्तिवाद केला कीं, " हिन्दुस्थानांतील कांहीं भागांत पडद्याची चाल आहे, या सबबीवर तुम्ही त्यांना मतदानाचा हक्क देत नाहीं. पण ज्या भागांत अशी चाल नाहीं तेथील स्त्रियांना हक्क द्यावयास काय हरकत आहे ? मतें नमूद करण्याची विशेष व्यवस्था हवी असली, तरी ती ठिकठिकाणचे स्थानिक अधिकारी करूं शकतील. "

ही विचारप्रवर्तक व स्पष्ट साक्ष ऐकून कमिटींतील सारे सभासद आश्चर्यचकित झाले. अशीं विचारांचीं बीजें सरोजिनीबाईंनीं इंग्लंड–स्कॉटलंड–वेल्स इत्यादि ठिकाणीं जनतेच्या मनोभूमींत पेरलीं. दक्षिण वेल्स, साउदॅम्पटन, एडिंबरो या ठिकाणीं त्या लो. टिळकांच्या बरोबर हिंडल्या. टिळकांची मुत्सद्देगिरी व सरोजिनींचें वक्तृत्व यांचा मधुर मेळ बसून श्रोत्यांच्या मनावर उत्कट परिणाम होत असे.

१९२० सालीं हिन्दुस्थानांत असंतोषाचा वणवा पेटला होता. खिलाफतीमुळें मुसलमान दुखावले होते, पंजाब-प्रकरणामुळें सारें हिन्दु-

स्थान मिटलें होतें आणि 'मॉटेग्यूच्या सुधारणा तर बहुतेक सर्वांनाच असमाधानकारक वाटत होत्या. या तीन कारणांनीं देशांत मोठा क्षोभ उडाला होता. त्यावेळीं सरोजिनीबाई प्रकृतिस्वास्थ्यासाठीं विलायतेंत होत्या. तेथें पंजाबांतील अन्याय ऐकून सरोजिनींचा राग अनावर झाला. तो राग प्रगट करण्यासाठीं त्यांनीं इंग्रज श्रोत्यांना बजावलें,

" जालियनवाला बागेच्या कत्तलीची वार्ता ऐकून माझें अंतःकरण दुःखानें भरून येतें. माझ्या भगिनींचें वस्त्रहरण करण्यांत आलें— त्यांना चाबकानें मारण्यांत आलें—त्यांची इज्जत घेण्यांत आली. माझ्या देशाचीं हीं दुःखें मी जाहीर करून जगाला हलवून टाकीन. तोंपर्यंत माझ्या जीवाला स्वस्थता मिळणार नाहीं."

हे सरोजिनीदेवींचे तीक्ष्ण शब्द इंग्रजांच्या मर्मी जाऊन पोंचले. अशीच झोंवणारी टीका त्यांनीं एकदां आपल्या भाषणांत ब्रिटिशांच्या जुलमी राजवटीवर केली. ही टीका न खपून ब्रिटिश श्रोत्यांनीं दंगल माजविण्यास सुरवात केली. पण सरोजिनीबाईंचें धैर्य मुळींच डळमळलें नाहीं.

" चूप रहा " हे शब्द त्यांनीं इतक्या आवेशानें काढले कीं, ते ऐकतांच सारा श्रोतृसमाज चपापला आणि मंत्रमुग्ध नागासारखा स्वस्थ बसला.

अशा आपल्या वक्तृत्वाच्या अमोघ शस्त्रानें सरोजिनीबाई ब्रिटिश सत्तेवर आघात करीत होत्या. ब्रिटिश सरकारनें राष्ट्राचा अपमान केल्याबद्दल म. गांधींप्रमाणें त्यांनींहि आपलें बहुमानाचें " कैसर इ हिन्द " हें पदक परत केलें.

याच वेळीं त्यांना दुसरा धक्का बसला—तो म्हणजे लोकमान्य टिळकांचा स्वर्गवास ! लोकमान्य गेले नी सारें राष्ट्र हळहळलें. राजकारणांतील एक पर्व संपलें असें सर्वांना वाटूं लागलें. देशांतील हा दैदिप्यमान हिरा एकाएकीं हरपला. त्यामुळें सरोजिनींच्या हृदयांत शोकाचा सागर एकदम उसळला !

## ७ . . . . . . . . 'शिंग फुंकिलें रणीं !'

सागराच्या विस्तीर्ण किनाऱ्यावर आपण उभे राहिलों, तर आपणांला काय दिसतें ? लाटांचें अखंड नर्तन ! एक लाट उगवते काय—उंच उंच उडी मारते काय—नंतर हळूं हळूं सागरांत विलीन होते काय ! साराच चमत्कार ! पण या चमत्कारांतील सौंदर्य आहे पुढेंच. ती लाट अंतर्धान पावण्याच्या आधीं तिच्यापाठीमागून दुसरी प्रचंड लाट जन्मास येते—आकाशाला हात लावण्यासाठीं उंच उंच होते व शेवटीं दिसेनाशीं होते.

लाटांच्या उदयास्ताचा हा क्रम एकसारखा चाललेला असतो. त्यामुळें असा भास होतो कीं, हा सागर पुढें पुढें येत आहे—अगदीं आपल्या पायाला स्पर्श करीत आहे—त्याचा सारखा विस्तार होत आहे.

असेंच गतिमानतेचें सौंदर्य भारताच्या राजकारणांतहि आपल्याला दिसतें. एका नेत्याच्या जीवितकार्याची समाप्ति होते न होते, तोंच दुसरा नेता पुढें येतो व तें कार्य पुढें जोरानें चालवितो. त्यामुळें स्वातंत्र्य-संग्रामाला सदैव भरतीच येत होती. ना. गोखले, लो. टिळक व म. गांधी या तीन राष्ट्रनेत्यांनीं स्वराज्याची चळवळ पुढें ढकलली—तिला विलक्षण गति प्राप्त करून दिली. या तीनहि कालखंडांत सरोजिनीबाईंनीं मोठीच कामगिरी बजावली होती.

विज्ञानशास्त्रांत गतिमानतेचा असाच एक सिद्धान्त आहे. एका तबकडीवर इंद्रधनुष्याचे सात रंग जर काढले व ती सप्तरंगी तबकडी जोरांत फिरविली, तर तिचा रंग कसा दिसतो ? अगदीं पांढराशुभ्र ! कोठें गेले ते सात रंग ?

अशीच आहे ही राजकारणाची तबकडी ! या तबकडीवर नाना विचारांचे—नाना पक्षांचे देशभक्त जरी कार्य करीत असले, तरी त्यांच्या अखंडित कार्यामुळें त्या राजकारणावर एकच रंग उमटतो—तो म्हणजे

देश-भक्तीचा ! त्यांतून एकच सूर निघतो—तो म्हणजे स्वातंत्र्य-प्राप्तीचा ! या राजकारणाच्या विविध रंगांमध्यें सरोजिनीबाईंनीं आपल्या चमकदार कार्यानें तेजेला आणली.

सरोजिनी १९२१ सालीं विलायतेहून हिन्दुस्थानांत परत आल्या. तों त्यांना काय दिसलें ? हिन्दुस्थानच्या राजकारणावर गांधीजींच्या नेतृत्वाचा प्रकाश पडलेला ! एकीकडे ब्रिटिशांचा हिन्दी जनतेवरचा जुलूम वाढतच होता; तर दुसरीकडे त्या जुलुमाला अहिंसेनें पण तीव्र विरोधानें जनता टक्कर देत होती. लोक निःशस्त्र होते तरी सशस्त्र सरकारला शरण आणूं पहात होते. त्यांचे नेते गांधीजी शांतीचा पुतळा होते, पण साम्राज्यशाहीशीं युद्ध खेळण्यास उभे होते. त्यामुळें श्रीमंत त्यागी बनले—अज्ञ जनता जागृत झाली—आणि अबला शूर बनल्या.

त्याच वेळीं—सन १९२१ सालीं—म. गांधींनीं असहकारितेचें रणशिंग फुंकलें. ब्रिटिशांशीं संपूर्ण असहकार करण्याचें आंदोलन सुरू झालें. त्याचे निनाद हिन्दुस्थानच्या कोनाकोपऱ्यांत दुमदुमले. मग देश-प्रेमाची तळमळ लागलेल्या सरोजिनींना त्या रणशिंगाची ललकारी ऐकून थोडेंच स्वस्थ बसवणार ? “ माझ्या देशाला ही जी अन्यायाची आग लागली आहे, ती थोडीच गुलाबपाण्यानें शमणार आहे ? माझा देश स्वातंत्र्याच्या युद्धांत गुंतला असतांना मी काव्याच्या हस्तिदंती मनोऱ्यावर रमत राहूं काय ? ” त्यांचें मन गुणगुणलें.

सरोजिनींनीं या आंदोलनांत उडी घेण्याचें ठरविलें. त्यासाठीं त्यांनीं प्रथम आपल्या उंची वस्त्रांचा त्याग केला. जाड्याभरड्या खादीचे कपडे त्या वापरूं लागल्या. पण ते कपडेसुद्धां सरोजिनीबाईंना रेशमी वस्त्राहून हलकेफुलके वाटूं लागले. ते कपडे देशभक्तीच्या तंतूंनीं विणले होते ना ?

विलायतेंत, विलायती पोषाख करून, इंग्रजी भाषेंत बोलून, युरोपियनांना चकित करणाऱ्या सरोजिनीदेवी आतां खेड्यापाड्यांत हिंडून, तेथील शेतकऱ्यांच्या भाषेंत बोलून, त्यांच्यासारखा जाडाभरडा पोषाख करून, देशभक्तीचें गीत गात हिंडूं लागल्या—अनत्याचारी असह-

कारितेचा संदेश खेडोपाडीं पोचवूं लागल्या—त्यासाठीं अनेक व्याख्यानें देऊं लागल्या.

आपल्या प्रतिभेच्या दोन्ही पंखांवर काव्य व राजकारण बसवून, सरोजिनी आपल्या वक्तृत्वाच्या भराऱ्या मारूं लागल्या. त्यांच्या रसपूर्ण वाणीनें—योग्य हावभावानें, सारे श्रोते अगदीं मंत्रमुग्ध होऊन जात—वेळेचें भान विसरून जात. त्यांचें व्याख्यान ऐकतांना श्रोतृवर्गाला वाटे, ' आपण एखाद्या विमानांत बसून आकाशांत उंच उंच भ्रमण करीत आहोंत. ' त्यांच्या व्याख्यानांत विनोदाची पखरण असल्यामुळें मधूनमधून हास्याचीं कारंजींहि उडत.

ता. २० जुलै १९२१ रोजीं—लो. टिळकांच्या पुण्यतिथीच्या दिवशीं त्यांना आदरांजली वाहण्यासाठीं, सरोजिनीबाई म. गांधींबरोबर पुण्यास आल्या. त्यावेळीं टिळकमहाविद्यालयांत तरुणापुढें, किर्लोस्कर थिएटरांत स्त्रियांपुढें व शनिवारवाड्यावर साऱ्या जनतेपुढें—सरोजिनींनीं स्वदेशीचा पुरस्कार मोठ्या कौशल्यानें केला. आपण म. गांधीजींचे एक संदेश-वाहक आहोंत असें विनयानें सांगून, सरोजिनीबाईंनीं वक्तृत्वानें बहरलेलीं व्याख्यानें पुणेकरांना ऐकविलीं.

या दौऱ्यांत असतांना सरोजिनींचें धैर्य दिसून आलें. कालिकत येथें त्यांनीं मोपल्यांच्या दंग्याबद्दल एक दणदणीत भाषण केलें व मद्रास सरकारचा खरपूस समाचार घेतला. त्यामुळें " हीं अत्याचारा-संबंधींचीं आपलीं सारीं विधानें मागें घ्या—नाहीं तर खटला करूं. " अशी धमकी मद्रास सरकारनें सरोजिनींना दिली. पण सरोजिनींनीं तसें करण्याचें साफ नाकारलें. त्या सरकारला भ्यायल्या नाहींत—तुरुंगांतील बेड्यांना डरल्या नाहींत. सरकारच त्यांच्या धैर्याला दिपलें व स्वस्थ बसलें.

या दौऱ्याची दगदग सरोजिनीबाईंच्या नाजूक प्रकृतीला मानवली नाहीं. प्रकृतिस्वास्थ्यासाठीं १९२२ सालीं त्या सिलोनला गेल्या. तेथें गेल्या तरी सरोजिनींची भूमिका एकच होती व ती म्हणजे— " स्वातंत्र्याच्या सेनानीची ! " तेथें हजारों लोकांपुढें दोनदोन तास व्याख्यानें देऊन, म. गांधीजींच्या कार्याचा परिचय, त्यांनी करून दिला व तेथील लोकांची

सहानुभूती मिळविली. असें वर्षभर प्रचारकार्य करून व प्रकृति-स्वास्थ्य मिळवून, सरोजिनीबाई एक वर्षानें—१९२३ सालीं—हिन्दुस्थानांत परतल्या.

त्यावेळीं म. गांधी येरवडा तुरुंगांत होते. सरोजिनीबाई पुण्यास गांधींना भेटण्यास आल्या होत्या. गांधींना भेटण्यास जातांना त्यांच्या मनश्चक्षुपुढें एक प्रसंग उभा राहिला.

गांधीजी साबरमतीला होते तेव्हां! त्यावेळीं त्यांच्यावर खटल्याची नोटीस बजावली होती. ती कृशमूर्ति शांतचित्तानें भुईवर बसून सूत कांतत होती. जवळच शंकरलाल बँकर उभे होते. सूत टकळीवर गुंडाळलें जात होतें. आणि सरोजिनींच्या हृदयाचा एकेक धागा उकलला जात होता. आतां गांधीजींना कोणती शिक्षा होते? ही काळजी त्यांना लागली होती. आपल्या चिंताग्रस्त डोळ्यांनीं सरोजिनीबाईंनीं गांधीजींकडे पाहिलें, पण त्यांच्या चेहऱ्यावर ना खेद ना खंत! त्यांच्या मुखावर आनंदच ओसंडत होता.

सरोजिनींनीं विचारलें, "बापूजी! आज आम्हां हिन्दी स्त्रियांना एक संदेश द्याल ना?"

गांधीजी हंसून म्हणाले, "सरोजिनीदेवी! चरख्याशिवाय दुसरा संदेश मी कोणता देणार? तुम्हीं स्त्रियांनीं चरखा सतत चालविला पाहिजे."

हा त्यांचा संदेश घेऊन सरोजिनीबाई जाण्यास उठल्या. तोंच गांधीजींनीं त्यांचा कान धरला व त्यांना खालीं बसवीत ते म्हणाले,

"जातां कुठें? संदेश मिळाला—म्हणजे झालं कां तुमचं काम?"

"मग आणखी कोणतं काम शिल्लक आहे? मी तें करण्यास आनंदानें तयार आहें." सरोजिनी आज्ञाधारकपणें म्हणाल्या.

"तुमचं खरं काम प्रेमधर्म वाढविण्याचं आहे. दुसरं कांहीं केलं नाहीं तरी चालेल. पण एकी करण्याचं—सलोखा निर्माण करण्याचं—कार्य तुम्हीं अवश्य केलं पाहिजे."

"वा:! हें तर माझ्या अगदीं आवडीचें काम!" असें सरोजिनी म्हणाल्या व जाण्यास निघाल्या.

अनु. क्र. ५।११ वि: ......
क्रमांक ९५९ नों: दि: ५५-७१

हा प्रसंग मनांत पहातां पहातां, त्या तुरुंगाच्या भीषण दारापुढें कधीं येऊन ठेपल्या, हें त्यांचें त्यांनाहि कळलें नाहीं. पण तुरुंगापाशीं आल्यावर त्यांना कळलें, म. गांधीजींची भेट होणें शक्य नाहीं. त्यांची भेट घेण्याची बंदी केली होती तुरुंगाधिकाऱ्यानें! पण कवीच्या स्वैर मनाला बंदी कोण करणार? मनापुढें बापूजींची मूर्ति आणून सरोजिनींनीं त्यांचें दर्शन घेतलें व त्या येरवड्याहून पुण्यास आल्या.

तेथें त्यांनीं हा सारा वृत्तांत सभेमध्यें हजारों लोकांना सांगितला. आपल्या भाषणाचा शेवट करतांना, सरोजिनीबाईंनीं सर्वांना कळकळीची विनंति केली, " स्त्रियांनो! तुम्ही स्वदेशी व्रत आचरा, हाच म. गांधींचा तुम्हांला संदेश आहे. येथल्या वायुलहरी गांधीजींच्या कारागृहांत जात आहेत. त्या तुमची प्रतिज्ञा त्यांना खचित नेऊन पोचवतील. "

आणि १९२२ सालच्या त्या ऐतिहासिक खटल्याच्या निकालाचा तो अभूतपूर्व प्रसंग तर, सरोजिनींनीं सभेंत आपल्या अलौकिक वाणीनें, मोठ्या बहारीनें वर्णन केला. त्या म्हणाल्या,

" तो खटला पहात असतांना आणि त्यांत गांधीजींचे धीरोदत्त उद्गार ऐकतांना, मला तशाच दुसऱ्या एका खटल्याचें स्मरण झालें. दोन हजार वर्षांपूर्वींचा तो प्रसंग होता! जगांत शांततेचा संदेश दिला, हाच गुन्हा एका दिव्य नेत्यानें केला होता. आणि त्याबद्दल त्याला खिळे ठोकून ठार मारण्यांत आलें होतें—त्या येशू खिस्ताचाच अवतार मला गांधीजींच्या ठिकाणीं दिसूं लागला. तेंच धैर्य! तेंच मानव-प्रेम! आणि तीच शांतवृत्ति! तो त्यांच्या रुपानें अखिल भारतात जणुं उभा होता. कोट्यवधी भारतीयांचा स्वार्थत्याग व ध्येयनिष्ठा यांचा जणुं पुतळाच तेथें उभा होता. गांधीजींची मूर्ति म्हणजे स्वातंत्र्याची लालसाच! "

◆ ◆ ◆

१९२३ साली सरोजिनींच्या राजकीय कार्याचा आणखी एक नवीन कप्पा उघडला गेला. त्यावेळीं आफ्रिकेमधील हिन्दी लोकांचा छळ अगदीं शिगेस पोचला होता. केनिया व इतर वसाहती ब्रिटिशांच्या जुलुमाखालीं चिरडल्या जात होत्या—त्यांचे नागरिकत्वाचे हक्क हिरावले

जात होते—मतदानाचें स्वातंत्र्य गमावलें होतें, व तेथें स्थायिक राहण्याची मोकळीक त्यांना नव्हती. हिंदी रहिवाश्यांचें भांडवल आपल्या घशांत घालून, त्यांना हाकलून देण्याचे प्रयत्न, ब्रिटिश सरकार करीत होते.

त्यांच्या निषेधार्थ १९२३ सालीं ऑल इंडिया काँग्रेस कमिटीनें असा ठराव मंजूर केला कीं, " ब्रिटिश साम्राज्यांत हिन्दी लोकांना समानतेचा व मानाचा दर्जा प्राप्त होणें आवश्यक आहे. पण तसा दर्जा केनियाच्या बाबतींत देण्याचें ब्रिटिश सरकारनें नाकारलें आहे. म्हणून सर्व देशभर शांततायुक्त मार्गानें या कृत्याचा निषेध करावा. "

पण या नुसत्या सहानुभूतीनें काय होणार ? सहानुभूतीला सक्रिय पाठिंब्याची आवश्यकता असते. त्यासाठीं सरोजिनीदेवींना आफ्रिकेला पाठविण्याचें काँग्रेसनें ठरविलें. केनियाला भरणाऱ्या हिन्दी काँग्रेसला सरोजिनी राष्ट्रीय सभेच्या प्रतिनिधी म्हणून गेल्या.

सरोजिनींनीं आफ्रिकेंत पाऊल ठेवलें. सरोजिनीबाई आल्याचें कळतांच तेथील पुढाऱ्यांच्या कार्यास जोर चढला—आपला त्राता म्हणून, ते आफ्रिकेंतील सारे हिंदी नागरिक, सरोजिनींकडे पाहूं लागले. यापूर्वी बराच काळ आफ्रिकेंत वास्तव्य करून—त्यांच्यामध्यें चळवळ करून म. गांधीजींनीं त्यांच्या मनोभूमींत सत्याग्रही वृत्तीची पेरणी केली होती आणि आतां सरोजिनीबाईंच्या विचार-सिंचनानें ती वृत्ति अंकुरित होत होती.

सरोजिनींनीं वसाहतींतील हिंदी लोकांच्या झोपडींत पाऊल ठेवलें—त्यांच्या साऱ्या करुण कहाण्या आस्थेनें ऐकल्या—व आपल्या बुद्धिचातुर्यानें त्यांचें सांत्वन केलें. " आपलीं गाऱ्हाणीं दूर होईपर्यंत थांबूं नका—चळवळ सारखी चालू ठेवा " अशी एकसारखी प्रेरणा देऊन सरोजिनींनीं त्या हिंदी रहिवाशांच्या जीवनांत नवचैतन्याचा संचार केला.

वठलेल्या वृक्षावर पर्जन्याची पहिली वृष्टि होतांच तो वृक्ष जसा पानाफुलांनीं पुनः पहिल्यासारखा बहरून जातो; त्याप्रमाणें जुलुमानें त्रस्त झालेल्या व छळानें गांजलेल्या त्या हिंदी रहिवाश्यांचीं मेलेलीं मनें सरोजिनींच्या व्याख्यानानें—त्यांतील विचारानें—पुनः टवटवीत झालीं—जीवंत झालीं—कार्यप्रवण झालीं.

ब्रिटिश सरकारनें हिंदी जनतेचें सर्वस्व हिरावून घेण्यासाठीं ‘ क्लास एरिआज् ’ अगर सेग्रिगेशन यासारखीं बिलें तयार केलीं होतीं. त्यांचा निषेध करण्यासाठीं सरोजिनीदेवी वाऱ्याच्या वेगानें सर्वत्र हिंडूं लागल्या. त्यांच्या प्रयत्नानें त्यावेळीं वरील दोन्ही बिलें मागें पडलीं. सरोजिनींनीं तेव्हां असें सुचविलें कीं, “ दक्षिण आफ्रिका व हिंदुस्थान यांचें भांडण मिटविण्यासाठीं एक गोलमेज परिषद भरवावी. ” तशी परिषद पुढें भरलीहि. सरोजिनींच्या या कार्याची परतफेड आफ्रिकन लोकांनीं पुढें केली. १९२९ सालीं पूर्व आफ्रिकेंतील इंडियन कॉंग्रेसनें त्यांना वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून बोलविलें. सरोजिनींनींहि त्या आमंत्रणाचा आनंदानें स्वीकार केला.

आफ्रिकेप्रमाणें अमेरिकाहि सरोजिनींच्या व्याख्यानाला भुकेली होती. सन १९२८ सालची गोष्ट ! मिस् मेयो या लेखिकेचें “ मदर इंडिया ” हें पुस्तक अमेरिकेंत नुकतेंच प्रसिद्ध झालें होतें. त्यांत तिनें भारतमातेची भयंकर बदनामी केली होती. या खोडसाळ प्रचारानें अमेरिकेंत हिन्दुस्थानाबद्दल गैरसमजाचें वादळ निर्माण झालें होतें. तें शमविण्यासाठीं सरोजिनी अमेरिकेंत गेल्या. युनायटेड स्टेटस् व कॅनडा येथें दहा दहा सभा त्यांनीं घेतल्या व आपल्या बिनतोड युक्तिवादानें व अस्खलित वक्तृत्वानें तें गैरसमजाचें वादळ शांत केलें – अमेरिकनांच्या मनांत हिन्दुस्थानाबद्दल सहानुभूति व आपुलकीची भावना निर्माण केली – हिन्दुस्थानची प्रतिष्ठा अमेरिकेंत उंच वाढविली. या त्यांच्या कार्यामुळें अमेरिकन जनता, सरोजिनींना “ भारताच्या परराष्ट्रांतील वकील ” मानूं लागली.

१९३० साल हें भारताचें युद्धपर्वच ! त्या वर्षीं महात्मा गांधींनीं मिठाच्या सत्याग्रहाचें एक नवीनच अस्त्र उपसलें होतें. मिठासारख्या नैसर्गिक वस्तूवर कर बसविणें याहून जास्त जुल्म कोणता ? महात्माजींनीं मिठाचा कायदा मोडण्याचें ठरविलें. त्यासाठीं त्यांनीं दांडीला जाण्याचें निश्चित केलें. ही बातमी सरोजिनींना आधीं कळली होती.

ता. १२ मार्च १९३० रोजीं सूर्य आकाशांत उगवला. ज्या सूर्यानें शिवरायाच्या सेवेसाठीं पावनखिंडीमधील निवडक मावळ्यांसह प्राण-

पणानें लढणाऱ्या बाजी प्रभूचें शौर्य अवलोकिलें — तोच सूर्य आज स्वातंत्र्यासाठीं वेचक सत्याग्रह्यांनिशीं कायदेभंगास निघालेल्या गांधीजीं-चा सात्विक पराक्रम डोळे भरून पहात होता.

या कायदेभंगाच्या मोहिमेसाठीं त्यांच्याबरोबर होते निवडक एकोणऐंशीं सत्याग्रही ! गांधीजी आपल्या सत्याग्रह्यांबरोबर जाऊं लागले. त्यांना निरोप देण्यासाठीं अहमदाबादेस हजारों मंडळी जमली. स्त्रियांनीं अश्रुपूर्ण नयनांनीं गांधीजींना पंचारतीनें ओवाळलें—त्यांच्या भालप्रदेशीं कुंकुमतिलक लावला. सर्वांनीं भरल्या अंत:करणांनीं या निग्रही सत्या-ग्रहींना निरोप दिला. " रघुपति राघव राजाराम " च्या पवित्र शब्दांनीं सारें वातावरण भरून गेलें. पाठीवर वळकटी टाकून व हातांत काठी घेऊन मोठ्या धैर्यानें व धीमेपणानें पावलें टाकीत गांधीजी निघाले. त्यांच्या मागें त्यांना निरोप देण्यासाठीं उभे होते आब्बास तय्यबजी व सरोजिनीदेवी !

गांधीजी एकेक पाऊल पुढें पुढें जाऊं लागले—त्याबरोबर साऱ्या लहानथोरांचे डोळे पाणावले—कंठ भरून आला. गांधीजींच्या वियोगाचें दु:ख ज्याला त्याला आपल्या वृत्तीप्रमाणें जाणवलें. सरोजिनींची वृत्ति अत्यंत कोमल—नवनीतासारखी! " मेणाहून मऊ " असें त्यांचें मन वियोगाच्या तापानें विरधळून गेलें. ही ' योगियांची विभूति ' चाललेली पाहून, तळें फुटावें नि पाणी बारा वाटा पसरावें, तशी स्थिति सरोजिनींची झाली. दु:खाला घातलेला विवेकाचा बांध फुटला व डोळ्यांतून घळ् घळ् अश्रु वाहूं लागले.

सत्याग्रह्यांची ही सेना दांडीकडे निघाली—केवढ्या उत्साहानें ! केवढ्या आशेनें ! केवढ्या धैर्यानें ! सत्याग्रही जेथें जेथें जात; तेथें तेथें प्रचंड संख्येनें लोक जमत— त्या महात्म्याला वंदन करीत व त्यांच्या जय-जयकारानें आकाश दुमदुमून सोडीत. जेथें जेथें महात्माजींचें पाऊल पडे, तेथून परकीय सत्तेचें पाऊल निघे. भडोच, सुरत, नडीयाद वगैरे ठिकाणीं चोवीस दिवस हिंडल्यावर ता. ५ एप्रिलला महात्माजी आपल्या सैनिकांसह दांडीस पोचले. तेथें सरोजिनीदेवी त्यांना भेटण्यासाठीं गेल्या. त्या जणुं महात्माजींची सावलीच बनल्या.

दुसरे दिवशीं ता. ६ रोजीं प्रभातकालीं सारे सत्याग्रही उठले. सर्वांनीं स्नान करून प्रार्थना केली. महात्माजींच्या चरणाला स्पर्श करून सर्वांनीं त्यांना वंदन केलें. महात्माजी मिठाचा सत्याग्रह करण्यास निघाले. जातांना सर्वांना उद्देशून ते म्हणाले, "मला जर मिठाचा कायदा मोडतांना सरकारनें पकडलें तर माझ्यामागून तुम्ही आब्बास तय्यबजींच्या हुकुमाप्रमाणें वागा. त्यांनाहि जर सरकारनें कैद केलें तर सरोजिनीदेवी सांगतील तसें वागा." एवढा विश्वास होता महात्माजींचा सरोजिनींवर !

गांधीजी समुद्राच्या जवळजवळ जाऊं लागले—एकेक पाऊल टाकूं लागले—समुद्राच्या पाण्याजवळ पोचले व खालीं वाकले. कशासाठीं? किनाऱ्यावर पडलेलें मीठ हातांत घेण्यासाठीं — सरकारी हुकूम मोडण्यासाठीं ! जणुं मातीमोल झालेल्या हिन्दी जनतेचें सर्वस्वच त्यांनीं आपल्या हातांत उचलून घेतलें. तोंच—

"कायदेभंग करणाऱ्या महात्माजींचा विजय असो !"

सरोजिनी एकदम भावनावेगानें ओरडल्या. हा त्यांचा आवाज समुद्रावर दुमदुमला—किनाऱ्याकिनाऱ्यावर थडकला. प्रत्येक स्वयंसेवक मिठाचें पोतें भरभरून नेऊं लागला—मिठाचा कायदा मोडूं लागला. जणुं कांहीं दामाजीनें खुलें केलेलें धान्याचें बादशाही कोठारच !

झालें ! पोलिसांच्या मोटारी समुद्रकिनाऱ्याकडे धावूं लागल्या. पोलिसांच्या पलटणी मीठ जप्त करूं लागल्या व सत्याग्रह्यांच्या हातांतील मीठ हिसकावून घेऊं लागल्या.

सर्व देशांत मीठ-सत्याग्रहाला मोठया जोरानें सुरवात झाली. सत्याग्रही मिठाचा कायदा मोडीत होते, तर सरकारी पोलिस बंदुकीच्या गोळ्या सोडीत होते. आणि एक दिवस असा उजाडला कीं, या युद्धाचा कर्णधार शत्रूच्या हातीं सांपडला. ता. ५ मे रोजीं गांधीजींना अटक करण्यांत आली. परंतु सत्याग्रहाचें कार्य पुढें चालूच होतें. गांधीजींनंतर ठरल्याप्रमाणें आब्बास तय्यबजी यांनीं सत्याग्रहाचें नेतृत्व स्वीकारलें. तों त्यांना १२ तारखेस अटक झाली. आब्बास तय्यबजींनंतर सरोजिनीदेवी पुढें झाल्या. त्यांनीं सत्याग्रहाचें पुढारीपण मोठया धैर्यानें आपल्या हातीं घेतलें व धारासणाकडे त्या वळल्या—कशासाठीं?

धारासणा हें गुजरातमधील मिठागर! तेथील मिठावर हल्ला करण्याचें महात्माजींनीं ठरविलेंच होतें, पण आतां महात्माजी तुरुंगांत होते. परंतु त्यांचे अनुयायी तें कार्य सिद्धीस नेण्यास तयार होते. महात्माजींच्या सत्याग्रहाची सांगता करण्यासाठीं सरोजिनीदेवी १६ एप्रिलला धारासणा-कडे गेल्या. " आगे बढो ! " " आगे बढो ! " अशी रणगर्जना करून त्यांनीं सर्व सत्याग्रह्यांच्या मनांत चैतन्य निर्माण केलें—त्यांच्या वीरश्रीला आव्हान केलें. त्या वेळेस त्यांच्या अंगात जणुं रणमैदानावर चमकणाऱ्या झांशीच्या राणीचें शौर्य संचारलें होतें.

सरोजिनींनीं दैवाला उद्देशून केलेल्या एका कवितेंत वर्णन केल्याप्रमाणें, त्या साम्राज्यसरकारला जणुं निर्धारानें म्हणत होत्या,

> " तुम्ही मला यातना देऊन माझें रक्त गोठवूं शकाल—तुम्ही मला वेदना देऊन माझे अवयव बद्ध करूं शकाल—पण पर्जन्याच्या सरींवर नाचणारी माझी स्वैरगामिनी—गगनचुंबी कल्पनाशक्ति तुम्ही कशी अडवूं शकाल? झंझावाताप्रमाणें निर्भयतेनें दशदिशा धावणारें माझें विजयी मन तुम्ही कसें थोपवूं शकाल? तुम्ही माझी आशा नष्ट कराल—माझ्या मधुर स्वप्नांचा भंग कराल—पण माझा प्रशांत व दुर्दम्य आत्मा तुम्ही कसा बंदिवान कराल? तो अखंड आनंदांतच पोहत राहील. "

" सत्याग्रह्यांस साजेलसें वागा. आपली जागा सोडूं नका. " असा आदेश मिठागराजवळ जाऊन सरोजिनीदेवींनीं दिला. आणि त्या स्वत:हि हाल भोगण्यास सज्ज झाल्या. मिठागरावर दिवसभर तशाच बसून राहिल्या. तोंडांत ना पाण्याचा थेंब— ना अन्नाचा कण !

ते ऐन उन्हाळ्याचे दिवस! डोक्यावर माध्यान्हींचा मार्तंड तापला होता, तर पोटांत जठराग्नि पेटला होता. पण या दोन्हींपेक्षांहि प्रखर असा संतापाचा क्रोधाग्नि सरोजिनींच्या अंत:करणांत उठला होता. सरोजिनींच्या डोळ्यांसमोर पोलिसांचा लाठीमार चालला होता. त्या अत्याचारामुळें—लाठीच्या मारामुळें—स्वयंसेवक बेशुद्ध पडत होते. अशा बेशुद्ध पडलेल्या स्वयंसेवकांना खाटेवर घालून सरोजिनींपुढून नेलें जात होतें.



सरोजिनींना जागेवर स्वस्थ बसवेना. त्या उठल्या व पुढें जाऊं लागल्या. तोंच एक स्वयंसेवक त्यांना म्हणाला, "आपण पुढें जाऊं नका. आपल्याला फार त्रास होईल."

"कसला त्रास मला होणार आहे? या सत्याग्रहांत मला मृत्यु जरी आला, तरी मी तो आनंदानें सहन करीन." सरोजिनी निर्धारानें म्हणाल्या.

"तें खरें आहे. पण युद्धमंडळाचा हुकूम असा आहे कीं, आपण यांत प्रत्यक्ष भाग घेऊं नये." स्वयंसेवकानें त्यांना आठवण करून दिली.

"मला तो निर्णय मुळींच पसंत नाहीं. मी तेथें जाणारच !"

"मग चला तर! आम्ही आपल्याला नेण्यासाठींच आलों आहोंत." हे शब्द सरोजिनींच्या मागून आले. सरोजिनींनीं मागें वळून पाहिलें, तों कुचेष्टेनें हंसत उभे असलेले सरकारी पोलिस ! सरोजिनींचें लक्ष त्या पोलिसांच्या हातांतील अटकेच्या हुकुमाकडे गेलें. त्या म्हणाल्या, "म्हणजे, तुम्ही मला अटक करण्यासाठीं आला आहांत ?"

"अर्थात्."

"चला तर. मी तुमच्याबरोबर तुरुंगांत येण्यासहि तयार आहें." सरोजिनीदेवी मोठ्या धैर्यानें पोलिसाबरोबर गेल्या. त्यांना नऊ

महिन्यांची शिक्षा झाली. तींहि त्यांनीं आनंदानें झेलली व शांतपणें सहन केली.

१९३१ सालीं सप्रू–जयकर ह्यांच्या मध्यस्थीनें ' गांधी-आयर्विन करार ' झाला व हिंदुस्थानचा प्रश्न सोडविण्यासाठीं इंग्लंडमध्यें सर्वपक्षीय ' गोलमेज परिषद ' भरविण्याचें ठरलें. तेव्हां राष्ट्रसभेतर्फे महात्माजी व महिला मंडळातर्फे सरोजिनीदेवी तेथें गेल्या.

तेथें असतांनाहि सरोजिनींचा हिंदु-मुस्लिम ऐक्याचा प्रचार चालूच होता. त्यासाठीं हिंदु-मुसलमानांच्या भेटींचे योग त्या मुद्दाम घडवीत होत्या. पण इंग्रज लोक ह्या ऐक्याला आंतून सुरुंग लावीत होते. " आतां आपले मार्ग भिन्न झाले." असें खडखडीतपणें ब्रिटिश सरकारला बजावून गांधीजीप्रभृति हिन्दुस्थानास परत आले.

१९३२ सालीं धुमसत असलेला हिंदी जनतेचा संताप पुन: उसळून वर आला व सत्याग्रहाच्या रूपानें सर्वत्र पसरूं लागला. ता. २४ एप्रिलला दिल्ली येथें ४७ वी राष्ट्रीय सभा भरली. तिचें वैभव काय वर्णावें ?— तेथें अधिवेशनाचा भव्य मंडप उभारला होता का ? तेथें अध्यक्षांची रथांतून मिरवणूक होती का ? तेथें लाखों लोकांचा मेळावा जमला होता का ? छे: ! यापैकीं कांहींहि तेथें नव्हतें. ती राष्ट्रसभा म्हणजे क्षणभर चमकणारी विद्युल्लताच ! दिल्लीच्या चांदणी चौकांत पोलिसांची नजर चुकवून हें अधिवेशन भरलें होतें—तेंहि फक्त दहा मिनिटें. या दहा मिनिटांत पांच ठराव मंजूर झाले. सभेच्या जागीं शेदोनशें प्रतिनिधि हजर होते. अध्यक्षस्थानीं होते पं. मदनमोहन मालवीय !

पण दिल्लीकडे येतांना वाटेंतच त्यांना पकडलें. पुढें आठच दिवसांत त्यांची मुक्तता झाली. त्या वेळीं सरोजिनीबाई दिल्लीकडे निघाल्या होत्या—सरकारचा बंदीहुकूम मोडून निघाल्या होत्या. तोंच वांद्रा स्टेशनवर त्यांना अटक झाली. पुढें खटला होऊन त्यांत त्यांना एक वर्षाची शिक्षा झाली. हा सरोजिनींचा दुसरा तुरुंगवास !

सन १९४२ सालीं " चले जाव "च्या घोषणेनें सारा भारतदेश दुमदुमला गेला. ब्रिटिश सिंहाच्या छातींत धडकी भरली. म. गांधींच्या

या घोषणेनें सारें राष्ट्र हादरलें. राष्ट्रांतील मोठमोठ्या पुढाऱ्यांची सरकारनें धरपकड करण्यास सुरुवात केली व सर्व पुढाऱ्यांना अहमदनगरच्या तुरुंगांत कोंडून ठेवलें. पण म. गांधींना पुण्याच्या 'आगाखान प्रासादांत' डांबून ठेवलें. त्यांच्याबरोबर सरोजिनी – कस्तुरबा – महादेवभाई ही मंडळी तेथें होती. सरोजिनींच्या आनंदी स्वभावामुळें व विनोदी वृत्तीमुळें तुरुंगांतील वातावरणहि साऱ्यांना घरच्यासारखें वाटूं लागलें.

याच ठिकाणीं महात्माजींवर महादेवभाईंच्या व कस्तुरबांच्या मृत्यूचे दोन दारुण आघात झाले. पुत्रापेक्षांहि प्रिय असणारा आपला सहकारी आणि साठ वर्षें आपल्या संसारांत समरस झालेली आपली सहधर्मचारिणी–हे दोघे आपल्याला सोडून गेले, म्हणून गांधीजींना अगदीं एकटें वाटूं लागलें. अशा दोन दु:खांच्या कात्रींत सांपडलेलें महात्माजींचें मन शांत करायला सरोजिनींशिवाय तेथें दुसरें होतें कोण ? त्या आपल्या विनोदी वृत्तीनें गांधीजींचें दु:खी मन रिझवीत असत. पुढें आजारीपणामुळें १९४४ सालीं महात्माजींची सुटका झाली. त्यावेळीं सरोजिनी मातेप्रमाणें त्यांची सेवाशुश्रूषा करूं लागल्या–त्यांचा संदेश देशभर पोंचवूं लागल्या.

आतां हिंदुस्थान स्वातंत्र्याच्या सोनेरी उंबरठ्यावर उभा राहिला होता—१९४७ साल स्वातंत्र्याच्या सोनेरी तुताऱ्या वाजवीत होतें—स्वतंत्र भारताची घटनापरिषद चालू होती—पं. जवाहरलालाचें राष्ट्रीय मंत्रिमंडळ देशाचा कारभार हाकीत होतें. पंडितजींच्या राजकीय प्रतिभेनें आशियाच्या संघटनेचें दिव्य स्वप्न पाहिलें. त्यांनीं १९४७ सालीं मार्चमध्यें दिल्ली येथें आशियांतील राष्ट्रांची अपूर्व परिषद बोलाविली. तिच्या अध्यक्षपदीं कोण विराजमान होणार ?

आपल्या स्वर्गीय वक्तृत्वानें व दिव्य प्रतिभेनें सर्व मानवजातीला ऐक्याचें आवाहन करणाऱ्या सरोजिनीदेवीच !

काव्याचा सोनेरी पिंजरा सोडून सरोजिनीदेवी या राजकारणाच्या आखाड्यांत कां उतरल्या? ना. गोखले, – लो. टिळक व म. गांधी यांचा खडतर मार्ग कोमल मनाच्या या कवियत्रीनें कां पत्करला? काव्याची सतार गवसणींत घालून राजकारणाची समशेर या महिलेनें हातीं कां धरली? काव्याकडून राजकारणाकडे सरोजिनी कशा वळल्या? हें त्यांच्या जीवनांतील एक रहस्य आहे. पण त्याचें उत्तर स्वत: सरोजिनींनींच दिलें आहे. मद्रासमध्यें आपल्या एका भाषणांत त्या म्हणाल्या, "मला वारंवार असें विचारण्यांत येतें कीं, तुम्ही सुवर्णमय स्वप्नसृष्टींतून या राजकारणाच्या रणांगणावर कां ठाकलात? काव्याची मधुर बासरी आणि वीणा सोडून तुम्ही राष्ट्राच्या कानांत रणशिंग फुंकण्यास कां सिद्ध झालांत?"

या शंकेचें निराकरण करतांना सरोजिनी पुढें म्हणाल्या, "कवीचें खरें कार्य सोनेरी स्वप्नसृष्टींतील गुलाबाच्या उद्यानांत विहार करणें नव्हे, तर सामान्य जनतेंत – चौफेर उधळणाऱ्या राजकारणाच्या धुळींत – लढाईचे जागीं कवीचें खरें कार्यक्षेत्र आहे. आतां यापुढें राजकारण हेंच हिंदुस्थानचें काव्य व राजकारण हाच हिन्दुस्थानचा विनोद आहे."

असें स्फूर्तिप्रद काव्य लिहिणारा कवि कसा असावा लागतो? त्याचें अंत:करण कसें विशाल असावें लागतें? हें सरोजिनींनीं एकदां लखनौच्या कॉलेजांत भाषण करतांना स्पष्ट केलें. त्या म्हणाल्या, "मी कवियत्री असलें तरी इकडून तिकडे सतत वाऱ्यासारखी हिंडणारी आहें. कवि हा केवळ स्वप्नें रचण्यांत रमणारा नव्हे. कवीचें हृदय हें विश्वाच्या भावनांचें प्रतिबिंब आहे. त्याचीं हर्षभरित गीतें म्हणजे जगताच्या हास्याचे प्रतिध्वनि! आणि त्याचीं दु:खमिश्रित कवनें म्हणजे मानवजातीचे अश्रु!"

कवीच्या अशा उच्च भूमिकेवरून सरोजिनीदेवी आपलें राजकारण करीत होत्या. ‘ हिंदी स्त्रियांची उन्नति ’ व ‘ हिंदु-मुस्लिम ऐक्य ’ हीं त्यांच्या कार्याचीं दोन फुप्फुसें होतीं. त्यासाठीं त्यांनीं आपलें तन-मन-धन अर्पण केलें होतें. अखिल भारतीय सामाजिक परिषद कोठेंहि भरो, तिचें अध्यक्षस्थान सरोजिनींकडेच ! कोठेंहि अन्याय होत असो, तो दूर करण्यास सरोजिनी सदा तत्पर ! भारताबद्दल कोणी अवमानाचे शब्द उच्चारो, त्याचा समाचार घेण्यास सरोजिनी हजर ! कुठें विचारांचें वादळ उठो कीं सरोजिनी त्यांत तडजोड करण्यास नेहमीं सिद्ध ! त्यांच्या मनाला ऐक्य-भावनेचें वेड लागलें होतें. “ बेकी ही राष्ट्राची मारक शक्ति व ऐक्य ही तारकशक्ति आहे.” असें त्यांचें ठाम मत बनलें होतें.

असें ऐक्य करण्याची संधी त्यांना वारंवार मिळाली. १९२२ सालीं जेव्हां कॉंग्रेसच्या कायदेभंग-चौकशीचा रिपोर्ट बाहेर पडला, तेव्हां त्यावर विचार करतांना कॉंग्रेसमध्यें दोन तट पडले. एक कौंसिल-प्रवेशवादी व दुसरा कौंसिल-बहिष्कारवादी. राजगोपालाचार्य, अन्सारी व अयंगार हे कौन्सिल बहिष्कारवादी होते, तर मोतीलाल नेहरु, विठ्ठलभाई पटेल वगैरे मंडळी कौन्सिलप्रवेशाला अनुकूल होती. पुढें जेव्हां कलकत्याला अखिल भारतीय कॉंग्रेसचें अधिवेशन भरलें, त्यावेळीं हा वाद जास्तच माजला व हा प्रश्न पुढें ढकलावा असें ठरलें. पण त्यांच्यांत तेव्हांच कांहीं तरी तडजोड व्हावी, ऐक्य कायम रहावें म्हणून सरोजिनीदेवींनीं दोन दिवस आटोकाट प्रयत्न केले. त्या स्वतः कौंसिल-बहिष्कारवादी होत्या. त्यांना नक्की असें माहीत होतें कीं, “ प्रत्यक्ष मतें घेतलीं तर कौंसिल-बहिष्कारवादी पक्षालाच जास्त मतें मिळतील. ” पण त्यामुळें त्यांच्या मनाला विजय मिळाल्याचें समाधान तर लाभणार नव्हतेंच, पण फूट पडल्याची चुटपूट मात्र लागली असती. म्हणून हा प्रश्न सर्वांचीं मतें संभाळण्यासाठीं पुढें ढकलला.

असाच तडजोडीचा प्रयत्न त्यांनीं १९२५ सालीं पाटणा येथें केला. १९२४ सालीं बेळगांवच्या कॉंग्रेसनें असा ठराव मांडला होता

कीं, जो सभासद दरवर्षी ठराविक सूत काढील त्यालाच काँग्रेसमध्यें मतदानाचा हक्क प्राप्त होईल. पण हा ठराव १९२५ सालीं पाटणा येथे रद्द करण्यांत आला. त्यामुळें काँग्रेसमध्यें बरेच तट पडले. त्यांना उद्देशून सरोजिनींदेवी म्हणाल्या, "खादी-पोशाखासारख्या निरुपद्रवी अटीबद्दल काँग्रेसनें आग्रह धरणें हें पोरकटपणाचें आहे. पण असें जरी असलें, तरी क्षुल्लक निमित्तावरून काँग्रेसमधून बाहेर निघणें, हेंहि समंजसपणाचें आहे असें नाहीं—काँग्रेसमध्येंच राहून ही अट बदलून घेणें, हें प्रत्येक सभासदाचें कर्तव्य आहे."

सरोजिनींच्या या समतोल वृत्तीचें दर्शन सन १९२६ मध्यें 'स्वराज्य पक्ष' व 'प्रतिसहकार पक्ष' यांच्यांत तडजोड घडवून आणण्याच्या वेळीं झालें. त्या वेळीं सरकारचीं अधिकारपदें स्वीकारावींत कीं न स्वीकारावींत, या वादावर दोन पक्ष निर्माण झाले. ज्यांच्या मतें सरकारांत शिरून मोठमोठ्या अधिकाराच्या जबाबदारीच्या जागा स्वीकाराव्यात व त्याच्या साहाय्यानें जनतेचें हित करावें. हा पक्ष प्रतिसहकार या नांवानें ओळखला जाई. त्यांत अणे—केळकर—जयकर इत्यादि मंडळी होती. सरकारचीं अधिकारपदें स्वीकारूं नयेत या मताचा जो पक्ष तो स्वराज्य पक्ष! या प्रतिसहकार व स्वराज्य पक्ष यांच्यांत १९२६ सालीं गांधीजींच्या साबरमती—आश्रमांत तडजोड ठरली. त्यावर पहिली सही केली सरोजिनीदेवींनीं!

◆ ◆ ◆

अशा ऐक्यभावनेनें भरलेलीं व देशप्रेमानें नटलेलीं त्यांचीं व्याख्यानें असत, म्हणून तर सर्वांना त्यांचें वक्तृत्व प्रिय असे. देशभक्ति व काव्यशक्ति यांचा मधुर मिलाफ त्यांच्या व्याख्यानांत होत असे. सरोजिनींची शब्दयोजना डौलदार असे, त्यांची वाक्यरचना लयबद्ध असे व त्यामध्यें मधूनमधून विनोदाची पखरण केलेली असे! स्फटिकाला वाचा फुटली असतां त्याचें जसें सौंदर्य दिसेल, तसें सौंदर्य सरोजिनींच्या वक्तृत्वांत असे.

१९३० सालची गोष्ट. ६ एप्रिलचा दिवस होता तो. सकाळींच महात्माजींनीं मिठाचा कायदा मोडला होता. दुपारीं चार वाजण्याची वेळ. एका वटवृक्षाखालीं या सत्याग्रह–युद्धांतील सेनापती शांतपणें बसला होता. त्याच्याभोंवती बरीच मंडळी जमली होती. त्यांतील कांहींनीं गांधीजींना बोलण्याची विनंती केली. पण त्या दिवशीं म. गांधी यांचा मौनवार होता. त्यांनीं सरोजिनी व आब्बास तय्यबजी यांना बोलण्याची आज्ञा लिहून कळविली.

दोघांना बोलण्याची आज्ञा मिळाली खरी, पण आधीं कोण बोलणार ? सरोजिनी कीं आब्बास तय्यबजी ? दोघांत गंमतीचें भांडण सुरू झालें.

सरोजिनी म्हणाल्या, " तय्यबजी ! तुम्ही वयानें मोठे आहांत ना ? मग प्रथम बोलण्याचा मान तुमचाच ! "

तय्यबजी लागलीच मान हलवीत म्हणाले, "छे: ! छे: ! वयानें मोठा असलों म्हणून काय झालें ? वयावर थोडीच विद्वत्ता अवलंबून असते ? तुम्ही राजकारणांत अग्रेसर- जगांतील पहिल्या प्रतीच्या वक्त्री अन् कवयित्री ! तेंव्हां तुम्हीच बोललं पाहिजे प्रथम."

" मी नाहीं प्रथम बोलणार--तुम्हीच बोला. "

" अहो ! मी–तूं करतां करतां केवढा मोलाचा वेळ चालला आहे निघून. एवढयांत भाषणहि झालं असतं तुमचं–उठा–उठा. "

सरोजिनी उभ्या राहिल्या. तय्यबजींना वाटलें, आपलाच जय झाला. सरोजिनी म्हणाल्या, "मी आतां आब्बास तय्यबजी यांना भाषण करण्याची विनंती करतें. त्यांनीं माझ्या विनंतीला मान देऊन भाषण करण्यास उठावें. आणि त्यांना ही विनंती ऐकावयाची नसेल, तर मी राष्ट्रसभेची अध्यक्ष म्हणून हुकूम देतें, तो त्यांनीं मानलाच पाहिजे." असें तय्यबजीं-कडे हंसत हंसत पाहून सरोजिनींनीं फर्माविलें. सारे लोक त्यांची समयसूचकता पाहून हसूं लागले.


असाच दुसरा एक विनोदी प्रसंग एका व्याख्यानांत उद्‌भवला. सन १९१९ सालची गोष्ट ! सरोजिनीदेवी दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यावर होत्या. त्या वेळीं त्यांचीं तेथें अनेक व्याख्यानें झालीं. त्यांपैकीं त्यांच्या एका व्याख्यानांत विनोदाचे तुषार किती गंमतीनें उडाले !

सभागृह श्रोत्यांनीं अगदीं फुलून गेलें होतें. सर्वत्र शांतता पसरली होती. अध्यक्ष बोलण्यास उठले. पण त्यांना सरोजिनींसारखें अस्खलित वक्तृत्व कसें जमणार ? त्यांना नीट बोलतां येईना. त्यामुळें सारे श्रोते एकदम गडबड करूं लागले—ओरडूं लागले—आदळआपट करूं लागले. हें पाहतांच सरोजिनी उठून उभ्या राहिल्या व गॅलरींत दंगा करणाऱ्या लोकांना उद्देशून म्हणाल्या, "हे गॅलरींतील माझ्या देवांनो व देवतांनो !" सरोजिनींच्या तोंडची ही विनोदी हांक साऱ्या प्रेक्षकांना रुचली व सर्व सभागृहांत पूर्वींसारखी शांतता पसरली. रागाच्या दहा वाक्यांनीं जें साधणार नाहीं, तें सरोजिनींच्या एका लहानशा विनोदी वाक्यानें साधलें— व तेंहि कोणाचीं मनें न दुखवितां !

सरोजिनींची ही विनोदबुद्धी जशी व्याख्यानांत व काव्यांत चमके, तशी ती त्यांच्या जीवनांतहि शिरलेली दिसे. त्यांच्या जीवनांतील लहानमोठे किती तरी प्रसंग ह्या विनोदी अलंकारानें नटलेले आहेत. प्रसंग कितीहि आणीबाणीचा असो—सरोजिनी आपल्या विनोदानें तेथें जमलेल्या लोकांच्या कपाळावरील आठी दूर करीत व ओठावर स्मिताची लकेर पसरवीत. आयुष्यांतील नाना घटनांकडे हंसऱ्या व खेळकर दृष्टीनें सरोजिनी पाहात व त्या सर्वांतून आनंद वेचून घेत.

सरोजिनी आगाखान—प्रासादांत असण्यावेळची गोष्ट ! त्या दिवशीं त्यांनीं आपल्या लाडक्या कन्येला—पद्मजेला—पत्र लिहिलें, व तें टाकण्यासाठीं तेथील अधिकाऱ्याजवळ दिलें. पत्र वाचून मग तें पोष्टांत टाकावयाचें, या नियमाप्रमाणें तो अधिकारी सरोजिनींचें तें पत्र वाचूं लागला. वाचतां वाचतां त्याची दृष्टी एका ओळीवर खिळली.

'राजकन्या नुमाताईची बडदास्त चांगली ठेवावी !' ही ओळ अधिकाऱ्यानें एकदां—दोनदां नव्हे दहांदा वाचली. पण त्याला कांहीं



उलगडा होईना. ही नुमाताई कोण ? आणि ही तर राजकन्या दिसतेय् ! कांहीं तरी राजकारण येथें मुरत असलें पाहिजे. झालें ! अधिकाऱ्याचीं विचारचक्रें उलट दिशेनें फिरूं लागलीं. " त्याच्या डोक्यांत नाना कुशंकांचें वावटळ उठूं लागलें. " ही नुमाताई राजकन्या आहे. तेव्हां एखाद्या संस्थानिकाशीं सरोजिनी कांहीं कट तर रचीत नसतील ना ? काय सांगावें या राजकारणी लोकांचें ! " या विचारानें त्यानें राईचा पर्वत उभा केला.

त्यानें आपल्या हाताखालील नोकरांना बोलाविलें व "हैद्राबादला ज़ाऊन, ही राजकन्या नुमाताई कोण याचा ताबडतोब शोध लावा." असा हुकूम दिला. लगेच नोकर हैद्राबादेकडे रवाना झाले.— जणुं कांहीं वाघाच्या शिकारीसाठींच ! दिवसामागून दिवस उलटले.

आणि एके दिवशीं—

ते सारे नोकर हैद्राबादेहून निराश होऊन परत आले ! त्या अधिकाऱ्यानें त्यांना दरडावून विचारलें, " काय लागला का शोध त्या राजकन्येचा ? "

हात हलवून ते नोकर म्हणाले, " अजिबात नाहीं. आम्ही सर्वत्र गुप्तपणें तपास केला——घराच्या झडत्या घेतल्या. पण राजकन्या नुमाताई ही व्यक्ती कुठेंच सांपडली नाहीं. "

" असें कसें झालें ? " हाताची मूठ टेबलावर आपटून तो अधिकारी म्हणाला. " आतां असंच केलं पाहिजे. "

झटकन् आपल्या टेबलापासून तो दूर झाला——सरोजिनीबाईंकडे गेला. त्यानें त्यांना जोरांत विचारलें, ' ही तुमची राजकन्या नुमाताई कोण आहे ? "

"कां ? आपलं कांहीं काम आहे आमच्या राजकन्येशीं ? "

" त्याच्याशीं तुम्हांला काय करायचं आहे ? विचारतों त्याची नीट माहिती द्या. "

" मग ऐका तर—या राजकन्या नुमाताई म्हणजे आमची लाडकी मनी मांजरी. " असं म्हणून सरोजिनी मोठमोठ्यानें हसूं लागल्या. या विनोदी उत्तरानें त्या अधिकाऱ्याचा चेहरा चांगलाच पडला व तो तरातरा निघून गेला.

◆ ◆ ◆

सरोजिनींच्या हृदय-कमलांतून अशा विनोदाचा सुगंध तर नित्य दरवळत असेच, पण त्यावर भावनांचे दंवबिंदु पडले, तर मग त्याची शोभा काय वर्णावी ?

सरोजिनी येरवड्याच्या तुरुंगांत असतांना हें सौंदर्य सर्वांच्या दृष्टीस पडलें. त्या वेळीं सर्व राजकीय कैदी तुरुंगांत होते. तुरुंगांत असतांनासुद्धां आपलें मन रिझविण्यासाठीं सरोजिनी आजुबाजूला बाग-बगीचा करत. स्मशानाचें उद्यान करण्याची किमया त्यांच्या ठिकाणीं होती. या वेळेंतहि त्यांनीं अनेक लहानमोठीं फुलझाडें तुरुंगाच्या आवारांत लावलीं होतीं. आतां त्या झाडांना सुंदर सुंदर कळ्या येऊं लागल्या होत्या. हें सारें पाहतांना सरोजिनी आपले कष्ट – आपलें दुःख विसरीत व निर्मितीच्या आनंदाचें सुख अनुभवीत.

एके दिवशीं त्या झाडांना आलेल्या त्या मुग्ध कलिका पाहण्यांत सरोजिनी गुंतल्या होत्या——अगदीं कालिदासाच्या शकुंतलेप्रमाणें ! तोंच आजूबाजूचे कैदी तेथें धांवत आले व त्यांना म्हणाले, " आज तुम्हांला एक आनंदाची बातमी सांगायची आहे."

" आनंदाची बातमी ? आणि तुरुंगांत ती कोणती असणार ?" सरोजिनी निर्विकारपणें म्हणाल्या. तोंच त्यांतील एकजण पुढें होऊन म्हणाला, " अहो, आज आपली सर्वांची मुक्तता होणार ! आपण सुटणार – या तुरुंगाला रामराम ठोकणार !"

हें सारें तुरुंगधिकारी लांबून पहात होता. तो त्यांच्याजवळ आला व सरोजिनींच्या सचिंत चेहऱ्याकडे पाहून म्हणाला, " ही बातमी ऐकून तुम्हांला आनंद नाहीं होत ?"

" असं कसं होईल ? बंधमुक्त होणं कोणाला आवडणार नाहीं ?" सरोजिनी म्हणाल्या.

"मग तुम्ही अशा खिन्न कां ?"

" माझी एक विनंती आहे आपल्याला."

" ती कोणती ?" तुरुंगाधिकाऱ्यानें भुंवया चढवून विचारलें.

" मला आणखी आठ दिवस येथें रहाण्याची आपण परवानगी द्यावी."

" वा : ! चांगली आहे विनंती. तुमचं अगदीं उलटच दिसतंय्. सारेजण मुदतीच्या आधीं सुटण्याची विनंति करतात, तर तुम्ही जास्त दिवस राहण्याची परवानगी मागता ! पण कारण कळेल कां याचं ?"

"कारण असं – या ज्या कळ्या आहेत ना ? त्या आठ दिवसांत उमलतील व तीं फुलें पाहून मग मी हा तुरुंग सोडीन."

हें ऐकून तुरुंगाधिकारी चकित झाला.

◆ ◆ ◆

सरोजिनींचें प्रेम जसें फुलांवर; तसेंच मुलांवर ! विद्यार्थ्यांनीं त्यांना केव्हां कुठेंहि बोलाविलें, तरी त्या आनंदानें तेथें जात व आपल्या

विनोदी वक्तृत्वानें तरुणांचे चेहरे प्रफुल्लित करीत. मुलांत मुलाप्रमाणें, तरुणांत तरुणाप्रमाणें व वृद्धांत वृद्धाप्रमाणें वागण्याचें कौशल्य सरोजिनीं-जवळ होतें. देशांतील तरुणांवर तर त्यांचा फार विश्वास !

१९२५ सालीं कानपूरला अध्यक्षपदावरून भाषण करताना सरोजिनीदेवी तरुणांना म्हणाल्या, "जगताच्या प्रभातकालीं स्फुरलेल्या परमेश्वराच्या आनंदमय वृत्तींची स्मृति म्हणजेच तारुण्य ! म्हणून परमेश्वराच्या सौंदर्याला, त्याच्या वैभवाला व त्याच्या सामर्थ्याला साजेसें वर्तन ठेवा !"

विद्यार्थ्यांची कोणतीहि मागणी असो, ती सरोजिनींनीं नाकारली असें प्राय: झालें नाहीं. मग ते "परिक्षेंत मार्क वाढवून पास करा." अशी विनंती करणारे लखनौ विद्यापीठाचे विद्यार्थी असोत अगर संदेश मागणाऱ्या कॉलेज–तरुणी असोत !

१९४०--४१ सालीं पुण्याच्या काँग्रेस–हाऊसमध्यें स्त्रियांची एक खास सभा बोलाविली होती. सरोजिनीबाई त्या सभेच्या अध्यक्ष होत्या. पुष्कळशा कॉलेज–तरुणी आपल्या श्रीमंती पोशाखांत तेथें हजर होत्या. सरोजिनी व्यासपीठावर बसल्या. तेव्हां त्यांच्याकडे पाहून त्या कॉलेज-तरुणींना एकदम आश्चर्याचा धक्काच बसला. सरोजिनींच्या पोषाखाबद्दल, वागणुकीबद्दल त्यांनीं जो कल्पनेचा मनोरा रचला होता, तो आतां त्यांच्या या खादीच्या साध्या पोषाखानें – हंसण्याखेळण्यानें – पूर्ण जमीन-दोस्त झाला.

सरोजिनींचा पोषाख अगदीं साधा होता. त्यांनीं खादीचें जाडे-भरडे पोपटी रंगाचें पातळ परिधान केलें होतें. अंगांत पांढरा शुभ्र खादीचाच ब्लाऊज घातला होता व त्यावर रुळत होतें सोनेरी मंगळसूत्र ! हास्य-मुद्रेनें इकडे तिकडे पहातांना सरोजिनींच्या कानांतील लोंबते डूल हलत होते. त्यांच्याशेजारीच बसल्या होत्या विजयालक्ष्मी पंडित ! पं. जवाहरलालांच्या भगिनी !

सरोजिनींच्या खेळकर वृत्तीनें सारें वातावरण खेळीमेळीचें बनलें. सभेला सुरुवात झाली. सरोजिनींचें रसपूर्ण व विनोदप्रचुर वक्तृत्व

सुरूं झालें. तें ऐकून तर त्या विद्यार्थिनींना सरोजिनींबद्दल जास्तच आपुलकी वाटूं लागली. भाषण संपल्यावर त्या सरोजिनींच्याजवळ गेल्या व म्हणाल्या,

"आम्हांला सही द्या – आम्हांला संदेश द्या."

तेव्हां सरोजिनी खूप जोरानें हंसल्या व म्हणाल्या,

"मला पाहिल्यावर सहींत काय आहे ? मी वागतें तशा वागा – देशासाठीं हंसतमुखानें तुम्ही लढायला शिका. हाच माझा संदेश !"

◆ ◆ ◆

त्यांनीं एकदां आपली अशी इच्छा प्रदर्शित केली कीं, "माझ्या समाधीवर जो शिलालेख कोराल त्यांत.

'भारतीय युवकांवर प्रेम करणारी'

असे शब्द असावेत."



# ९. . . . . . राजसिंहासनावर


१९२४ सालीं भारतीय राजकारणानें बिकट रूप धारण केलें होतें. अशा वेळीं राष्ट्रसभेच्या नौकेचें सुकाणूं कोणाच्या हातीं द्यावें ?

सर्वांच्या दृष्टीपुढें उभ्या राहिल्या सरोजिनीदेवी — दक्षिण आफ्रिकेंतील लोकांनीं वंदिलेल्या सरोजिनीदेवी — राजकारणांत ऐक्याची व माधुर्याची भावना निर्माण करणाऱ्या सरोजिनीदेवी — राष्ट्रकार्याला आपलें जीवित अर्पण केलेल्या गांधीजींच्या शिष्या — सरोजिनीदेवी !

समतोल मनाच्या व समेट वृत्तीच्या सरोजिनींच्या हातीं राष्ट्रसभेचीं सूत्रें देण्याचें काँग्रेसमधील सर्व पुढाऱ्यांनीं ठरविलें व १९२५ सालीं कानपूर येथें भरणाऱ्या राष्ट्रसभेच्या अधिवेशनासाठीं सरोजिनींची निवड करण्याचें निश्चित ठरलें.

त्या वेळीं आपल्या भावी कार्याची रूपरेषा सांगताना सरोजिनी म्हणाल्या, "हिन्दमातेला आपल्या घरांतील स्वामिनी बनवावें, तिला तिचा योग्य दर्जा प्राप्त करून द्यावा, आपल्या प्रचंड सांपत्तिक साधनांची हिन्दमातेला मालकीण बनवावें, कोणाचें आतिथ्य करावें किंवा करूं नये हें तिनेंच ठरवावें — असाच माझा घरगुती कार्यक्रम आहे."

असें म्हणून "आपण हिन्दमातेच्या एकनिष्ठ कन्या आहोंत; तेव्हां आपल्या आईच्या घराची व्यवस्था लावायला नको का ?" असें त्यांनीं सर्वांना विचारलें. पण ही व्यवस्था लावण्याचें काम जितकें रमणीय, तितकेंच बिकटहि होतें. कारण देशांत अनेक शोचनीय झगडे चालू होते. ते मिटविण्यासाठीं काय प्रयत्न केले पाहिजेत हें सांगतांना सरोजिनीदेवी म्हणाल्या, "रावापासून रंकापर्यंत सर्व हिन्दमातेच्या लेकरांना — सावत्र लेकरांनासुद्धां — तसेंच देशांत येऊन राहिलेल्या पाहुण्यांना व परकीयांनाहि त्यांचा योग्य व मानाचा दर्जा प्राप्त करून देणें अवश्य आहे."




राष्ट्रसभेच्या अध्यक्षांची मिरवणूक

अशीं राष्ट्राच्या भवितव्याचीं सुवर्ण–स्वप्नें त्या रंगवीत असतांच सन १९२५ च्या डिसेंबरची २३ वी तारीख उजाडली. सारें कानपूर शहर आज एका नवीन उत्साहानें जागें होत होतें. कानपूरचें रेल्वेस्टेशन तर सर्वांच्या आधींच जागें झालें होतें. तेथें प्रचंड जनसमुदाय जमला होता. पं. जवाहरलाल नेहरू – लाला लजपतराय इत्यादि थोर थोर पुढारी तेथें उभे होते. कशासाठीं उभी होती ही मंडळी? कोणाच्या स्वागताला जमली होती ती? कोणाची वाट पहात होती ती?

राष्ट्रसभेच्या नियोजित अध्यक्षांची – राष्ट्रसभेच्या अध्यक्षपदीं बसण्याचा पहिला मान मिळविणाऱ्या हिन्दी महिलेची! गाडी हळूहळू स्टेशनांत शिरूं लागली. तोंच "वन्दे मातरम्!" "म. गांधीकी जय" "सरोजिनीदेवी की जय!" असा जयजयकाराचा नाद उठला – गगनाला जाऊन भिडला. सारें स्टेशन त्या घोषणांनीं दणाणून गेलें. गाडी थांबली. एका डब्यांतून राष्ट्रसभेचे उगवते अध्यक्ष व मावळते अध्यक्ष उतरले. म. गांधी डब्याच्या दारापाशीं आले, दोन्ही हात जोडून हंसतमुखानें उभे राहिले व त्यांच्याशेजारीं उभ्या राहिल्या सरोजिनीदेवी! कानपूरचे प्रमुख पुढारी पुढें आले. त्यांनीं म. गांधी व सरोजिनी यांना फुलांचे हार घातले व कृतज्ञ जनतेनें त्यांची मोठी मिरवणूक काढली.


रस्त्यारस्त्यानें कमानी उरभाल्या होत्या. मिरवणुकीचा मार्ग तोरण-पताका व पुष्पमाला यांनीं शृंगारलेला होता. सारें वातावरण प्रसन्न होतें– आनंदी होतें–उत्साही होतें. मिरवणुकीच्या पुढें एक डौलदार हत्ती डुलतडुलत चालत होता–आपल्या शिरावर राष्ट्रध्वज डोलवित ऐटींत चालला होता. त्याच्यामागें चालले होते पांढरेशुभ्र घोडे! आणि त्या घोड्यावर बसले होते कोण? पं. जवाहरलाल नेहरू व त्यांचे इतर सहकारी!

त्यांच्यापाठीमागून फुलांनीं सुशोभित केलेला रथ चालला होता. आपल्या हृदय–मंचकावर दोन अध्यक्षांना जागा देणारा तो रथ! किती तरी छोटे–मोठें राष्ट्रध्वज त्या रथावर फडकत होते. रथांतील ते दोन अध्यक्ष–म. गांधी व सरोजिनीदेवी–यांना पाहून साऱ्या नागरिकांच्या नेत्राचें पारणें फिटलें. आणि त्या रथामागें लोटला होता प्रचंड जनसागर! अशी थाटामाटाची मिरवणूक टिळकनगरापाशीं आली व विसर्जन पावली.

क्रमांक ५४१ नों: दि: २३/२/५०

'टिळक–नगराचें' वैभव तर काय विचारावें ? तेथें एक भव्य मंडप उभा केला होता. जनतेला स्फूर्ति देणारी लो. टिळकांची प्रतिमा त्या मंडपावर विलसत होती. दुपारचे पांच वाजले. अधिवेशनाला सुरुवात झाली. हजारों स्त्रीपुरुषांचा जमाव तेथें लोटला होता. आजच्या अधिवेशनावर एक निराळाच रंग पसरला होता. आतांपर्यंत कधींहि न दिसलेला तो एक अद्‌भुत चमत्कार होता—हिन्दी स्त्री–जीवनांत क्रांती घडवून आणणारा तो एक दिव्य क्षण होता—भारतीय महिलावर्गाचा तो अपूर्व सन्मान होता.

यापूर्वींच्या अधिवेशनाचें अध्यक्षपद अनेक पुढाऱ्यांनीं भूषविलें होतें. पण त्या सिंहासनावर बसण्याचा पहिला मान आज हिन्दी महिलेला मिळत होता. सरोजिनीदेवींच्या आधीं– १९१७ सालीं – कलकत्त्यास जी कॉंग्रेस झाली, तिच्या अध्यक्षपदाचा मान एका स्त्रीला मिळाला होता–तिचें नांव डॉ. ॲनी बेझंट ! पण ती स्त्री हिन्दी नव्हती.



तेव्हां हा हिन्दी महिलेचा अध्यक्षपदीं बसण्याचा मान आज आपल्याला मिळत आहे, हें पाहून सरोजिनींना आनंदाचें भरतें आलें. वास्तविक पहातां याच्या आधीं बेळगांव कॉंग्रेसच्या वेळींच हा मान

सरोजिनींना मिळणार होता व तसें महात्माजींनीं सांगितलेंहि होतें. बेळगांवच्या अधिवेशनाचीं अध्यक्षीय सूत्रें हातांत घेतांना महात्माजी म्हणाले होते, " केनिया व दक्षिण आफ्रिका या ठिकाणीं सरोजिनींनीं बजावलेली कामगिरी आश्चर्यकारक आहे; म्हणून या वर्षाच्या काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा बहुमान त्यांनाच देणें उचित होतें. पण त्या येथें नसल्यानें सरोजिनीदेवींनीं जेथें पाऊल ठेवावयास पाहिजे, त्या ठिकाणीं मी पाऊल ठेवीत आहें. "

अशी मान्यता सरोजिनीदेवींना महात्माजींकडून १९२४ सालींच मिळाली होती. ती महात्माजींची इच्छा आतां १९२५ सालीं पूर्ण होत होती. म. गांधी अध्यक्षीय खुर्चीवरून उठले व त्यांनीं सरोजिनींना तेथें बसण्याची विनंती केली. सरोजिनीदेवी धीमेपणानें पावलें टाकीत व हंसतमुखानें तेथें गेल्या. जनतेनें प्रेमानें अर्पण केलेल्या त्या राज-सिंहासनावर ही काव्यसम्राज्ञी अधिष्ठित झाली.

सरोजिनी भाषण करण्यास उभ्या राहिल्या. जनतेचें आपल्यावरील अपरंपार प्रेम पाहून त्यांचा गळा दाटून आला. गंगौघाप्रमाणें सतत वाहणारी त्यांची वाणी त्या सन्मानानें-त्या प्रेमानें-दडपली गेली. त्या वाणीला भावनेचा बांध बसला. दोन दोन तास अस्खलितपणें चालणारें त्यांचें वक्तृत्व आज अगदीं संकोचून बसलें. सरोजिनी म्हणाल्या, "ज्या अढळ निष्ठेच्या जोरावर सीतेनें वनवास सहन केला, दमयंतीनें हाल सोसले आणि सावित्रीनें निर्भयपणें यमलोकाच्या वेशीपर्यंत प्रयाण केलें-त्या निष्ठेच्या अल्प अंशानें मी माझ्यावर सोंपविलेलें काम पार पाडूं शकेन असा माझा विश्वास आहे. "

या एका वाक्यानें सरोजिनींनीं आपल्या संस्कृतीचें जें उज्वल दर्शन घडविलें, आणि तें घडवतां घडवतांच आपल्या विनयाचें व त्या विनयाबरोबरच, त्या निर्धाराचें जें चित्रण केलें तें पाहून सारें सभागृह विस्मयानें व आदरानें चित्राप्रमाणें तटस्थ राहिलें.

यानंतर देशांत निरनिराळ्या प्रश्नांचे राक्षस कसें अक्राळविक्राळ रूप धारण करून उभे आहेत व त्यांना नामशेष करण्याची ताकद म. गांधींच्या त्यागाच्या संदेशांतच कशी आहे हें सरोजिनींनीं सर्वांना पटवून

दिलें. त्या पुढें म्हणाल्या, " भांडवलवाले व मजूर यांच्यामध्यें सलोखा निर्माण झाला पाहिजे. आपली प्राचीन विद्या नि संस्कृती व आधुनिक पाश्चात्य विज्ञान यांचा सुंदर मेळ होणें आवश्यक आहे. खेड्यांचें पुनरुज्जीवन करून शेतकऱ्यांना उपासमार, अज्ञान व रोगराई यांच्या खाईंतून वर काढलें पाहिजे. त्यासाठीं कॉंग्रेसनें राष्ट्रीय स्वयंसेवकांची सेना उभारली पाहिजे. "

अशा एकेक सुधारणांच्या कल्पना सभेपुढें मांडून नंतर त्यांनीं सभेचें लक्ष परदेशांतील बांधवांकडे वळविलें. दक्षिण आफ्रिकेंतलि हिंदी बांधवांचे जे प्रतिनिधी त्या अधिवेशनास आले होते, त्यांचें प्रेमपूर्वक स्वागत करून त्यांनीं अशी सूचना केली कीं, " त्यांच्या हक्काच्या झगड्याला आपण पाठिंबा दिला पाहिजे. त्याकरितां राष्ट्रीय सभेच्या कारभारांत एक 'परराष्ट्रीय खातें' उघडणें अत्यंत आवश्यक आहे. त्याच-बरोबर बहुजनसमाजांत राजकीय तत्त्वांचा प्रसार करण्यासाठीं—त्यांचीं सामाजिक कर्तव्यें व हक्क त्यांना समजावून देण्यासाठीं—त्यांच्या जुलमाची जाणीव करून देण्यासाठीं. आर्थिक धोरणाची माहिती त्यांना करून देण्यासाठीं कॉंग्रेसनें एक 'प्रसिद्धिखातें' उघडलें पाहिजे. परदेशांत असा प्रचार करण्यासाठीं 'परराष्ट्र—वार्ताप्रसारक मंडळहि' नेमावें. "

मग ज्याकरितां सरोजिनींनीं आयुष्य वेचलें, त्या हिन्दु—मुस्लिम ऐक्याच्या प्रश्नाकडे त्या वळल्या. शेवटीं कॉंग्रेसचें आजचें प्रमुख कर्तव्य कोणतें हें सांगताना सरोजिनी म्हणाल्या, " स्वराज्यप्राप्ति हें कॉंग्रेसचें प्रमुख साध्य आहे व त्याचें साधन म्हणजे हिन्दु-मुस्लिम-ऐक्य ! त्यासाठीं सर्वांनीं मिळून एक कार्यक्रम ठरवावा व एका कार्याला लागावें. मातृ-भूमीच्या स्वातंत्र्याकरितां आपण कितीहि स्वार्थत्याग केला, तरी तो अल्पच आहे, कितीहि क्लेश भोगले तरी ते थोडेच आहेत. स्वातंत्र्य-संग्रामांत भीति हाच अक्षम्य देशद्रोह व निराशा हेंच अक्षम्य पाप आहे. म्हणून भक्तिपूर्ण अंतःकरणानें हात जोडून मी परमेश्वरापाशीं अशी प्रार्थना करते कीं, हे देवा, या आमच्या स्वातंत्र्य—युद्धाच्या कसोटीच्या वेळीं आम्हाला अढळ श्रद्धा दे आणि दुर्दम्य धैर्य दे. त्याचप्रमाणें कार्यसिद्धीच्या वेळींहि आमच्या मनांतला विनयभाव कायम राहो. अखेरीस, प्राचीन कवीच्या

शब्दांत आमचें एवढेंच मागणें आहे कीं—

" असतो मा सद् गमय । तमसो मा ज्योतिर्गमय ॥
मृत्योर्मा अमृतं गमय ॥ "

टाळ्यांच्या कडकडांटात सरोजिनीदेवींनीं आपलें स्फूर्तिदायक व मार्गदर्शक भाषण संपविलें.

सरोजिनींनीं राजकारणांतील रुक्षपणा नाहींसा करून त्यांत माधुर्य आणलें. कॉंग्रेसच्या इतिहासाला कानपूर कॉंग्रेसमुळें नवीन वळण मिळालें. सरोजिनींचें हें अध्यक्षपद म्हणजे परतंत्र हिन्दी जनतेनें त्यांच्या देशसेवेबद्दल त्यांना दिलेलें प्रेमाचें प्रतीकच !

◆ ◆ ◆

हें झालें पारतंत्र्याच्या काळांत—आणि आतां स्वातंत्र्याच्या काळांत ?

ता. १५ ऑगस्ट १९४७ रोजीं भारतांत स्वातंत्र्याचा सूर्य उगवला. दीडशें वर्षें ब्रिटिशांशीं लढून थोर वीरपुरुषांनीं ज्या भूमीवर आपलें बलिदान केलें होतें, तेथें आज स्वातंत्र्यसूर्याचीं किरणें पसरत होतीं. पारतंत्र्याचा अंधार नष्ट झाला होता व स्वातंत्र्याची मंगल प्रभात उगवली होती.


" पूर्व क्षितिजावर आज नवीन ताऱ्याचा उदय होत आहे. " असें म्हणून पं. जवाहरलालांनीं या स्वातंत्र्याचें स्वागत केलें, तर प्रतिभासंपन्न सरोजिनीदेवींनीं या स्वातंत्र्याचें माहात्म्य आपल्या काव्यमय भाषेंत पुढील शब्दांनीं वर्णिलें:—

" पृथ्वीराजाच्या या प्राचीन राजधानीवर स्वातंत्र्याची मंगल सुप्रभात आपल्या भरजरी वेषांत अवतीर्ण होत आहे. शहाजहान बादशहाच्या या लाल किल्ल्यावर उद्यां स्वतंत्र भारताचा ध्वज फडकणार ! आम्ही आमचीं मस्तकें त्या ध्वजापुढें लववितों. कित्येक वर्षांच्या परदास्यामध्यें असतांना आम्ही जीं स्वप्नें रंगविलीं होतीं, तीं प्रत्यक्षांत आणण्यासाठीं आम्ही आमचे देह व मनें अर्पूं."

या स्वतंत्र राज्यांत राजेन्द्रबाबू राष्ट्रपति झाले, पंडितजी पंतप्रधान झाले, आणि सरोजिनी ? त्या झाल्या संयुक्त प्रांताच्या गव्हर्नर ! त्या वेळीं

त्यांचें वय ६२ वर्षांचें होतें. त्यांची सतेज कांति आतां निस्तेज झाली होती, तोंडावर सुरकत्या पडल्या होत्या, डोळ्यांभोवतीं काळीं वर्तुळें उमटलीं होतीं. पण वयानें वृद्ध झाल्या तरी सरोजिनी मनानें तरुणच होत्या. त्यांचें मन चिरतरुण होतें, त्यांचें शरीर उत्साही होतें आणि त्यांचें ईश्वरदत्त वक्तृत्व तर ?—

हिऱ्याचें सौंदर्य सुवर्ण–कोंदणाचा लाभ झाल्यानंतर अधिकच फांकतें, त्याप्रमाणें वक्तृत्वसंपन्न व प्रतिभाशाली सरोजिनींच्या व्यक्तिमत्वाला या अधिकारपदानें नवीनच तेज चढलें. राष्ट्रसभेच्या सिंहासनावर हिन्दी महिलेनें बसण्याचा पहिला मान जसा सरोजिनींचा, तसाच राज्यपालाच्या गादीवर स्त्रीनें आरूढ होण्याचा पहिला मानहि त्यांचाच !



संयुक्त प्रांताची राजधानी–लखनौ–आपल्या स्वतंत्र गव्हरनरच स्वागत करण्यास उत्सुक होती. सारें शहर विजेच्या दिव्यांनीं झळखत होतें, जणुं सरोजिनीदेवींचें स्वागत करण्यास आकाशांतील चांदण्याच खालीं आल्या होत्या. गव्हर्नमेंट हाऊसवर उभारलेल्या भव्य व्यासपीठावर सरोजिनी उभ्या राहिल्या. स्वतंत्र भारताचा राष्ट्रध्वज त्यांच्या हातून

फडकविण्यांत आला. आकाशांत डोलणारा तो राष्ट्रध्वज — हिन्दुस्थानच्या स्वातंत्र्याचा पुकारा करणारा तो राष्ट्रध्वज — त्याकडे पाहून साऱ्या लोकांचीं हृदयें हेलावलीं. "वन्दे मातरम् !"चे निनाद वातावरणांत घुमूं लागले. या सादाला प्रतिसाद मिळत होता आकाशांतून ! तेथें संचार करणाऱ्या विमानांतून जेव्हां पुष्पवृष्टि होऊं लागली, तेव्हां तर जनतेच्या हृदयसागराला जोराची भरतीच आली.

अशा या आनंदानें उचंबळलेल्या जनता—सागराला उद्देशून सरोजिनी अभिमानानें म्हणाल्या, "स्वतंत्र भारताच्या नागरिकांनो ! आपल्या राष्ट्रध्वजाचा मान राखा. आपल्या देशांतल्या हजारों लोकांनीं ज्या हालअपेष्टा सोसल्या, त्यांचा निदर्शक म्हणजे हा आपला राष्ट्रध्वज !" असें म्हणून त्यांनीं राष्ट्रध्वजाला खालीं वांकून प्रणाम केला व हा ध्वज जनतेला सुरक्षितता, शांतता व समता यांचा लाभ करून देईल अशी आशा व्यक्त केली.

नंतर सैनिकांनीं सरोजिनीदेवींना मानवंदना दिली. त्या वेळीं त्या सैनिकांना उद्देशून सरोजिनी म्हणाल्या, "देशांत शांतता व सुरक्षितता ठेवणें व जनतेचें दुःख निवारण करणें हें प्रत्येक सैनिकाचें आद्य कर्तव्य आहे."

सायंकाळीं रेडिओवरील आपल्या काव्यमय भाषणांत सरोजिनी-नीं जगाला ऐकविलें, "आपला भारतवर्ष पुनश्च जगाच्या आघाडीवर येत आहे व जगांतील कलहद्वेषाच्या अंधःकारांत आपल्या शांतीचा, मित्रत्वाचा व प्रेमाचा दीप पाजळत आहे. जगांतल्या स्वतंत्र राष्ट्रांनो ! आजचा स्वतंत्र भारत तुम्हांला अभिवादन करीत आहे. जगांतल्या परतंत्र राष्ट्रांनो ! तुमच्या भावी स्वातंत्र्यासाठीं आम्ही परमेश्वराची प्रार्थना करतों. जगांतील सर्व राष्ट्रांनो ! ही आमची भारतमाता, जिच्या घराचें छत हिमाच्छादित आहे, जिच्या घरांतील भिंती सागरवलयांकित आहेत, जिच्या घरचीं द्वारें तुम्हांला खुलीं आहेत, तिच्या वतीनें मी तुम्हांला अभिवादन करतें. तिचें हें स्वातंत्र्य आपणा सर्वांना परमोच्च शांतिपद प्राप्त करून देईल."

या मोठया अधिकारपदाचीं सूत्रें हातांत असतांना व गौरवाच्या गौरीशिखरावर चढल्यानंतरहि सरोजिनींचें मन निगर्वी राहिलें. त्यांच्या आतिथ्यशील वृत्तीनें व स्नेहशील स्वभावानें सरोजिनी गव्हर्नर म्हणून लोकप्रिय झाल्या—लोकमान्य झाल्या. विनयानें व विनोदानें त्या नेहमीं म्हणत, " मी गव्हर्नर नसून गव्हर्नेस ( जनतेची सेविका ) आहें. " हें त्यांचें म्हणणें पूर्णांशानें सत्य होतें.

गव्हर्नर झाल्याबरोबर त्यांनीं गव्हर्नमेंट हाऊसवर भारतीय संस्कृतीची व आपल्या व्यक्तिमत्वाची छाप पाडली. सर्वत्र भारतीय पद्धतीची सजावट केली. गव्हर्नमेंट हाऊसचा दिवाणखाना भारतीय पद्धतीनें सुशोभित केला. त्याच्याभोंवतीं असणाऱ्या त्या रम्य उद्यानांत त्यांनीं नाना रंगांचीं—नाना वासांचीं फुलझाडें लावलीं. अशा फुलांच्या संगतींत हिंडतांना सरोजिनी आपल्या शिरावरील जबाबदारीचें ओझें हलकें करीत व त्यांचें मन आनंदानें थय्थय् नाचूं लागे.

गव्हर्नर म्हणून सरोजिनी आपल्या नोकरांशीं कधींच ताठ्यानें वागल्या नाहींत. गव्हर्नमेंट हाऊसच्या भव्य प्रासादांत व तेथील ऐश्वर्यांत स्वत:ला कोंडून न घेतां, सरोजिनी आपला बराचसा वेळ जनतेच्या सहवासांत घालवीत होत्या. आजूबाजूला असणाऱ्या गरिबांच्या झोपडींत त्या वारंवार जात होत्या व त्यांच्या तक्रारी शांतपणें ऐकून दूर करण्याचा प्रयत्न करीत होत्या. इतकें असूनहि त्यांच्या स्वैर मनाला गव्हर्नर—पदाचें बंधनच वाटत होतें. त्या एकदां विनोदानें स्वत:चें वर्णन करीत म्हणाल्या, "रानांतल्या पक्ष्याला पिंजऱ्यांत घातलें आहे."

गव्हर्नर-पदाबरोबरच दुसरी एक अधिकाराची जागा सरोजिनींना लाभली होती. ती म्हणजे लखनौ विद्यापीठाच्या कुलपतीची ! हे दोन्ही अधिकार त्यांनीं चोखपणें बजावले. सरोजिनींच्या यशस्वी कारकीर्दीचें वर्णन श्रीमती कमलादेवी चट्टोपाध्याय यांनीं पुढील यथार्थ शब्दांत केलें आहे—

"लखनौच्या पूर्वीच्या नीरसपणांत सरोजिनीदेवींनीं सौंदर्याची, हास्याची नी आनंदाची पेरणी केली आहे. चोहोंकडे खेळीमेळीचें, मित्रत्वाचें नी अतिथिसत्काराचें वातावरण निर्माण केलें आहे."

## १०. . . . . . . . . ' क्षितिजापलिकडे !'

सुख आणि दु:ख यांच्या उभ्या-आडव्या धाग्यानें जीवनाचें वस्त्र विणलें जातें. कधीं सुखाच्या शीतल सरी मनुष्यावर एकामागून एक कोसळतात, तर त्यानंतर लगेंच दु:खाचा अग्निवर्षाव त्याच्या डोक्यावर होऊं लागतो. या दोन्ही अतिवृष्टीनें सामान्य माणूस घाबरून जातो—दबून जातो—गांगरून जातो. पण जो स्थितप्रज्ञ असतो तो ? त्याचें मन या दोन्ही प्रसंगाच्या वेळीं स्थिर रहातें. सुखदु:खाच्या पलिकडे त्याचें मन गेलेलें असतें. सुखाच्या स्पर्शानें तो हुरळूनहि जात नाहीं कीं दु:खाच्या चटक्यानें होरपळूनहि जात नाहीं. अशी " समदु:खसुखी " मनोवृत्ति स्थितप्रज्ञाची असते.

सरोजिनीदेवींचें मनहि स्थितप्रज्ञाला शोभेसेंच बनलें होतें. प्रथम सामाजिक परिषदेचें अध्यक्षपद, नंतर राष्ट्रसभेच्या सिंहासनावर बसण्याचा मान व शेवटीं सर्वांत उच्च असा गव्हर्नरच्या पदाचा मिळालेला अधिकार—या उत्तरोत्तर मिळणाऱ्या गौरवानें सरोजिनींचें मन कधींहि अस्थिर झालें नाहीं—कधींहि बावरलें नाहीं.

ही जशी सुखाच्या प्रसंगीं त्यांची मनोवृत्ति, तशीच दु:खाच्या वेळींहि ! गव्हर्नरपदाच्या अधिकारावर असतांना त्यांना एका दारुण दु:खाचा आघात सोसावा लागला.

सन १९४८ च्या ३० जानेवारी रोजीं महात्माजींच्या वधाची बातमी ऐकून सरोजिनींना वज्राघात झाल्यासारखें वाटलें. महात्माजी हे त्यांचे मित्र होते—गुरु होते—साक्षात् देवच होते ! आपण आतां पोरक्या झालों—आपला हिमालयासारखा आधार कोसळला, असें त्यांना वाटूं लागलें. " आतां यापुढें मी माझ्या वेदना कोणाजवळ सांगूं? माझ्या अडचणींचा पाढा कुणापुढें वाचूं ? माझ्या यशाचे पवाडे कुणापुढें गाऊं ? " असे शोकाचे कढामागून कढ सरोजिनींच्या अंत:करणांत उठूं लागले व

अनुक्र. 29372 दि: 25/12/... 2/7/2...

अश्रुरुपानें नेत्रावाटें वाहूं लागले. पण कृतान्तापुढें उपाय कोणाचा चालणार ? जेथें मानवाची बुद्धि व कल्पना कुंठित होते, त्या नियतीपुढें कोणाची मात्रा लागू पडणार ?

सरोजिनींनीं आपल्या दु:खाला विवेकाचा बांध घातला. महात्माजींना श्रद्धांजली वहातांना त्या म्हणाल्या, "महात्माजींचें क्षीण, दुर्बल असें पार्थिव शरीर भस्ममात झालें, म्हणून गांधीजी मृत झाले असें आपणांस म्हणतां येणार नाहीं. पुरातन काळीं ख्रिस्ताचें पुनरुत्थान झालें होतें. महात्माजीदेखील त्याचप्रमाणें तिसऱ्या दिवशीं पुन: आपल्या चितेंतून उठले आहेत. त्यांचें नेतृत्व, त्यांचें मार्गदर्शन, त्यांचें अपार प्रेम आणि त्यांची निरंतर सेवावृत्ती यांची जगाला अद्याप फार आवश्यकता आहे. महात्माजींच्या–त्या आमच्या प्रिय नेत्याच्या – त्या आमच्या परमपूज्य पित्याच्या आत्म्याला कधींहि शांती न मिळो ! न मिळो ! ! महात्माजी ! तुम्ही सदैव अशांतच रहा ! आम्हांला आमच्या शपथेची तुम्ही एकसारखी स्मृती करून द्या. आम्ही तुमचे वारस, अनुयायी व शिष्य आहोंत. आम्ही तुमच्या उज्वल स्वप्नांचे संरक्षक आणि भारताचे भाग्यविधाते आहोंत. तुमचें अपुरें स्वप्न पुरें करण्याचें आम्ही वचन देतों. त्या वचनाची परिपूर्ति करण्यासाठीं पूज्य महात्माजी ! तुम्ही आम्हांला शक्ती व आशीर्वाद द्या."

असें हृदयस्पर्शी भाषण त्यांनीं दु:खानें जड झालेल्या स्वरांत केलें. त्यांचा ह्या विलापांत हृदयाची आर्तता होती व आत्म्याची तळमळ होती.

× × ×

यानंतर एकच वर्ष ! सत्तरीच्या घरांत गेलेल्या सरोजिनींची प्रकृति दिवसेंदिवस खालावूं लागली. फेब्रुवारीच्या २८ तारखेला तर ती जास्तच बिघडली. त्यांच्याभोंवतीं डॉक्टर जमले होते. एका डॉक्टरांनीं त्यांना झोपेचें इंजेक्शन दिलें. तेव्हां इंजेक्शन घेण्याच्या आधीं सरोजिनी त्यांना म्हणाल्या, "हे इतके डॉक्टर कां बरें माझ्याभोंवतीं जमले आहेत ? ते मला झोप आणूं शकतील का ? कधीं येणार आहे मला झोंप ?"

"लवकरच झोंप लागेल." डॉक्टरांनीं सांगितलें.

" किती वेळ ही झोंप लागेल ? " सरोजिनींनीं प्रश्न केला.

" बारा तासपर्यंत."

" बारा तास ! म्हणजे मी कायमची झोपणार तर ! " मृत्यूच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या सरोजिनी मंदपणें हंसत म्हणाल्या. त्यांची विनोदबुद्धि शेवटपर्यंत कायम होती. तोंच एक डॉक्टर निश्चयानें म्हणाले,

" वा: ! कायमच्या झोपून कसे चालेल ? आपण पुन: उठाल. कारण हिन्दुस्थानला आपल्या सल्लामसलतीची फार गरज आहे. आपणाला आरोग्य व दीर्घायुष्य प्राप्त व्हावें अशी आमची ईश्वराजवळ प्रार्थना आहे."

" कोण ऐकेल तुमची प्रार्थना ? मला आतां पाहिजे फक्त एक—सुखाचें मरण ! " सरोजिनींचा आवाज खोल जात होता व हळूहळू त्यांची जीवनज्योत मंदावत होती. रात्रीं साडेतीनच्या सुमारास ती ज्योत पूर्णपणें विझली. ता. २ मार्च १९४९ रोजीं सरोजिनींचा आत्मा पार्थिव देह सोडून गेला ! सरोजिनींच्या मृत्यूनें पाश्चात्य व पौर्वात्य संस्कृतीचा दुवा निखळला ! ! उज्वल असें काव्य भावनांचा साज उतरून हिरमुसून बसलें. राजकारणांतील सौंदर्य व माधुर्य यांचा झरा आटला —

दुपारीं त्यांच्या पार्थिव देहाची यात्रा निघाली. त्यावेळीं रस्त्यांवर —छपरांवर— झाडांवर सारे लोक या थोर राष्ट्रप्रेमी देशसेविकेला वंदन करण्यास उभे होते. गोमतीच्या तीरावर त्यांच्या शवाला धार्मिक पद्धतीनें मंत्राग्नि देण्यांत आला. अग्नीच्या ज्वाळा उंच उंच जाऊं लागल्या— सरोजिनींची कीर्ति घेऊन आकाशाला भिडूं लागल्या.

तेथें त्यांना थोर थोर मंडळींनीं श्रद्धांजली वाहिली. पं. जवाहरलाल सरोजिनींना आदरांजलि वहातांना म्हणाले, " आज माझा अंतरात्मा उबगला आहे. आम्ही आतांपर्यंत जें कांहीं मिळविलें, त्याचें श्रेय सरोजिनीदेवींना आहे. त्यांच्या स्फूर्तीमुळें मला हें आजचें स्थान लाभलें आहे. "

सरोजिनीदेवींना वंदन करतांना सरदार पटेल म्हणतात, "स्वातंत्र्याच्या समरभूमीवर त्या वीरस्त्रीप्रमाणें लढल्या. या हिन्दु-

स्थानच्या स्वातंत्र्याच्या लढयांत आपल्याला अंतिम यश मिळणार असा त्यांचा दृढ विश्वास होता. सरोजिनी हजारों प्रकाशज्योतींची जागा एकट्या भरून काढीत असत. निराशेचा अंधार आपल्या विनोदबुद्धीनें दूर करून त्या स्वतः हंसत व इतरांना हंसवीत. ”

राजाजी सरोजिनींचें गुणवर्णन करतांना म्हणतात, “ सध्यांच्या गोंधळाच्या काळांत सरोजिनीदेवींचा आपल्याला केवढा मोठा आधार होता ! ”

सर सी. व्ही. रमण यांनीं आपली श्रद्धांजली पुढील शब्दांत वाहिली, “ माझ्या आयुष्यांत, माझ्या अवलोकनांत आलेल्या स्त्रियांमध्यें सरोजिनी या असामान्य होत्या. त्यांच्या बुद्धीचें तेज शेवटच्या क्षणापर्यंत उज्वल होतें. ”

◆ ◆ ◆

कोठें गेला हा हिन्दमातेचा बुलबुल? दूर—दूर—आकाशाच्या पलिकडे ! जेथें नामदार गोखले होते—लोकमान्य टिळक होते—महात्मा गांधी होते, तेथें त्यांना भेटण्यासाठीं या बुलबुलाचा आत्मा दूर उडून गेला !!

समाप्त

डा. स्वकमत.
२१३१२ दि.
नों. दि.

# जीवनाची रूपरेषा

१८७९— १३ फेब्रु. जन्म.
१८९१— मॅट्रीक.
१८९५— इंग्लंडला उच्च शिक्षणासाठीं गमन.
१८९८— हिंदुस्थानास परत व विवाह.
१९०५— ' गोल्डन थ्रेशहोल्ड ' प्रसिद्ध.
१९१२— The Bird of time प्रसिद्ध.
१९१७— Broken wing प्रसिद्ध.
१९१४— ना. गोखल्यांबरोबर विलायतेंत.
१९१४— ' देवी ' ही बेझंटबाईकडून पदवी.
१९१६— लो. टिळकांचा सहवास.
१९१८— दिल्ली समाजसेवासंघाच्या परिषदेच्या अध्यक्ष.
१९१९— लंडनला सिलेक्ट कमिटीपुढें साक्ष, स्त्री-शिष्टमंडळ.
१९२१— असहकारितेंत भाग.
१९२२— सिलोनला प्रयाण.
१९२३— सिलोनहून परत.
१९२३— आफ्रिकेंत-केनिया वसाहतींत.
१९२५— राष्ट्रसभेचें अध्यक्षपद-कानपूर.
१९२८— अमेरिकेस.
१९२९— पूर्व आफ्रिका-इंडिया कॉंग्रेसच्या अधिवेशनाचें अध्यक्षपद.
१९३०— दांडीयात्रा-धारासणा-तुरुंगवास.
१९३२— दिल्लीस ४७ वी राष्ट्रीय सभा-अटक.
१९४२— ' चलेजाव ' चळवळ
१९४७ — गव्हर्नर ( संयुक्तप्रांत
१९४९— २ मार्च-मृत्यु.

REFBK-0008897